१९५७
मु. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७८१०



REFBK-0015946

चॉकोलेटची वडी

वि. गाडगीळ

चॉकोलेटची वडी

न. वि. गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई
अनुक्रम ४१८८५ वि: १४-२-७५
क्रमांक १८१० नों वि: १५-२-७५

REFBK-0015946

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. १५८१६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : जानेवारी १९६७

चित्रकार : अनंत सालकर

ब्लॉक्स : धारगळकर प्रोसेस प्रा. लि., मुंबई

प्रकाशक :
सदाशिव कृष्ण पाध्ये
व्हीनस प्रकाशन
"तपश्चर्या"
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
राजाराम नागेश सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणे २

कै. काकांच्या मृत्यूनंतर त्यांचे लेख, भाषणे व पत्रे संग्रहीत करून प्रसिद्ध करण्याची योजना मी जाहीर केली होती. त्याप्रमाणे आज त्यांच्या वर्षश्राद्धदिनी हा लेखसंग्रह प्रसिद्ध करून मी पितृऋण अंशतः फेडीत आहे.

'पथिक' या त्यांच्या आत्मचरित्राचा तिसरा खंडही पुरा करण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे. त्यांच्या आशीर्वादाने ती लवकरच पुरी करू शकेन अशी आशा वाटते.

त्यांच्या इतर लेखसंग्रहांप्रमाणे याही लेखसंग्रहाचे मराठी वाचक स्वागत करतील याची मला खात्री आहे.

१२ जानेवारी १९६७ **विठ्ठल गाडगीळ**

अनुक्रम

१.	चॉकोलेटची वडी ...	१
२.	मंत्रिपदाची 'शवे अखिर' ...	६
३.	रस्ता रुंदावला, पण...? ...	१७
४.	नामाचा महिमा ...	२३
५.	'कूस' ...	२८
६.	मला भेट देत नाही ...	३३
७.	खुल्क खुदाका, मुल्क बादशाहका, अमल 'कंपनी सरकारका' ...	४१
८.	आंबराईतील नवल ...	४७
९.	पालम विमानतळावर ...	५६
१०.	संगमे नदीनाम् ...	६३
११.	टोपीची कहाणी ...	७०
१२.	पुनश्च जनता ...	८०
१३.	मी कर्नल कसा झालो ...	८८
१४.	हेचि शान देगा देवा ...	९९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५९२६

चॉकोलेटची वडी

: १ :

जगात असा अनुभव येतो की, एकच घटना अगर एकच वस्तू विविध परिणाम मानवी मनावर करीत असते. घटना-स्थान, घटना-काल, पाहणाराची मनःस्थिती ह्यावर त्याच घटनेचा अर्थ अगर अध्यात्म व्यक्तीला अभिप्रेत होतं. साहित्यशास्त्रात नवरस सांगितले आहेत. पण त्या सर्वांचे ग्रहण करणारे मन तेच असते. त्या सर्व रसांमध्ये रस हे सामान्य असते. रस म्हणजे वितळणे. म्हणजेच मन त्या बाबतीत आपली प्रतिक्रिया अभिव्यक्त करते तो. साधारण चॉकोलेटची वडी ती काय, पण तिने माझ्या साऱ्या जीवन-दर्शनाला आव्हान दिले, आणि आवाहनही केले !

त्याचे असे झाले की, दिल्लीहून विमानमार्गाने मी मुंबईस येत होतो. पहिला विमानाचा प्रवास कसा केला ? व काय अनुभवले ? ह्याचा इतिहास १२ वर्षांपूर्वी " अथ विमानमार्गेण " ह्या लेखात मराठी जनांना सादर केलेला आहे. गेल्या १२ वर्षांत तेच आकाश, तेच ढग, तशाच प्रियदर्शी सेविका असल्या तरी विमाने बदलली आहेत, आणि विमानांचा वेग खरोखर " मनोजवं मारुततुल्य वेगं " असा झाला आहे. आता दिल्ली-मुंबई हा प्रवास १॥ तासात होतो. आणि तोही आता कंटाळवाणा वाटू लागला आहे. मानवी मन कधीच संतुष्ट होत नाही. १०० मिळाले म्हणजे हजारांचा लोभ सुटतो, ते मिळाले म्हणजे लाखांचा. ते मिळाले म्हणजे १० लाखांचा, व मनुष्याला या स्थितीत संतुष्टतेची भेट होत नाही. तसेच प्रवासाच्या बाबतीत झाले आहे. १५० वर्षांपूर्वी उत्तर हिंदुस्थानात अगर दक्षिण हिंदुस्थानात यात्रेला जायचे म्हणजे सारी निरवानिरव करूनच, आणि बरोबर ५–२५ मंडळी घेऊन. अन्यथा सफलता अगर सुरक्षितता नसे. सामान्यपणे काशीयात्रा करून परत येण्यास पुणे-साताऱ्याकडील यात्रेकरूंना ८–१० महिने लागत,

व परत आले म्हणजे एक दिव्य केले असे वाटे. यात्रेकरूंची मिरवणूक काढण्यात येई, मावंदे होई, गंगापूजन होई, आणि त्यापासून थोडी प्राप्तीही होत असे. पुढे आगगाड्या आल्या. मुंबई–दिल्लीला प्रवास ३६ तासांचा असे. आता तुफान मेल, सीमा मेल इत्यादिकांमुळे २४ तासांवर आला आहे. आणि गेल्या महायुद्धानंतर सामान्य जनांसाठी विमाने उतारूंची वाहतूक करू लागली आहेत. ४७ साली मुंबई–दिल्ली विमान ६ तास घेत असे. आता बोइंग विमान १॥ तासात पोचते. तरीही १॥ तास म्हणजे किती वेळ ? असेही तक्रार करणारे उतारू आढळतात !

मला तर प्रत्येक वेळेला हा १॥ तास म्हणजे एखादे एकांकी नाटक पाहावे, अगर एखादी छोटी फिल्म पहावी, असेच वाटते. तेवढ्या १॥ तासात नाट्यघटना दिसतात. पात्रे तर रंगभूमीवर नटून आल्यासारखीच दिसतात. म्हणून या १॥ तासात माझे निरीक्षण चालू असते. कोणी भेटतात, भ्रष्टाचार करून मिळविलेले परवाने बाळगणारा व्यापारी भ्रष्टाचाराची निंदा करतो. आपल्या कामात उदासीन असलेला अधिकारी अलीकडे राज्यकारभार कार्यक्षमतेच्या दृष्टीने खालावत चाललेला दिसत आहे अशी तक्रार करताना दिसतो. तर एखादा पांढरी टोपी परिधान केलेला काँग्रेसभक्त गांधी-ध्येयापासून काँग्रेस दुरावत आहे असे सांगणारा भेटतो. तात्पर्य– त्या लहानशा विमानातील सुसज्जित जागेत साऱ्या समाजाचे प्रतिबिंब दिसून येते. कोणी वाचत असतात. कोणी लिहीत असतात. कोणी तसा देखावा करीत असतात.

अशाच एका प्रसंगात यात्रा करीत असताना माझ्यापुढे नेहमीप्रमाणे एका प्रियदर्शी सेविकेने लचकत कॉफी, काही बिस्किटे, व चॉकोलेटचे सबंध पाकीट आणून ठेवले. मधुमेह थोडासा परिचित झाला असल्याने त्याला दोन हात दूर ठेवण्याच्या दृष्टीने जे गोड व मधुर असेल ते बोलावे असे जरी असले तरी खावयाचे नव्हते. यावरून वाचकांना कल्पना येईल की गोड न खाता गोड बोलण्याची कला एखाद्या तपश्चर्येप्रमाणे मी साध्य करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. तथापि, ह्या जगात निंदकांनी कोणाला सोडले ? विमलचरित्र सीता,– तिच्याबद्दल एखाद्या रजकाने उठावे व मर्यादापुरुषोत्तम

रामाने लोकरंजनार्थ तिचा त्याग करावा, अशी आमची भारतीय संस्कृती आहे. कोणाबद्दल आपण बोलतो– ह्याचा निंदक विचार करीत नाहीत. कारण लोकशाहीचा सिद्धान्त असा की, सर्व सारखे; आणि तुकारामबुवांनी जरी " दही, दूध, लोणी एका मापे कोणी मोजू नये " असे म्हटले तरी लोकशाहीमध्ये कोणावरही टीका करणे हा मौलिक हक्क मानला जातो. आणि शिखरावर काक बसला म्हणजे तो गरुड होत नाही, असे सुभाषित असले तरी लोकशाही वर्तनात ते अवमानिलेच जाते. एरवी ज्याने काही न केले तो कर्तृत्वाचा आव आणतो. भोगाशिवाय ज्याच्या आचरणकोशात शब्द नाहीत, तो त्यागाचा वेदान्त सांगतो. सत्तेवर येताच शहाणपण येतेच. जात्यावर बसल्यानंतर ओवी येते,–ह्या चालीने.

तात्पर्य, कितीही गोड बोललो तरी " नावडतीचे मीठ अळणी " त्याप्रमाणे अनेक टीकाकारांना तसे वाटते. हा पण अनुभव आहे. त्या सेविकेने वर सांगितल्याप्रमाणे कॉफी, चॉकोलेट, बिस्किटे ट्रेमध्ये आणून ठेवली. बिस्किटे काही गोड, काही खारी होती. पण गोड खाणे मना होते, खारट खाणे आवडत नव्हते, आणि अशा स्थितीत मी विचार करीत होतो. रु. २१६ भाड्याचे दिले होते. त्यांत विमानामध्ये चहा, कॉफी इत्यादिकांचेही मूल्य समाविष्ट होते. जे पुढे होते ते खाणे शक्य नव्हते, आणि ते तसेच परत करावे, ह्याला माझे हिशेबी मन तयार नव्हते. कॉफी गरम होती म्हणून मी प्यायलो. गेली ४० वर्षे,–थोडे अधिकच, दिवसातून सामान्यपणे १० कप चहा मी पीत आलो आहे. १९४३ साली येरवडा तुरुंगात राजकीय कैद्यांची दंगल झाली. माझ्या डोक्यावर लाठीमार झाला. त्यानंतर आम्हांपैकी काहींना साबरमती तुरुंगात नेण्यात आले. त्या वेळी मजपुढे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. साबरमती तुरुंगात राजबंद्यांचे नेतृत्व दादा मावळणकरांकडे होते. आणि तेथील कैदी, निदान बाह्यतः, सिद्धान्तवादी होते. आम्ही तेथे पोचताच तेथील व्यवस्था कशी आहे हे आम्हांला त्यांनी सांगितले. मी त्यांना म्हणालो, " चहाशिवाय सारी व्यवस्था मान्य आहे. आणि कमीत कमी ६ वेळा तरी चहा मिळालाच पाहिजे. ब्राह्मण त्रिकाळ संध्या करतो. मुसलमान ५ वेळा नमाज पढतो, व मी राजकारणी असल्याने ६ वेळा चहा पिणे, ही माझ्या बाबतीत धर्माची बाब आहे."

त्यांनी जेव्हा पाहिले की, हट्टाला पेटण्यात अर्थ नाही, तेव्हा तडजोड ठरून थर्मासभर चहा मला मिळावा; व जितके वेळा मला पाहिजे असेल तितक्या वेळा मी घ्यावा. ह्यात गुजराथी बनियागिरी का महाराष्ट्रीय हट्ट विजयी झाला हे मी इतिहासावर सोपवतो !

सांगण्याचे तात्पर्य असे की, बिनसाखरेचा चहा सुरू केल्यापासून तो गरम असला पाहिजे, ही माझी किमान मागणी आहे. आणि चहाकॉफी अगर कोको ह्यांत म्हटला तर फरक आहे, म्हटला तर नाही. बर्नार्ड शॉच्या शब्दांत सांगावयाचे तर ह्या तिहींची चव सारखीच आहे, म्हणून बिस्किटांना स्पर्श केला नाही. कॉफी संपवली, आणि चॉकोलेटचा प्रश्न बेळगाव-कारवार सीमा-प्रश्नाप्रमाणे माझ्यापुढे यक्ष-प्रश्नासारखा उभा राहिला. एक मत सांगे की, ह्यासाठी पैसे दिले आहेत तेव्हा ते पाकीट उचलून खिशात घालण्यात काहीच हरकत नाही. दुसरे मन सांगे की, हक्क एवढाच आहे की,—ते खावयाचे; न्यावयाचे नाही. आणि मग माझे मनही कुरुक्षेत्राची रणभूमी झाले ! आणि राजकीय तत्त्वज्ञानात सांगितल्याप्रमाणे " संपत्ती ही सर्व अनर्थाचे मूळ आहे " असे वाटू लागले. आपला वैदिक धर्म पण तसेच सांगतो, व " ते न त्यक्तेन भुञ्जीथाः " असा उपदेश करतो. टाकून भोग घ्यावयाचा ह्यातील गूढार्थ मी जो सांगतो तो असा की, माझी आवश्यकता व गरज ह्यांतून जे उरेल अगर अधिक राहील ते समाजाला दिले पाहिजे. आपण एकट्यानेच खावयाचे म्हणजे पाप आहे. " केवलादि केवलाद्यो भवति " हे धर्माचे सूत्र आहे. माझ्या एकट्यापुढे ते ठेवले होते. आणि त्या परिस्थितीतील समाजाला प्रत्येकाला पुरेल एवढे दिले होते. म्हणून मी केवलादी नव्हतो. तथापि, दिलेल्या किंमतीचा मोबदला मिळाला पाहिजे ही हक्काची जाणीव, लोकशाही भारताचा नागरिक असल्याने, जागृत होती. मी तोंडात घातले काय व खिशात घातले काय,—ह्यात " अंततो गत्वा " विमान-व्यवस्थापकांच्या दृष्टीने काही फरक नव्हता. घटकाभर पुणेरी मन तडजोडीकडे वळू लागले, व निस्फळी निस्फळ म्हणजे त्वयार्धम् मयार्धम् असे करावे असे खालच्या स्तरातील मन सुचवू लागले. वरच्या स्तराचे मन म्हणू लागले की, कोठल्याही वस्तूला कोठल्या संकल्पाने घ्यावयाचे हे जाणले पाहिजे. प्रत्येक मंत्राला त्याचा असा विनिमय असतो, त्याचा असा छंद असतो. पुन्हा मनात असा विचार आला

की, समोरच्या पाकिटातील ६ वड्या मी सहज खाईन, व आणखी मागितल्या तर मला मिळण्याचा हक्क आहे. मग अधिक मागितल्या नाहीत, ह्या उण्याच्या तराजूतून समोरचे पाकीट घेतले व खिशात घातले, तर नैतिकदृष्ट्या काय बिघडणार आहे ? आणि मी नेणार ते तरी कोणासाठी ? माझ्यापुढे माझी धाकटी नात उभी राहिली. जेव्हा जेव्हा मी गावाहून येतो, तेव्हा न चुकता आपल्या बोबड्या शब्दांत खाऊ आणला का– विचारते. तिच्याकरता ते पाकीट न्यावे असे मन सांगत होते.

अर्धा तासपर्यंत विचार करून नैतिक काय ? अनैतिक काय ? योग्य काय ? अयोग्य काय ?–ह्याचा निर्णय लागेना. " किंकर्तव्यम् " असा पेचप्रसंग काश्मीर प्रश्नासारखा पिच्छा सोडीना. सेविका आली. त्या वेळी नकळत ट्रेमधील पाकीट काढून पुढल्या फळीवर ठेवले. त्या कृतीमागे काहीही ज्ञात हेतू नव्हता. ते निःसंशय सहज झाले होते. आणि क्षणभर " सतांहि सन्देह पदेषु अंतःकरण प्रवृत्तया " तेव्हा या संदेहप्रसंगातून अंतःकरणप्रवृत्तीने स्वाभाविक रीतीने मार्गदर्शन केले असे वाटू लागले. तथापि, भावनेला अगर अंतःकरणप्रवृत्तीला शरण जाणे ह्यात विचारदौर्बल्य आहे, व आपल्या बुद्धीला सद् असद् ह्या बाबतीत निर्णय घेता येत नाही असे कबूल करण्यासारखे आहे, असे वाटू लागले.

आणि ह्या दोलायमान स्थितीत विमान सान्ताक्रूझला उतरले. उतरताना ते चॉकोलेटचे पाकीट हातात घेतले, आणि दरवाजात स्मित मुखाने बिदा करणाऱ्या सेविकेला दिले. आणि ह्या कृत्यात वात्सल्यभाव होता असे माझे मन मला सांगत होते. तिच्या मनात काय होते,– हे सांगणे कठीण ! ह्या सर्व घटनांचा विचार करीत करीत घरी पोचताच काय खाऊ आणला– म्हणून नातीने विचारले. आणि ' चॉकलेट ' म्हणून तिला सांगून मुका घेतला. माझ्या मनाने तिला मी चॉकोलेटपेक्षा अधिक दिले. जेव्हा ती आणखी १५ वर्षांनी माझे लेख वाचील त्या वेळी माझी खात्री आहे की, ह्या चॉकोलेटची आठवण तिला पुन्हा होईल, व तिला आनंद वाटेल.

❀ ❀ ❀

मंत्रिपदाची 'शबे आखिर' : २ :

"साहेब, आता मोटर चांगली दिसत नाही." चंदनासिंग बोलता झाला. त्याने पाच मिनिटांपूर्वीच मंत्रिपदनिदर्शक झेंडा व अशोकचक्र मोटरीपासून काढून घेऊन कॅबिनेट सेक्रेटरीएटकडे धाडले होते. ता. १२ मे १९५२ चा दिवस होता. त्या दिवशी जुने मंत्रिमंडळ समाप्त झाले. नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी ९ वाजता व्हावयाचा होता. मंत्रिमंडळात न घेतल्याने ही सत्तेची कवचकुंडले काढून परत केली होती;– आणि यामागे केवढा इतिहास होता ! काही नाटककार आनंदपर्यवसायी नाट्यकृतीत चमकतात तर काही शोकान्तिकांच्या रचनेत नाट्यकलाकृतीचा उत्कर्ष गाठतात. तसेच थोडे अधिकारग्रहण व त्याग या प्रसंगांतून जाताना अनेक व्यक्तींच्या जीवनांत घडून येते. स्थितप्रज्ञ मी नव्हतो. सुखदुःख यांना समान मानले होते असेही नाही. 'लाभालाभौ' यांना नेहमीच सारखे लेखले असेही नाही; पण खरे सांगावयाचे म्हणजे अधिकारमुक्तीमुळे एक प्रकारची अननुभवलेली शान्तता व समाधान लाभले होते. क्षणभर दीर्घ कारागृहवासानंतर मुक्तिदिनी मुक्त झालेल्या मनुष्याला जसे वाटते तसे थोडे वाटत होते. ४ वर्षे ९ महिने ज्या अवस्थेतून गेलो होतो त्यात बदल झाला होता, आणि या दीर्घ काळात मनावर पडलेला ताण कमी झाल्याने मन उल्हसित झाले होते. तथापि त्या उल्हासात उदासीनतेची छटा होती, हे सत्य सांगितले पाहिजे. किंबहुना निराशा अगर नाराजी ही दोन्ही नसली तरी काही अधिक करून दाखविण्याची संधी येथून पुढे नाही ही खेदाची आर्त लकेर त्या ठिकाणी होती हे खरे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी सुप्रभाती ८ वाजता राष्ट्रपतिभवनातील म्हणजे त्या वेळच्या 'व्हाइसरिगल लॉज'मधील प्रशस्त व प्रचंड दरबार

हॉलमध्ये माउंटबॅटनने मंत्रिजनांना शपथ देण्याचा कार्यक्रम केला होता. त्याही वेळी मनात आनंद व दुःख यांचे सहअस्तित्व भासमान झाले होते. पाकिस्तानात हत्याकाण्ड वाढत असल्याच्या बातम्या कानांवर येत होत्या. भावाच्या सुतकातच लग्न व्हावे, विवाहाचा मुहूर्त साधला जावा असा तो प्रसंग होता. तथापि पुढे आलेली जबाबदारी टाळणे शक्य नव्हते. कारण ती कर्तव्यच्युती ठरली असती. नेतृत्वाने घेतलेला निर्णय त्याही वेळी चुकीचा वाटत नव्हता, व आताही वाटत नाही. आता एवढेच वाटते की, त्यानंतर शासनाची गाडी अधिक भक्कम हातात असती तर सांगतेचा व संपन्नतेचा मुक्काम अधिक लवकर गाठता आला असता. मार्गात बसलेले धक्के टळले असते. तपश्चर्येच्या सफलतेचा तो क्षण होता. व्यवहारज्ञतेची कसोटी होती. अनिवार्यतेचा तो आदेश होता. फाळणी नाकारली असती तर– कठीण आहे काय झाले असते ते सांगणे ! इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यातील घटनांतून शास्त्रीय निश्चिती होईल इतका कार्यकारणभाव सापडत नाही, असत नाही. काही वेळा कल्पिलेले असेल त्याप्रमाणे घडते. बऱ्याच वेळा जे घडते ते अकल्पिलेले असते. मनुष्य स्वतःच्या बाबतीतसुद्धा पुढील क्षणाला काय होईल ते सांगू शकत नाही. या स्थितीत समाजाच्या व राष्ट्राच्याबाबत कोणी ठामपणे सांगू शकेल अगर भविष्य वर्तवील हे संभवनीय नाही. तथापि मनुष्य हा भविष्य वर्तवीत असतो, व न वर्तविलेले अनुभवीत असतो; आणि राजकारणात तर ठासून सांगणारे, गर्जून बोलणारे, आव्हानपूर्वक आवाहन देणारे यांची स्पर्धा असल्याने स्वातंत्र्यानंतर समृद्धी, भूलोकी स्वर्ग हाच अनुभव येईल असे आम्ही सर्व म्हणत होतो. उद्या काय होईल हे जो ठामपणे सांगतो, व तसे घडून न आले तर तितक्याच समर्पकपणे का घडून आले नाही याची मल्लीनाथी करतो तोच खरा मुत्सद्दी,– अशी चर्चिल-साहेबांची व्याख्या आहे. त्याप्रमाणे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात घडवून आणले याचे वर्णन करण्यापेक्षा का घडून आले नाही याचा खुलासा करण्यातच श्रेष्ठांचे राजकारण चाललेले अजूनही दिसत आहे !

* * *

१५ ऑगस्ट १९४७ पासून १२ मे १९५२ पर्यंतच्या मुदतीत इतिहासाच्या दृष्टीने बहुतेक महत्त्वाचे असेच घडत गेले. फाळणीचे परिणाम,

निराश्रितांचे लोंढे, लूटमार, जाळपोळ, रावीच्या दोन्ही तीरांवर मनुष्या-मनुष्यावर केलेले अत्याचार, हा इतिहास जगात अन्यत्र क्वचितच अनुभवावयास मिळाला असेल. महात्मा गांधींची हत्या, त्यातून झालेले राजकीय व सामाजिक परिणाम, विशेषतः महाराष्ट्रात तर त्या घटनेने त्या काळातील इतिहासात कडवटपणा भरून ठेवला आहे. घरचे वाघ व बाहेर कोकरू अशा तऱ्हेचे राजकारण त्या काळात झाले, असे अनेक देशी व परदेशी निरीक्षकांचे म्हणणे आहे; ते सर्वस्वी अयोग्य आहे असे म्हणता येणार नाही. पंजाब-मधील पाण्याच्या वाटपाचा प्रश्न, नेहरू-लियाकत करार इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी याच काळात घडून आल्या. सांगण्याचे तात्पर्य असे की, नाटकाच्या सुरुवातीपासून नाटकाचा अंत कसा होतो हे नाटककार होणाऱ्या घटनांतून सूचित करीत असतो. मंत्रिपदाच्या पहिल्याच पंधरवड्यात जे खटके झाले त्यांवरून पुढे येणारा काळ कसा आहे याची तशी कल्पना कमीजास्त प्रमाणात आली होती. संयुक्त जबाबदारीचे तत्त्व म्हणजे मुक्त व निर्भीड मनाने प्रत्येकाने आपल्याला काय वाटते ते सांगावयाचे, व शेवटी त्या चर्चेतून जो निष्कर्ष निघेल तो मानावयाचा. होणारा निकाल हा सामुदायिक म्हणून त्याची जबाबदारी हीही सामुदायिक. त्या निर्णयात सर्वांचे विचार व दृष्टिकोण चर्चेच्या खलबत्त्यात खलले गेल्यामुळे होणाऱ्या रसायनात सर्व दृष्टिकोणांची चव येते असे मानले जाते. अठरा धान्यांचे कडबोळे असेही या पद्धतीचे थोडेसे टवाळीने का होईना वर्णन करता येण्यासारखे आहे; तथापि कडबोळ्यात ज्याप्रमाणे एका विशिष्ट धान्याचा प्रभाव पडतो त्याप्रमाणे संयुक्त जबाबदारीयुक्त मंत्रिमंडळाच्या कार्यात मुख्य प्रधानाचा, त्याच्या व्यक्तित्वाचा प्रभाव पडणे अपरिहार्य असते. लोकशाही व्यवस्थेत तो बहुमतवाल्या पक्षाचा नेता असतो, आणि साथी व सहकारी यांना घेण्याचा हक्क त्याचा असतो. मंत्री हे निवडणुकीने मंत्रिमंडळात येत नाहीत, आणि त्यांची प्रतिष्ठा व्यक्तिशः राजकारणात व पक्षात कितीही जरी असली तरी पक्षाने नेता निवडल्यानंतर सर्व सत्ता व पुरस्कार ही नेत्याच्या हातात जातात. आणि जर गटबंदी नसेल तर तो नेता हुकूमशहापेक्षाही अधिक शक्तिमान ठरतो. पक्षाचा नेता म्हणून पक्षाची निष्ठा त्याच्या सेवेला असते. मुख्य प्रधान म्हणून सारे राज्ययंत्र त्याच्या हातात असते. त्याच्या सल्ल्याने राष्ट्रपती मंत्र्यांची नेमणूक करतात; व त्याने मागितल्या-

बरोबर कोणाही मंत्र्याला राजीनामा द्यावा लागतो. एका शब्दात म्हणजे, त्याच्या मर्जीवर मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे भवितव्य अवलंबून असते; व जर पक्षाच्या मोठ्या संघटनेत (मास पार्टी) त्याचे वर्चस्व असेल तर मग त्याची सत्ता निरंकुश बनते. पंडित नेहरू हे १९४६ च्या जुलैपासून काँग्रेसचे अध्यक्ष होते; तसेच कायदेमंडळातील काँग्रेस पक्षाचे नेते होते. त्याच कारणाने ते मुख्य मंत्री पण होते. या त्रिविध सत्तेमुळे त्यांचे स्थान अलौकिक होते. त्यांची सत्ता अमर्याद होती; व एवढी सत्ता हातात असल्यानंतर थोडी कमी सहिष्णुता दृष्टीस आली असल्यास आश्चर्य मानण्याचे कारण नाही. सरदार पटेल असेपर्यंत निश्चितपणे त्यांचा सल्ला नेहरूंना अनिवार्य वाटत असे. त्यांच्यानंतर तशी काणी व्यक्ती राहिली नाही. मौलानासाहेबांना ते विचारीत, त्यांचे मत घेत, तथापि त्यांनी जे ठरविले असेल त्यात बदल करणे घडून आले असे क्वचितच ! आपले मत स्पष्ट सांगणारी मंडळी अपवादात्मक होती. काही महत्त्वाच्या प्रसंगी चर्चा जरा गरमागरम होई,– पण शेवटपर्यंत विरोध ठेवणारा एखाददुसराच असे. पण त्याचबरोबर असेही म्हटले पाहिजे की, ज्याने पटेल अशा युक्तिवादाने एकी ठेवली पाहिजे या खोट्या प्रतिष्ठेने भावनेला बळी न पडता विरोध केला त्या विरोधाला पंडितजी समजू शकत होते, व अनेक प्रसंगी त्यांनी आपले पूर्वग्रह सोडून निर्णयात कमी-जास्त केले, असे घडून आले आहे. सुरवातीला सर्व महत्त्वाचे प्रश्न व नेमणुका मंत्रिमंडळापुढे येत, पण त्यानंतर मोठ्या नेमणुकांच्याबाबत मंत्रिमंडळाला माहिती देण्यात येई. त्या नेमणुका चर्चेचा विषय नसत. परराष्ट्रीय राजकारणाबाबत पंडितजी हे तज्ज्ञ आहेत अशी बहुतेकांची श्रद्धा असल्याने प्रथम काही दिवस मंत्री हे केवळ श्रोते-स्वरूपी होते. पुढे पुढे एखाददुसरा विरोध करी, पण त्याचा परिणाम झाला नाही. जे निर्णय चर्चेच्या तोरणाखालून न जाता होत त्यांचा परिणाम पुढे काय झाला हे सर्वज्ञात आहेच. जे काँग्रेस पक्षातील नव्हते ते क्वचितच मोकळ्या मनाने बोलत, व ज्या एका प्रसंगी श्यामाप्रसाद मुखर्जी स्पष्ट बोलले त्याचा शेवट त्यांच्या व नियोगींच्या राजीनाम्यात झाला. श्री. गोपाळस्वामी हे वयाने ज्येष्ठ, अनुभवाने मोठे. राज्यशासनाचे तंत्र त्यांना अधिक अवगत होते. तथापि त्यांच्या मनात असलेला विरोधी विचार वाचेतून बाहेर पडताना मुख्य मंत्र्यांच्या पाया-

कडेच लक्ष ठेवून वाटचाल करी. जे काँग्रेसचे होते ते काँग्रेसच्या शिस्तीच्या परंपरेत वाढले असल्याकारणाने श्रेष्ठी जे करतील ते मान्य असा सर्वसाधारण त्यांचा दृष्टिकोण होता. काना-मात्रा-वेलांटी हीसुद्धा नम्रतेने सुचविण्यात त्यांचे सारे वाक्पाटव खर्च होई. श्री. वल्लभभाई हे मंत्रिमंडळात क्वचितच बोलत, पण त्यांचा सल्ला आधी तरी घेतलेला असे, व निर्णयाचे चिरे कोठे रोवावयाचे हे ठरलेले असे. प्रत्यक्ष चर्चेत काही अकल्पित घडून आले तर विषय तहकूब करावा अशी सूचना ते करीत, व पुढील सभेपर्यंत विरोधातील जे ग्राह्य असेल तेवढे घेऊन त्याप्रमाणे निर्णय घडवून आणीत. राजकीय बाबतीत सरदारांशी मतैक्य व आर्थिक बाबतीत पंडितजींशी मतैक्य असे असणारा एकच इसम म्हणजे प्रस्तुत लेखक होता; आणि या दोन पहाडांतून आपल्या विचारगंगेला घाट काढीत काढीत पुढे नेण्याचे कठीण कार्य त्याचे होते.

* * *

मंत्रिपद घेतले त्या वेळी कै. नारायण मल्हार जोशी यांनी संयुक्त जबाबदारीसंबंधी काही उपदेश केला होता. नानासाहेब जोशी हे आन्तरराष्ट्रीय ख्यातीचे मजूर-पुढारी होते. अनेक आन्तरराष्ट्रीय परिषदांच्या कार्यकारी संस्थांतून त्यांनी कार्य केले होते. इंग्लंडमधील मजूरपक्षाशी व त्या पक्षातील नेत्यांशी त्यांचे संबंध दृढ होते. वाचन, विचार व अनुभव या तिन्ही दृष्टींनी ते ज्येष्ठ असल्याने त्यांच्या उपदेशाचा जास्तीत जास्त फायदा प्रस्तुत लेखक करून घेत असे. जबाबदारी संयुक्त असल्याने व जथीमथी असल्याने श्रेयात ज्याप्रमाणे वाटणी त्याचप्रमाणे दोषातही वाटणी व्यावी लागते. १९४७ च्या अखेरच्या दोनतीन महिन्यांत हिंदूंच्या विरुद्ध व हिंदू संस्कृतीच्या विरुद्ध पंडितजींनी जी भाषणे केली ती प्रक्षोभकारी होती, व अनेकांच्या मते त्यांत हिंदूंच्यावर अन्याय होत होता. हिंदू राज्य स्थापावयाचे आहे, असा वारंवार आरोप करून जखमी झालेल्या हिंदू मनाला थोडेसे मीठ चोळल्यासारखे होत होते; आणि त्याबाबत प्रस्तुत लेखकाने त्यांना लिहिले, व त्यात त्यांचा हिंदूंच्याबद्दल गैरसमज आहे, असे दाखविण्याचा प्रयत्न केला होता. त्यात सत्य व तर्क यांना धरून जे विवेचन होते त्यात अल्पसंख्याकांना न्याय मिळाला पाहिजे व अभय दिले पाहिजे या आग्रहाबरोबर त्यांनीही बदल-

लेला जमाना लक्षात घेऊन आपले दृष्टिकोण जुळवून घेतले पाहिजेत असेही विचार मांडले होते. अर्थात हे पंडितजींना पटले नाही व त्यांनी मंत्रिमंडळ हे एकमताचे असावे असे प्रतिपादन केले. प्रस्तुत लेखकाने पंडितजींना दिलेल्या उत्तरात आपण मंत्रिमंडळातून बाहेर पडण्यास तयार आहोत, असे सूचित केले होते. त्यानंतर लियाकतअली व नेहरू यांच्या कराराबाबत मंत्रिमंडळात चर्चा झाली त्या वेळी त्यातील दोन कलमांबाबत प्रस्तुत लेखकाने विरोध केला. त्या कलमांचा परिणाम मुसलमानांना निश्चित प्रमाणात कायदेमंडळात, नोकऱ्यांत, व मंत्रिमंडळांत जागा राखून ठेवण्याकडे होणार होता. वादविवादात रंग भरला. गोपाळस्वामी यांनी शब्दरचना बदलतो असे सुचविले. प्रस्तुत लेखकाने जे आहे ते काँग्रेसच्या व राष्ट्रीयत्वाच्या मौलिक तत्त्वाविरुद्ध आहे, तेव्हा शब्दरचना बदलून भागणार नाही; चपटे नाक व किलकिलीत डोळे रंग फासून बदलणार नाहीत असाही युक्तिवाद केला. वल्लभभाईंनी चर्चा तहकूब करावी अशी सूचना केली. ती मान्य झाली. दुसरे दिवशी वल्लभभाईंची व माझी चर्चा झाली. त्यांना माझे म्हणणे पटले, व संध्याकाळच्या सभेत ते दोन आक्षेपार्ह परिच्छेद गाळून टाकून कराराचा नमुना मांडण्यात आला.

आणखी एक प्रसंग पाक–हिंदुस्थानमधील नदीच्या पाण्यासंबंधाचा होता. पाण्याचे पैसे दिले नाहीत म्हणून पंजाब सरकारने पाणी बंद करावे, असे मंत्री या नात्याने प्रस्तुत लेखकाने सुचविले, व तशी सूचनाही कराचीकडे गेली. पाकिस्तानने, तसे झाले तर जगातील शान्तता धोक्यात आहे, अशा अर्थाचे निवेदन भारत सरकारकडे धाडले; व त्यावर विचार करण्यासाठी पंजाबचे मंत्री, पंजाबचे इंजिनीयर, पंजाबचे गव्हर्नर, पंडितजी, राजाजी, गोपालस्वामी, प्रस्तुत लेखक, व अनेक आय्. सी. एस्. ऑफिसर जमले होते. पाकिस्तानचा हा कांगावा आहे, व पाकिस्तान केलेला करार मोडू इच्छिते असे वादविवादात स्पष्ट करण्यात आले; इतकेच नव्हे तर प्रस्तुत लेखकाने प्रथम भारताला न्याय मिळाला पाहिजे, व नंतर अन्यांना औदार्य दाखविण्याचा प्रश्न उपस्थित होतो, असे या चर्चेच्या वेळी सांगितले. अर्थात पंडितजी या विरोधाने संतापले, व पंतप्रधान या नात्याने आपल्याला निर्णय घेण्याचा अधिकार आहे असे म्हणाले. त्यावर प्रस्तुत लेखकाने उत्तर दिले

की, जे अधिकार आहेत ते घटनेप्रमाणे आहेत, व घटनेप्रमाणे मंत्र्यालाही आपले मत स्पष्ट सांगण्याचा अधिकार आहे. चर्चेनंतर जो निर्णय होईल तो सामुदायिक असतो, व तो जर एखाद्या मंत्र्याला पसंत नसेल तर त्याचा मार्ग उघड असतो. पंडितजी दृढ व निश्चयपूर्वक विरोधाला मानतात. तथापि मुख्य प्रधानाला कोठल्याही मंत्र्याचा राजीनामा मागण्याचा हक्क आहे असे त्यांनी विधान केले. त्याबरोबर प्रस्तुत लेखकाने तो हक्क मान्य केला; व राजीनामा देण्याची तयारी दाखविली. मंत्री म्हणजे होयबा नव्हे हेही नम्रपणे सांगितले. अनपेक्षित परिणाम झाला, व प्रस्तुत लेखकाचा दृष्टिकोण मान्य करण्यात येऊन त्याप्रमाणे पाकिस्तानला उत्तर देण्यात आले.

* * *

अशाच दहा-पाच घटना या पाच वर्षांत घडल्या होत्या; व पंडितजींनी मोठ्या मनाने झाले गेले विसरून जा, असेही सांगितले होते. त्यांचे हृदय विशाल आहे, मन मोठे आहे; पण अनियंत्रित अधिकारप्राप्तीनंतर विरोध सहन होत नाही, रास्त टीकासुद्धा मानवत नाही, हा अनुभव सामान्य माणसांच्या चारित्र्यात दिसून येतो;—तसाच तो थोडासा पंडितजींच्या बाबतीतही येऊ लागला होता. ते द्वेषविरहित होते, अंतःकरणाने सहानुभूतिपूर्ण होते; पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुत्सद्देगिरीपेक्षा राजकारण त्यांच्या वागण्यात अधिक येऊ लागले होते.

या काळात नियोगी, श्यामाप्रसाद हे नेहरू-लियाकत पॅक्टनंतर राजीनामा देऊन बाहेर पडले. देशमुख, मेहताब व मुन्शी हे मे १९५० मध्ये मंत्रि-मंडळात आले. मुन्शी आपल्या बुद्धिमत्तेला पडदानशीन ठेवावी अशा मताचे नव्हते. ते स्त्री-स्वातंत्र्याचे भोक्ते असल्याने बुद्धिमत्तेला ते वाटेल तेथे वावरू देत. प्रसिद्धीशिवाय कार्य नाही ही लोकशाहीतील प्राथमिक दृष्टी त्यांना होती. कोठल्याही घटनेत आपण असावे असे त्यांना वाटे. फोटो काढणारा फोटो काढलेल्या दृश्यात नसतो, पण मुन्शींची किमया अशी होती की हेही ते घडवून आणीत. त्यांचा आर्थिक दृष्टिकोण पंडितजींशी जुळणारा नव्हता. तथापि अशा प्रश्नांना जेव्हा गंभीर स्वरूप येई त्या वेळी ते मौनाचा आश्रय करीत. शक्य तेवढे जुळवून घेण्याची त्यांची प्रवृत्ती कलात्मक होती. इतके

करूनही पंडितजींना ते आत्मसात करू शकले नाहीत, व पंडितजींनाही त्यांच्याबाबत निर्धास्तपणा वाटला नाही, असे अनेकांना त्या वेळी वाटले होते. मेहताब हे गर्जत, गाजत आले; पण हिशेबी व हिकमती नसल्याने त्यांचे वागणे चमत्कारिक वाटे. आपण मंत्री असेपर्यंत तोंड उघडणार नाही अशी जाहीर प्रतिज्ञा करून दोन वर्षांच्या कारकीर्दीत कोठल्याही प्रश्नावर त्यांनी तोंड मिटून घेतले असे घडले नाही. चिंतामणराव हे नोकरशाहीच्या शिस्तीत वाढलेले, व त्यांच्या विचारांची पावले ते चाचपून चाचपून टाकीत; आणि आपल्या विषयाबाहेर ते बोलत नसत. त्यामुळे त्यांची प्रतिष्ठा सर्वत्र वाढत होती. ते नेहरूंच्या इतके जवळ गेले की, जे अतिजवळ झाल्याने होते तेच त्यांचे झाले. थोड्या कालान्तराने झाले एवढेच ! लियाकत-नेहरू करारानंतर डॉ. मथाई हेदेखील निवृत्त झाले, आणि तेही पंडितजींच्या अतिजवळ गेले तेव्हाच घडून आले. प्रस्तुत लेखकाने कामाशिवाय कोणाकडे जावयाचे नाही ही वृत्ती ठेवली होती. किंबहुना त्याचा तो दोष असेल; त्यात अभिमान नव्हता, पण आपल्या कार्याबद्दल व आपल्या कर्तृत्वाबद्दल कदाचित अधिक विश्वास असेल. पाच वर्षांच्या या काळात खटके झाले नाहीत असे नाही, पण मर्यादातिक्रमण झाले नाही. बाबासाहेब आंबेडकर हे सभेच्या पूर्वी रागावत. सभेच्यानंतर नाराजी प्रकट करीत, पण चर्चेच्या वेळी शान्तिब्रह्म असत. वणिक जन हा ' आदौ नम्रः पश्चात् नम्रः कार्य मध्येतु कर्कशः ' असा असतो. बाबासाहेब हे कार्यामध्ये मृदू, अबोल, पण उपक्रम-उपसंहारात स्पष्ट बोलत. परंतु हे सारे बोलणे अप्रभावी ठरे.

वल्लभभाई १९५० च्या डिसेंबरमध्ये वारले, व निवडणुका १९५१ मध्ये व्हाव्यात असे प्रथम विचार होते. दिल्लीहून अखेरचे प्रयाण करण्याच्या आदल्या दिवशी प्रस्तुत लेखकाला त्यांनी ताबडतोब बोलावले व त्याप्रमाणे ११ डिसेंबर १९५० ला त्यांच्या बंगल्यावर संध्याकाळी प्रस्तुत लेखक गेला. भेटीत ते म्हणाले की, " आता मी जाणार ! " त्यावर प्रस्तुत लेखक म्हणाला की, " किती तरी गोष्टी आपण ठरविलेल्या करायच्या आहेत." त्यावर त्यांनी उत्तर दिले की, " आता मला ते शक्य नाही ! " आणि प्रस्तुत लेखकाजवळ वचन मागितले की, " कितीही मतभेद झाला तरी तू नेहरूंना सोडू नकोस ! "

प्रसंग कठीण होता. हे वाक्य उच्चारण्यापूर्वी चार वर्षांचा इतिहास त्यांच्या डोळ्यांपुढे होता. अभिमान व निःस्पृहता यांतील झगडे खास त्यांच्या डोळ्यांपुढे असले पाहिजेत; आणि जे वचन ते मागत होते ते त्यांच्या दृष्टीने राष्ट्रहिताचे होते, याची जाणीव प्रस्तुत लेखकाला एका क्षणात झाली. मोठी जबाबदारी वचन देण्याने येणार होती. तथापि प्रस्तुत लेखकाने मृत्युमुखी असलेल्या त्या महान व्यक्तीला– देशाच्या स्वातंत्र्याच्या व ऐक्यतेच्या शिल्पकाराला ते वचन दिले ! ते वचन किती पाळले हे पुढील इतिहासावरून माहितगार व सूक्ष्मदर्शी व्यक्तींना ठरविता येण्यासारखे आहे. दिलेल्या वचनाने लेखकाच्या मनाला मोठे बंधन बसले, आणि ते त्याने खुषीने पत्करले असल्याकारणाने ते मानण्याची जबाबदारी त्याच्यावर अधिक होती.

* * *

१९५१ साली टंडन-प्रकरण उपस्थित झाले. वास्तविक सोक्षमोक्ष जुलै ५१ मध्येच बंगलोर येथील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या गुप्त बैठकीतच व्हावयाचा. त्या वेळी प्रस्तुत लेखकाने प्रश्न चर्चू नये असा ठराव आणून तो प्रसंग टाळला. राजाजींनी अभिनंदन केले. बंगालचे राज्यपालपद घेण्यासाठी राजाजी निघाले त्या दिवशी म्हणजे १४ ऑगस्ट १९४७ रोजी विमानतळावर प्रस्तुत लेखकाला बाजूला नेऊन पटेल व पंडित यांच्यात संघर्ष निर्माण न होईल असे वातावरण राखण्याची जबाबदारी त्यांनी मजवर टाकली होती. त्या बाबतीत मी बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालो होतो. सरदारांनी मागितलेल्या वचनानंतर सरदारांचा स्वार्थत्याग, त्यांच्या मनाचा मोठेपणा, त्यांची विशाल दृष्टी यांचा खरा साक्षात्कार मला झाला. जर्मनीला कमी लेखून बिस्मार्कने स्वतःला मोठे केले, असा इतिहासाचा अभिप्राय आहे. येथे सरदारांनी स्वतःला मागे ठेवून, स्वतःचा अभिमान बळी देऊन देशाचे हित साधले,– आणि स्वातंत्र्याला प्रतिष्ठा दिली. या सर्वांचा परिणाम प्रस्तुत लेखकाच्या मनावर झाला होता. मंत्रिपदाचे कार्य करताना अनेकांना त्याने नाराज केले होते, काही मंत्र्यांनासुद्धा ! परिशिष्टापेक्षा जास्त फर्निचर घेतले म्हणून अगर जास्त वीज वापरली म्हणून पैसे वसूल केले याचाही राग अनेकांना होता. सभासदांनी पोटभाड्याने बंगले दिले होते म्हणून व ते कृत्य

अयोग्य आहे असे म्हटले म्हणून काहींचा राग होता. लोकशाही राजकारण म्हणजे हेवेदावे, स्पर्धा, मत्सर, या गोष्टी अपरिहार्य असतात. कोणाला मंत्री व्हावयाचे होते, त्याच्या मार्गात प्रस्तुत लेखक अडचण आहे असे काहींना वाटले. कोणी तरी प्रस्तुत लेखकाला गव्हर्नर करावे असे पंडितजींना सुचविले असे कळले, व हा मार्ग औषधाशिवाय खोकला काढण्यास योग्य आहे असेही त्यांना वाटले असण्याचा संभव आहे. निवडणुकीचा निकाल जानेवारी १९५२ च्या १२ तारखेस लागला होता. निवडून आलो होतो. अनेक निवडणुकींचे निकाल व्हावयाचे होते. तथापि दिल्लीत पोचल्याबरोबर एका सभासदाने गव्हर्नरपद स्वीकारावे असे सुचविले. सदरहू गृहस्थाचा स्वभाव मला माहीत होता. तो नृपांगणगत होता हेही माहीत होते. तथापि एप्रिलमध्ये प्रस्तुत लेखकाला पंडितजींनी विचारले, व त्यांना त्याने असे सांगितले की, "नवीन व्यवस्थेत दोन सभागृहे आहेत. शासनाची तीन प्रमुख क्षेत्रे,—मंत्रिमंडळ, दूत, व राज्यपाल! या तिन्हींबाबत संपूर्ण चित्र दिले गेल्यास व ते ठीक आहे असे वाटल्यास प्रस्तुत लेखक सांगाल ते काम करण्यास तयार आहे. पण पाच वर्षे त्यांची सेवा करण्याचे मतदारांना दिलेले वचन मोडणे कठीण आहे. मंत्रिपदाची अभिलाषा नाही. सामान्य सभासद राहून जे कार्य करता येण्यासारखे आहे ते केले जाईल." पुष्कळ मंडळींकडून सांगून झाले, पण प्रस्तुत लेखकाचा निश्चय कायम होता, व त्याचे आश्वासनही कायम होते. कोणत्याही पदाची अभिलाषा बिलकुल नव्हती. पाच वर्षांच्या बंदिवासातून मुक्तता होत आहे, हे पाहून त्याच्या मनाला बरे वाटले. थोडी प्रसन्नता पण आली, व सारे संबंध लक्षात घेता पुनर्निर्युक्ती नाही, राज्यपालपद घ्यावयाचे नाही ही गोष्ट विचारात घेऊन त्याने आपल्या योजना आखल्या होत्या. ११ मे १९५२ रोजी मी केलेल्या सहकार्याबद्दलचे आभारनिदर्शक पत्र मला आले. त्यात थोडी औपचारिकता होती, तथापि भावनाही व्यक्त केल्या होत्या. पूर्वीच्या पत्रांतून एक वर्ष तरी राज्यपालपद स्वीकारावे असाही आग्रह होता. त्यालाही मी निश्चयाने नकार दिला होता. तात्पर्य, नियुक्ती झाली नाही याचे आश्चर्य लोकांना वाटले, परंतु प्रस्तुत लेखकाला मात्र मुळीच वाटले नाही; आणि म्हणून अतिशय शान्त चित्ताने ११ मेची रात्र त्याने काढली. नाशिकच्या तुरुंगात १९३३ साली असताना एक मुसलमान झालेला

पारश्री गृहस्थ राजकीय कैदी होता. सुटण्याच्या दिवशी सकाळी त्याला सहबंद्यांनी विचारले की, तुला रात्री झोप आली का? त्याने सांगितले की,

किसीकी शबे आखिर सोनेसे कटती है।
किसीकी शबे आखिर रोनेसे कटती है।
ए इलाही मेरी शबे आखिर।
न सोनेसे कटी न रोनेसे कटी।

त्याप्रमाणे विफलतेचा विचारही मनात आला नाही. उलट मनाला थोडा आनंदच वाटला. थोडी प्रसन्नता वाटली. रात्री झोप आली नाही हे खरे, पण रात्रभर विचारांच्या शय्येवर लोळत असल्याने मन सुखावले होते; व रात्र संपताच ते ताजे व कार्यप्रवण झाले होते. शरीरावर काहीच परिणाम झाला नव्हता, हे सांगण्याचे कारण नाही; आणि झेंडा व चक्र गेले यामुळे एक ओझे गेले असेच वाटले. आणि मोटरगाडीही त्याच दिवशी विकून टाकली. लोकसभेच्या अधिवेशनाला पायी गेलो, व ज्या उल्हासित वृत्तीने सेंट्रल हॉलमध्ये बसून गप्पा मारीत असे त्याच हॉलमध्ये अनेक मित्रांसमवेत गप्पा मारीत तो दिवस तेथे घालविला, व मंत्रिपदातील शेवटली रात्र व शेवटला दिवस याप्रमाणे इतिहासजमा झाला! त्याची ही आठवण व हा अनुभव कालपथावर नोंदविण्याचा प्रस्तुत लेखाने प्रयत्न केला आहे.

❀ ❀ ❀

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांत
अनुक्रम ..... वि: .....
आवृत्ति ..... नोंद दि: .....

रस्ता रुंदावला, पण...! : ३ :

मनुष्य काही ना काही इच्छितच असतो. जन्मल्यापासून तो अखेरच्या क्षणापर्यंत मानवी मनामध्ये १०० टक्के निरिच्छता आली आहे, असे क्वचितच घडून आले आहे. वसुदेवाच्या वासनेनेच जग निर्माण झाले आहे असे शास्त्र सांगते; आणि म्हणूनच वासना ही उत्पत्तीची प्रेरणा असल्याने स्थितीमध्येही तीच प्रभावी असते, व लयप्रसंगीही तिची हजेरी अभिव्यक्ती करण्यास असमर्थ असलेल्या मनात असते. कारण मरणाच्या वेळी जी वासना असते तिचेच बोट धरून अमर आत्मा देहाला पुनर्जन्म घ्यावयास लावतो. वासनेवर संपूर्ण विजय मिळविलेले असे महात्मे निश्चित ऐकिवात आहेत; चालू संसारात ते भेटत नाहीत. प्राण आहे तोपर्यंत वासना आहे, इच्छा आहे. एक मिळाले तर सहस्र असावेसे वाटते, आणि ते मिळाले तर लक्ष असावेसे वाटले. त्याला अंत नाही अशी वाट मानवी मनाने जन्मतःच स्वीकारलेली असते. अडचण आली की ती दूर व्हावी, दूर झाली म्हणजे संतोष वाटतो. आणि संतोषाबरोबर असंतोषाची छाया माणसाच्या पडछाये-प्रमाणे मागे येतेच. पुत्रासाठी नवस करावेत, आणि त्यानेच माता-पित्यांना निर्वासित करावे, हा अनुभव अपरिचित नाही. मोठ्या प्रेरणेने साहित्य-रचना व सन्मान्यतेची शिखरे दिसू लागावीत, आणि रचना प्रसिद्ध होताच टीका-कारांनी ती सारी शिखरे स्वप्नातील ठरवावीत, हाही अनुभव अपरिचित नाही. बिचाऱ्या महंमदाचे उदाहरण देऊन त्याची नालस्ती केली आहे! मनोरथांचे मनोरे रचण्यासाठी मानवाला शाळेत जावे लागत नाही, शिल्प-शास्त्राचा अभ्यास करावा लागत नाही. त्याच्या शरीराला जशी त्वचा, त्याप्रमाणे त्याच्या मनाला मनोरथ असतात. त्यात स्वाभाविकपणा आहे, आणि जेव्हा मनोरथांचा नंदादीप दीर्घकाळ संभाळून आता त्याच्या प्रकाशात

काही सांगता, काही सिद्धार्थ दिसणार असे वाटू लागावे, तसे घडावे,– आणि त्यातून अकल्पित असे, न अपेक्षिले असे दुःख निर्माण व्हावे. ही परिस्थिती अधिकच प्रक्षुब्ध करणारी असते. मनाप्रमाणे दान पडावे, आणि ते पडूनसुद्धा बाजू अंगावर यावी, असेही अनुभव मानवी जीवनात येतात. मानवी मन हे सामान्यपणे एकाक्ष असते; आणि त्याला आपण चुकलो आहोत, अगर आपण जे सांगत आहोत त्याला दुसरी बाजू आहे, हे वाटतच नाही. लग्न ही सोडत म्हणतात. ज्यांचे झाले नाही ते व्हावे अशी इच्छा करतात, व ज्यांची झाली आहेत ते त्या जन्मठेपीतून बाहेर निघू इच्छितात! हक्काचे घर असावेसे वाटते, आणि ते झाल्याचे समाधान वाटताच घरघर सुरू व्हावी. घुशीपासून अनिमंत्रित पाहुण्यांपर्यंत अगर अतिथीने भंडावून सोडावे असेही अनुभव तुरळक नाहीत. घर बांधावे,– वळचणीच्या पाण्याबद्दल भांडण सुरू होते, चारी बाजूंनी आपल्या घरात राहून आपण घेरले गेलो आहोत, जणू काही जगाने आपल्या विरुद्ध कट केला आहे असे वाटू लागते, आणि असेच उद्विग्न विचार गेल्या कार्तिकी प्रतिपदेच्या मंगल प्रसंगी माझ्या मनात गोंधळ करू लागले.

१९२० साली ऑगस्टमध्ये वकिलीची पाटी लावली. आणि आळीतील कोपऱ्यावर माझ्या एका मित्राने थोड्याच महिन्यांत आपलीही पाटी लावली. आम्ही शाळेत असताना या रस्त्यातून लहान मुले जातात–येतात; सबब गाड्या सावकाश चालवाव्यात अशा पाट्या होत्या. आम्ही वकिली सुरू करताच 'या बोळातून अशिले जातात-येतात, सबब गाड्या सावकाश चालवाव्यात.' अशी पाटी लावण्याचे ठरविले होते. १९२०–२१ साली आमच्या पाट्या लागल्या. कोणी अशिले फारशी फिरकली नाहीत. आणि जी गल्लीत येत ती फार दीर्घदृष्टी. त्यांना गल्लीपलीकडील वकील दिसत, आमच्या पाट्या त्यांना दिसत नसत. "दूरस्थः पर्वतः रम्यः!" हेच खरे. त्या वेळी आमच्या रस्त्याला इतक्या खांचाखोचा हात्या की, दोन्ही बाजूंच्या रस्त्याला सरळ केले असते तर अर्धा मैल रस्ता रुंद झाला असता. जी रुंदी त्या वेळेला होती ती एवढी होती की, समोरच्या माडीत सहज उडी मारून जाता यावे. समोरून दोन गाड्या आल्यास मार्ग बंद होई, एवढेच नव्हे तर, शब्दाशब्दी, प्रसंगी मारामारी होऊन वकिलीच्या धंद्यासाठी कच्चा माल

तयार होई. वास्तविक आमची ही वस्ती इतिहासप्रसिद्ध श्रीमंत पेशव्यांच्या मावश्या व मेव्हणे यांनी एके काळी गजबजून सोडली होती, आणि मेहुणपुरा हे नाव यथार्थ केले होते. आता येथे नुसतीच मेहुणे राहात होती. आता श्रीमंतांच्या स्वाऱ्या येत नसत, सूर्यपान कलगीचे हालताना दिसत नसे, आणि रात्री मोठा प्रकाश दिसला म्हणजे ओंकारेश्वराची महायात्रा कोण्या भाग्यवंताची निघाली, असेच आढळून येत असे! असा आमचा हा रस्ता मृत्यूचा मार्ग आहे, आणि येथील लोकांचा शेजार मृत्यूशी आहे. ज्या काळाची गोष्ट मी सांगत आहे, तो काळ म्हणजे या विसाव्या शतकातल्या पहिल्या पाव शतकाचा. या वस्तीजवळ मुला-मुलींच्या शाळा असल्याने सकाळी मास्तरणींचा तांडा दिसे, व ११–१२ वाजता नदीवर धुण्यासाठी नेल्या जाणाऱ्या महिषींच्या तांडा दिसे. आणि यांपैकी कुणीही रस्ता अडविला असला म्हणजे लज्जेने अगर भीतीने माणसांना पुढे पाऊल टाकणे अडचणीचे वाटे. लहानपण याच क्षेत्रात व त्याच्या नजिक गेल्याने, व वकिलीत अकलेपेक्षा दैवाने हात दिल्याने याच रस्त्यावर असलेले एक पडके घर मी विकत घेतले, आणि १९२४ मध्ये मी ते एखाद्या चतुर व धोरणी माणसाप्रमाणे बांधले. रस्तारुंदी होणार म्हणून आधीच घर मागे घेतले होते, आणि कोच बाहेर काढला होता. जणू काही ओबडधोबड चेहेऱ्यामागे शान्त चित्त, व्यवस्थित विचार असावे, असे हे चित्र झाले. घरासमोरचा रस्ता ७ फूट ९ इंच होता. आणि अगदी घरासमोर जे दोन वाडे होते ते नातेवाइकांचे होते. त्यांतील एक वाडा तर इतका जुनाट झाला होता की, त्याच्या वरच्या दोन्ही मजल्यांनी "नन्ना म्हणते मान" अशी स्थिती निदर्शित केली होती. २४ साली घर बांधल्यानंतर अनेक राजकीय पाहुणे, अनेक परप्रान्तांतील लोक मजकडे येऊ लागले, इतकेच नव्हे तर, महात्मा गांधी सोडल्यास माझ्या या "प्रासादा"तील आतिथ्याचा परिचय बहुतेकांना आला आहे. मी प्रासाद का म्हणतो, तर प्रासादाला काँग्रेसच्या राज्यात पर्णकुटी म्हणतात. तेव्हा माझ्या पर्णकुटीला प्रासाद म्हणण्याचे मी ठरविले आहे. काही पुण्यातील चिर–परिचित निंदकांनी त्याला मुळशी–महाल नाव दिले होते. पण त्यांनाच आढळून आले की, आपण केलेली निंदा ही असत्य होती, व अनेकांनी खेदही व्यक्त केला. तात्पर्य, नाव काही का

असेना, माझ्या घरासमोर गर्दी होऊ लागली, आणि रस्तारुंदी ही केवळ वैयक्तिक गैरसोय न ठरता ती सार्वजनिक गैरसोय ठरू लागली. म्युनिसिपालिटीकडे चौकशी केली. तेथे रस्तारुंदीमध्ये समोरची बाजू येत आहे हे कळले. पण 'पुणे म्युनिसिपालिटी'चा कारभार हा एक नाटकाचा विषय झाल्याने मी त्याबद्दल अधिक काही लिहीत नाही. परवानगी घेऊन घर बांधले असतानासुद्धा बिगर परवानगीने बांधले म्हणून मला नोटीस देण्यात आली. मी उत्तर दिले की, "परवानगी दिलेली आहे. पण खटला करायचा झाल्यास सध्या मे महिना आहे; व तुरुंगाची सवय आहे, आणि सवड पण आहे" अर्थात पुढे काही झाले नाही, पण या विनोदाने रस्तारुंदीचे प्रकरण घायाळ झाले!

१९२८ मध्ये मी म्युनिसिपालिटीत निवडून आलो. समोरील नातेवाइकांनी आता आमची घरे हा पाडणार अशी अस्वलाआधी आरोळी ठोकली. मी तसे काही केले नाही. इतकेच नव्हे तर, वर्षभर कमिटीचा उपाध्यक्ष असूनसुद्धा या प्रश्नाला हात घातला नाही. तथापि, न केलेल्या पापाबद्दल शिव्या, व न केलेल्या पुण्याबद्दल स्तुती ही दोन्ही अनुभवली आहेत. तसाच अनुभव याही बाबतीत आला. कालान्तराने मध्यवर्ती कायदे मंडळात निवडून आलो, रस्ता अरुंदच; स्वातंत्र्याच्या लढ्यात नायक झालो तरी रस्ता अरुंदच; मध्यवर्ती मंत्रिमंडळात मंत्री झालो तरी रस्ता अरुंदच! कधीकाळी पुणे म्युनिसिपालिटीला सुबुद्धी होईल, आणि ४० वर्षांपूर्वी निश्चित झालेली रस्तारुंदीची योजना कार्यान्वित होईल, या आशेवर मी जिवंत राहिलो होतो. "पियामिलनकी आस!" अशी स्थिती होती. मूळ मालकांची तिसरी पिढी सुरू झाली, आणि त्यांनी सारी जुनी वास्तू काढून टाकून तिचा कायाकल्प केला. आणि जेव्हा चंदीगढहून ढाला फिरवून दक्षिणेस परत आलो, त्या वेळेला रस्ता रुंद झालेला आढळून आला, आणि वाइटातून चांगले निघते त्याप्रमाणे पानशेतच्या घटनेने झाले. पानशेतच्या पुराने आमच्या आळीत १० फूट पाणी आणले; आणि पडझड तर एवढी केली की, त्या घटनेनंतर ८ दिवसांनी मी पुण्यास आलो त्या वेळी कोठल्या तरी उद्ध्वस्त शहराला भेट देत आहेसे वाटले. तथापि, चंदीगढहून आलो तेव्हा रस्त्यामधील घाण नेली गेली होती, आणि ज्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
94868

आळीत एकही सायकलचे दुकान नव्हते त्या ठिकाणी चार दुकाने आढळून आली, एकही हॉटेल नव्हते तेथे दोन निर्माण झाली, आणि रस्त्यावरील रहदारी तर ४० वर्षांपूर्वी बुधवारात असे तेवढी आढळून येऊ लागली. नदीपलीकडील लोक पुण्यात येताना आमच्या गल्लीतील मार्ग पसंत करीत; कारण तो मंडईला जवळचा होता. आता हा स्मशानाचा रस्ता बाजाराचा रस्ता झाला होता, राजमार्ग झाला होता. रुंद झाल्यामुळे त्याचे नवे नवे उपयोग आळीकरांच्या प्रतिभेला जाणवू लागले. आणि माझ्या घरासमोर गेल्या वर्षभर आळीतील मोटरगाड्यांचे पार्क झाले आहे! अनिकेतन मोटरी निदान ३–४ तरी रात्री घरासमोर अंधारात चंद्रप्रकाशात आढळून येतात. अर्थात त्यांच्यावर म्युनिसिपालिटी नॉन गॅरेज टॅक्स बसवीत नाही. कारण सोयीसाठी कर बसवणे हा अन्याय आम्हा पुणेकरांना वाटतो, आणि आमच्या कॉर्पोरेशनला तर नक्की वाटतो. कॉर्पोरेशनचे कर कसे चुकवावेत याबद्दल सल्ला देणारे तज्ज्ञ पुणे शहरात आहेत. हा रुंदावलेला रस्ता आता दिवसा बालक-क्रीडांगण झाला आहे. मुला-मुलींच्या लंगडीपासून ते रणजी ट्रॉफीपर्यंतच्या स्पर्धा ह्या रस्त्यावर आता होत असतात. विटी-दांडूचा अभिमान धरणारे बालक हेही या क्रीडांगणाचा उपयोग करतात, आणि प्रसंगी विटी माझ्या दिवाणखान्यात येऊन– बॉब-हल्ला झाला तर काय होईल याचे प्रात्यक्षिक दाखवितात. सायकलच्या दुकानात तर सतत गडबड चालूच असते; पण फोनोग्राफ लावून सुरू केलेल्या गाण्यांनी जो कोलाहल उत्पन्न होतो त्यातून पळून जावेसे वाटते. वास्तविक हॉटेलमध्ये फोनोग्राफ वाजतात, ते जरा दूर असल्याने त्यांचा आवाज क्वचितच माझ्या घरापर्यंत येतो. ज्या गल्लीत २५ वर्षांपूर्वी १ वाण्याचे दुकान होते तेथे आता ८ झालेली आहेत. किंबहुना रस्त्यावरील तळमजल्यावर सामान्यपणे दुकान ही मुंबईची रीत येथेही आली आहे. आणि दुकान म्हणजे गिऱ्हाइक, आणि हिंदी गिऱ्हाइके म्हणजे मुकाट्याने सौदा करणे पाप मानतात. तात्पर्य, सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत पद्धतशीर रीतीने शान्तताभंग होत असतो. रस्ता रुंदावल्याने मोटरी जोरात जाऊ लागतात, आणि त्यांचे आवाज घरातील शान्तता नाहीशी करतात. शेख महंमदाप्रमाणे आता रस्ता रुंद झाला आहे, हवा-उजेड अधिक येईल, अधिक शान्तता लाभेल, या स्वप्नसृष्टीत मी होतो.

आणि नातू गडबड करतात म्हणून त्यांच्यावर लष्करी हुकूम गाजवतो. पण हा घरचा देशपांडे रस्त्यावर शक्तिपात झाल्याप्रमाणे वागतो. १५ मिनिटे-सुद्धा शान्तता मिळत नाही. सारे पुण्याचे वैभव याप्रमाणे निकाली लागले आहे. रस्ता अरुंद होता तेव्हा मोटर नसेच. क्वचित पुणेरी टांगा भेटे. जी माणसे भेटत ती आळीतील व ओळखीची; आता सर्व बदलले आहे. किती महत्त्वाकांक्षा धरून मी परत आलो होतो, किती किती लिहिणार म्हणून मनसुबे केले होते,– पण या रुंद झालेल्या रस्त्याने माझ्या साऱ्या आशा अरुंद करून कोंदाटून टाकल्या आहेत ! पूर्वी मन रुंद व विस्तारित होते. आता ह्या बाह्य परिस्थितीने त्याच्यावर विपरीत परिणाम झाला आहे. तात्पर्य, सुख मिळालेसे वाटते, व ते पदरात पडणार तोच गुंगारा देते, क्षितिज जवळ वाटते, आणि जसे त्याच्याजवळ जावे तसे ते लांबतच जाते, आणि नवीन प्रश्न उत्पन्न करते. रस्ता अरुंद होता तेव्हा झाडाचे पेरू सुरक्षित होते, आता आळीतील मुलांनी चायनाचा धडा घेऊन पेरूच्या झाडावर सतत आक्रमण चालविले आहे. आणि मुत्सद्देगिरीने त्यांच्याशी तडजोड करून मी असे ठरविले आहे की, त्यांनी पिकलेले पेरू तोडावेत,– व निम्मे मला द्यावे ! आणि आता मी मुलांत लोकप्रिय झालो आहे हे सांगण्याचे कारण नाही ! तथापि रस्ता रुंद झाल्याने जुने प्रश्न जे मिटले आहेत असे वाटले ते मिटले नाहीत, व नवीन उत्पन्न झाले आहेत. " जगी सर्व सूखी असा कोण आहे ? "

❀ ❀ ❀

नामाचा महिमा : ४ :

तसे म्हटले तर नामस्मरणाची आणि माझी तोंडओळख आहे. लहानपणी रामरक्षा म्हणावी लागे. पण म्हणताना मन त्याची साथ करीत नसे. किंबहुना साऱ्या धार्मिक कार्यांत मनाने आचरणाशी साथ केली असे फार क्वचितच झाले. बोलण्याप्रमाणे चालावयाचे या सिद्धान्ताची ओळख संथेबरोबर लक्ष नेण्याच्या माध्यमाद्वारे लहानपणीच झाली. आणि त्यामुळे कर्तृत्वाच्या वयात पुढाऱ्यांचे मुख्य लक्षण म्हणजे बोलण्याप्रमाणे न चालणे हे अगदी साहजिकच व स्वाभाविक असेच माझ्या बाबतीत दिसून आले, असा काही टीकाकारांचा अभिप्राय आहे. तसे म्हटले तर संस्कृत पाठशाळेत रूपावली–समासचक्र येथपर्यंत प्रगती केली होती, व ऋग्वेदी पाठशाळेत संध्या पुरी करून रुद्राच्या पहिल्या अन्वयापर्यंत पल्ला गाठला होता. पण गुरुपौर्णिमेच्या प्रसाद-वितरणात गुरूंच्या पक्षपाती धोरणामुळे वेदपठणाकडे या मानी लेखकाने पाठ फिरवली होती. तथापि वेदपठण जरी झाले नाही तरी वेदगायनाची गोडी मनाच्या रक्तात भिनली होती. आणि घरी व अन्यत्र वसंतऋतूत व अन्य प्रसंगाने "म्हणणे" होई तेथे मी हिज मास्टर्स व्हॉइसच्या चित्रातील प्राण्याप्रमाणे धुंद होऊन ऐकत असे. आणि ही गोडी पुढील आयुष्यातही कायम राहिली. कोठे सामगायन झाले म्हणजे मी जातो. कोठे होत असले तर ऐकत राहतो,– आणि तसे करण्यात परिस्थितीचा विचार माझ्या मनात येत नाही. स्वयंहीसुद्धा मधून मधून सतात वेदपठण करणारे मिळाले म्हणजे यथाशक्ती मी करीत असतो. आधुनिक ज्ञानाने मी संपन्न फारसा झालेला नाही. तथापि २५ च्या उमेदीत पुण्यातील वातावरणात बुद्धिवादाचा झटका येऊन गेला होता. श्रद्धा व बुद्धी, निष्ठा व तर्क यांचे तुंबळ युद्ध मनाच्या कुरुक्षेत्रात काही काळ चालू होते, आणि पुणेरी कुस्तीप्रमाणे ती कुस्ती

निकाली झाली नाही पण बरोबरीनेही सुटली नाही. मनाचे कुरुक्षेत्र थोडे धर्मक्षेत्रच ठरले. आणि मार्कोने का होईना निष्ठेचा व श्रद्धेचा जय झाला. पिढ्यान् पिढ्यांची संस्कृती प्रभावी ठरली; आणि ती स्थिती आज आहे. रस्त्यातून जाताना देऊळ लागले तर लाज न मानता नमस्कार करतो. उत्सव-प्रसंगानिमित्त दर्शनाला जातो. नास्तिक शास्त्रज्ञापासून परवाक्य प्रमाण-तंत्र शंकराचार्यांपर्यंत आदर व्यक्त करतो. क्षणभर श्रद्धेची काठी हातात घेऊन विचाराची पावले टाकीत टाकीत माझे मन ज्ञानाच्या क्षेत्रात सतत प्रवास करीत असते. आणि करमत नसले म्हणजे जसा दासबोध वाचतो त्याचप्रमाणे नातवंडे जवळ आली म्हणजे त्यांच्याबरोबर आश्रम भजनावलीतील पदे म्हणत असतो. 'रघुपति राघव राजाराम' म्हणत त्यांच्याबरोबर न कळत साभिनय म्हणत असतो. प्रसंगी नाचतही असतो. 'मन नामी रंगले' अशी श्रेष्ठावस्था होत नसली तरी त्या अवस्थेच्या जवळ जातो. पुढल्या पल्ल्याची महत्त्वाकांक्षा बाळगतो. ज्ञानाचा विस्तार आता अनंत पटींनी होत आहे. सप्तभवने ओलांडून ते आता पलीकडे गेले आहे. तथापि पूर्णविराम म्हणून ज्ञानाच्या वाक्याला माहीतच नसतो. ज्ञान मनाला शंकेखोर करते आणि शंका मग प्रस्थापित मूल्यांबद्दल असलेला आदर कानसतो. शंकेच्या बाजारात मग श्रद्धेची नाणी अवमूल्यित होतात आणि मग माझ्यापुढे पुन्हा काही तरी पेचप्रसंग निर्माण होतो. 'दुर्बलके बल राम' हे तत्त्व मग मला संजीवनीवत वाटते, आणि त्या संजीवनीच्या द्वारा लटपटणारे पाय स्थिर होतात. भटकणारे विचार संध्याकाळ होताच आकाशगत पक्षीगण जसा घरट्याप्रत येतो त्याप्रमाणे ते मनातच स्थिर होतात. समुद्रात गगनभेदी लाटा-सुद्धा समुद्रातच स्थिरावतात. समुद्राची मर्यादा त्या कधीच ओलांडीत नाहीत. आणि भजनाचेही असेच आहे. टाळ-मृदंगांसहित गायले काय,– एकतारी-पासून सारंगीपर्यंतची साथ घेऊन गायले काय,– त्याचा खरा आनंद गाणाऱ्याच्या मनालाच होतो. इतरांना त्याचे नादमाधुर्य चाखता येते. त्यातील अध्यात्म गायकाच्या मनातच विराम पावते. तसेच नामाचे आहे. नामाचा महिमा मनाला वयपरत्वे अधिकाधिक साक्षात्कार देत असतो. आणि त्याही दुखण्यात असेच झाले. १९६० चा ऑगस्ट महिना होता. चंदीगढच्या राजभवनात होतो. आणि संध्याकाळी दिल्लीला जाऊन, विमानाने

मुंबईला येऊन पुण्यास यावयाचे होते. सारा बंदोबस्त झाला होता; पण दैवाने आपल्या नकाराधिकाराचा (Veto) उपयोग केला, आणि चकरा येऊ लावल्या. उलट्या सुरू झाल्या. डॉक्टरांची धावपळ सुरू झाली; मी हाय्यागत झालो; आणि त्याही अर्धवट अवस्थेत नामजप करीत होतो. तो निर्हेतुक होता अशी साक्ष माझे मन देत आहे. माझ्या आजारीपणामुळे पुण्यातील कार्यक्रम रद्द झाले. वर्तमानपत्रात गाजावाजा झाला, आणि ५–६ दिवसांनी अकल्पितपणे गणेशशास्त्री जोशी यांचे पत्र आले. त्यात त्यांनी शतायू होवो असा आशीर्वाद दिला होता. सामान्यपणे असल्या आशीर्वादात औपचारिकता असते, ती त्यात नव्हती. कारण त्याच पत्रात त्यांनी निदान ५ मिनिटे तरी दररोज विष्णुसहस्रनाम वाचावे अशी इच्छा नव्हे आदेश प्रकट केला होता. गणेशशास्त्री जोशी म्हणजे पुण्यातील एक नामांकित वैद्य; काढेचिराइती वैद्य नव्हेत,– तर व्युत्पन्न, संस्कृतज्ज्ञ, चिकित्साशास्त्र जाणणारे अस होते. वैद्यक व्यवसायाबरोबर व्यवहारातही ते लक्ष घालीत. काँग्रेसच्या कार्यक्रमात अनेक वेळा कारागृहात आमच्याबरोबर होते. कारागृहात मिळणाऱ्या रुक्ष अन्नाला मुऱ्यांच्या पाल्यापासून ते केळ्यांच्या सालीपर्यंत लोणची अगर चटणी करून ते रुचिरता आणीत. अन्यथा असह्य होत असलेले जीवन ते नाना तऱ्हेंची सारे करून रसपूर्ण करीत. घरी शिष्यांना पढवीत. शुद्ध आयुर्वेदाचे ते पुरस्कर्ते होते, निःस्पृह होते, व्यवहारदक्ष होते. आणि गांधीवादी असल्यामुळे आदराला व टीकेला एकाच वेळी विषय झाले होते. त्यांची दिनचर्या वाग्भटाने सांगितलेल्या दिनचर्येप्रमाणे होती. आणि केव्हा तरी ५०–५१ साली मला ते म्हणाले की, "मला मोठी काळजी लागून राहिली आहे." मी म्हणालो, "सुख तुमच्या आश्रयाला आले आहे. कारण ते तुमच्या मात्रेला भिते,–काढा– निकाढ्याला घाबरते!" तेव्हा ते म्हणाले की, "यमापुढे मोठा प्रश्न पडला आहे की माझ्यावर मृत्यू कसा कब्जा करणार?" मी त्यांना म्हणालो, "सारे वैद्य व वाग्भट यांना त्यांनी आपल्या दावणीला दामटले आहे. महाप्रतापी राजांना धुळीत खेळवले आहे. कोणाची कीर्ती तो काढू शकत नाही तेवढीच त्याची उरली आहे. त्याचे गुप्त दूत केव्हाच तुमच्या जीवनात शिरलेले असतील." अर्थात हा सर्व विनोद होता. आणि ५२ साली सोम-

नाथाला ते गेले असताना घेरी आली व असे आढळून आले की, त्यांना मधुमेह झाला आहे. नंतर आयुर्वेदाच्या उपचाराने ते बरे झाले. पुन्हा मिष्टान्न सुरू केले. "कर्माणुसारिणी बुद्धि" ते टाळू शकले नाहीत. मधुमेह पुन्हा उमटला. मग अंगठ्याला ठेच लागल्याचे निमित्त झाले, तो कापला. मग मांडी कापली, दुसऱ्या पायाची मांडी कापली, आणि ७–८ वर्षे त्यांनी अथरुणात काढली. आणि त्या स्थितीत त्यांना रामनामाने समाधान दिले होते. माझी आजारीपणाची हकीकत ऐकून रामनामाचे औषध जे आयुर्वेदात नाही, युनानी पद्धतीत नाही, पाश्चात्त्य पद्धतीत तर नाहीच नाही,– असे ते औषध त्यांनी मला सांगितले होते. त्याला पथ्य नव्हते. स्थल व काल यांच्या मर्यादा नव्हत्या. त्याचा गुण १८ पुराणांनी गाइला होता. साधुसंतांनी त्या या महिम्यावर सारे साहित्य उधळले होते. आणि विवेकी वार्धक्य त्या औषधाला अनादी कालापासून शरण जात होते. त्या रामनामाने पाषाण तरले, पापे भस्म झाली, असे मी लहानपणी कीर्तनांतून व पुराणांतून वाचले होते. ज्ञानेश्वरीतील नाममाहात्म्य काव्यमय डोळ्यापुढे होते. नामाच्या प्रभावापुढे योग निरुपयोगी ठरला. दमाला दमण्यासाठी काही राहिले नाही. शमाला काय शमवायचे याची पंचाईत पडली. तीर्थक्षेत्रे उजाड झाली. कारण रामनामामुळे पापविमोचनार्थ क्षेत्रांना जाण्याची आवश्यकताच उरली नाही. भूलोकी वैकुंठ आल्याने वैकुंठाची पेठ ओस पडली– असे काव्यमय वर्णन शास्त्रीबुवांचे पत्र वाचताच डोळ्यांपुढे आले! एवढ्या वयोवृद्ध चारित्र्यसंपन्न पुरुषाकडून आलेली सूचना मी नाकारणे शक्य नव्हते. नित्याच्या ग्रंथवाचनात आणखी एका ग्रंथवाचनाची भर पडणार होती. मनाने ते स्वीकारले, पण मनाचा वाटाड्या विवेक याने सांगितले की, वैद्य व डॉक्टर यांची औषधे सोडू नकोस, आणि त्याचप्रमाणे वागण्याचे ठरविले. अंथरुणावरूनच मुंबईतील स्नेह्याला विष्णुसहस्रनामाची पोथी धाडण्यास सांगितले. शास्त्रीबुवांना उत्तर टाकून आभार मानले, व त्यांची सूचना अमलात आणीन असे आश्वासन दिले. ७–८ दिवसांत मी बरा झालो. तळमजल्यावरील कचेरीत बसू लागलो, आणि एका सुप्रभाती मुंबईच्या स्नेह्याकडून विष्णुसहस्रनामाची पोथी तसेच शंकराचार्यांनी भाष्य केलेली विष्णुसहस्रनामाची पुस्तिका टेबलावर प्रायव्हेट सेक्रेटरींनी आणून ठेवली.

त्याचबरोबर काही पत्रे आली. आणि त्याच डाकेने गणेशशास्त्री जोशी यांच्या चिरंजीवांचे पत्र आले की, ती. अण्णांचे देहावसान झाले! एकाच वेळी या दोन घटना झाल्या. गणेशशास्त्री यांनी लौकिकदृष्ट्या राम म्हटले, आणि मला विष्णुसहस्रनाम म्हणण्याची संधी दिली. हा विचित्र नामाचा महिमा झाला. तथापि या घटनेचा परिणाम असा झाला की, अन्यथा अनुशासनतेने जे विष्णुसहस्रनाम वाचले असते ते श्रद्धेच्या सौरभाने दररोज वाचीत आहे– निष्कामबुद्धीने!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नोंद दि: .....

' कूस ' : ५ :

प्रवास ही एक मोठी प्रयोगशाळा आहे. आणि या प्रयोगशाळेत व अन्य प्रयोगशाळेत फरक एवढाच की, या प्रयोगशाळेत जे घडत असते ते आपण घडवून आणलेले नसते. प्रसंगी घटनेमध्ये आपण भाग घेत असतो. विनोबा म्हणतात त्याप्रमाणे जग ही एक स्फूर्ती आहे. ब्रह्म सत्य आहे; पण जग हे मिथ्या नाही. ते एक स्फूर्तीचा श्रोत आहे, आणि जीवन म्हणजे अखंड संशोधन आहे. नाना प्रसंग येतात, नाना लोकांशी संग घडतो, आणि हजारो हातांनी किंवा अनंत हस्ते कमलावर अनुभवाची संपत्ती देत असतो. काही ती केवळ निरीक्षणाने मनाच्या खजिन्यात जमा होते. काहींवर थोडा संस्कार करावा लागतो. सरकारी कचेरीत ज्याप्रमाणे संशयित नाणे वाजवून घेतात, अगर संशयित नोटा बारकाईने पाहून घेतात, तसे पण थोडे करावे लागते. जीवन हा अखंड प्रवाह आहे. कोठे कमी वेगाने, कोठे जास्त वेगाने, कोठे किंचित स्थगित झालेला, तर कोठे खळबळीने वाहणारा– असे त्याचे स्वरूप असते. नित्य बदलणारे त्याचे स्वरूप असूनसुद्धा न बदलणारे नित्य असेही काही त्यात असते. आणि जेव्हा तुम्ही नेहमीपेक्षा किंचित निराळ्या परिस्थितीच्या कालपथावरून अगर संदर्भात जात असाल, त्या वेळी असेच काही क्षण येतात की, तुमच्या नित्याच्या अनुभवाला व स्थायी मूल्यालाही धक्का देतात.

असेच थोडेसे त्या दिवशी घडले. उत्तर हिंदुस्थानातील एका इतिहास-प्रसिद्ध भूमीवरून मी जात होतो, व नेहमीप्रमाणे संध्याकाळच्या वेळी सामान्य नागरिकाप्रमाणे सहल करीत होतो; आणि आपणास कोणी ओळखणार नाही ह्या विश्वासाने जात असता अचानक एका सद्गृहस्थाने ओळखले. आग्रह करून पल्लीकडच्या गल्लीतील आपल्या घरी नेले. त्याच्या त्या किंचित

लहान, पण प्रशस्त खोलीत खुर्चीवर बसलो, आणि भिंतीवरील चित्रांकडे नजर टाकीत होतो. त्या भिंतीवर क्रान्तिकारकापासून सनदशीर नेत्यांपर्यंतची चित्रे होती. गल्लीतील घर असल्याने शान्तता होती, आणि माझा यजमान माझी सरबराई करण्यासाठी म्हणून हलवायाच्या घरी गेला होता असे उघड दिसत होते. शेजारच्या घरात बायकांची मैफल जमली आहे व त्या बोलत आहेत असे आढळून आले. मी बसलो होतो तेथून त्या मला दिसत नव्हत्या आणि मीही त्यांना दिसत नव्हतो. त्यांची भाषा मराठी नव्हती; पण पंजाबी-मिश्रित हिंदी होती. बोलण्याच्या ढबीवरून हिंदू व शीख दोन्ही समाजांतील त्या स्त्रिया होत्या असे माझे अनुमान होते, व ते अयोग्य नव्हते. "कळलं का तुम्हांला? नचमचा पत्ता नाही, बिचाऱ्याचं नुकतंच लग्न झालं होतं." दुसरी म्हणाली, "शेजारचा हरनाम मारला गेल्याचीही वार्ता आली आहे, आणि तो आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता." तिसरी म्हणाली, "माझे दोन्ही मुलगे लढाईवर गेले आहेत, व तिसरा जाण्याचा हट्ट घेत आहे. काय करू?" एवढ्यात चौथी म्हणाली, "शहाणी असशील तर त्याचं लवकर लग्न करून टाक, म्हणजे तो लढाईवर जाणार नाही." आणि ती काय उत्तर देणार हे ऐकण्यासाठी माझे कान उत्सुक झाले होते. जो विषय त्या मैफलीत चर्चिला जात होता, जो आज साऱ्या भारतात आणि भारतातील काही प्रदेशात घरोघर चर्चिला जात होता. ज्या प्रदेशात मी हे ऐकत होतो त्याची परंपरा पराक्रमाची व साहसाची होती. शतकेच्या शतके तेथील प्रजेने शिथियन, शक, तार्तर, मोगल, अफगाण आणि इंग्रज ह्या सर्वांच्या छळाला तोंड दिले होते. साहस हे सहज होते. खळबळ ही स्वाभाविक होती. कोठलाही अपमान अगर अन्याय सहन करणे हे त्या प्रदेशातील प्रकृतीला कुपथ्य होते. "ललकार करून दुष्मननं बाजी मारून नेली, आणि तुम्हांला वाटतं का माझा मुलगा ह्या परिस्थितीत लग्नाला तयार होईल?"

दुसरी म्हणाली, "आता परिस्थिती बदलली आहे. दुष्मन मागं गेला आहे, आपला झेंडा परत लागला आहे." त्यावर पहिली म्हणाली की, "हे सर्व त्याला माहीत आहे, आणि त्यानं मला सांगितलं की, 'असा प्रदेश भारतानं घेऊ नये.' पोरगा बेताल आहे आणि तो म्हणाला की,

" कौरवसभेत द्रौपदीला केसाला धरून दुःशासनानं ओढून आणलं व तिनं प्रतिज्ञा केली, की भीम जेव्हा दुःशासनाला ठार करील तेव्हाच त्याच्या रक्तानं माखलेल्या हातानं तो माझी वेणी घालील. बोला, मी त्याच्यापुढं काय सांगू ? " उघड दिसत होते की, भारताच्या इभ्रतीचा, प्रतिष्ठेचा बदला घेण्यास उत्सुक झालेले त्या जाट तरुणाचे रक्त लैला–मजनूचा किस्सा गिरवण्यास तयार नव्हते. त्यातच एक वृद्ध स्त्रीचा आवाज ऐकू आला. तिची आत्मकथा जणू काय ती सांगत होती, " माझे आजोबा, आजेसासरे, माझे वडील, माझे खाविंद, माझे भाऊ– ह्या साऱ्यांनी लढाईतूनच स्वर्गाची वाट धरली होती. माझी मुलं हेच करीत आहेत. नातूही तेच करू म्हणतात. दुनिया बिघडली आहे. जो शत्रू दिसत नाही त्याला कसं मारायचं ? आनंद म्हणत होता की, अस्मानात लढाई चालते. जमिनीवर प्रेतं पडतात. शाप देऊन मरावं तसे मरत आहेत. शत्रू सामने असता तर पराक्रम दाखवला असता. आता केवळ मरावं लागत आहे. खर म्हणाल तर परवा परत आलेले बहादुरसिंग म्हणत होते की, फाशी दिली असती तरी आमची प्रेतं नातेवाइकांना मिळाली असती. पण हे युद्ध काही और आहे. " आणखी एक आवाज आला की, " आता सारंच बदललं आहे. आपलं सरकार समर्थ आहे, ह्यावरही काही तरकीब काढील." एवढ्यात कोणी तरी खवचट आवाजात बोलले की, " सेनापतीच युद्ध चुकवून परत आला. तशीच काही तरकीब असेल." लागलीच दोन-तीन जणींनी ' अशी बगबग करू नको ' अशा अर्थाचे शब्द उच्चारले. माझी उत्सुकता त्यांची आता केवळ भाषणे ऐकण्याची नव्हती. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव पाहण्याची होती. परंतु ते शक्य नव्हते, आणि तसा काही प्रयत्न केला असता तर नुसता अनुचित नव्हे तर असफल झाला असता.

डोळ्यांना तेथे काही दिसले नव्हते. पुष्कळ वेळा अर्थ शब्दापलीकडे असतो, व आशय आवाजातून समजून येत नाही, आणि कितीही शब्द श्रेष्ठ व उत्कृष्ट असले तरी अर्थाच्या पवित्रतेला थोडे मलीनच करतात. आकाशातील गंगा शंकराच्या जटेत आली, पण जमिनीला भेटताच तिच्यात मालिन्य आले. तीच स्थिती पवित्र अर्थाची शब्दात अभिव्यक्त होताना होते. ज्ञानेश्वरीत म्हटले आहे की, ' शब्दमळाने मलीन न झालेला अर्थ, कर्णरूपी

हस्ताने मलीन न झालेला अर्थ अवधानाला अधीरता आली म्हणजेच कळतो.' आणि येथे तर सारे रसग्रहण व अर्थग्रहण करण्याचा माझा प्रयत्न केवळ अवधानावर अवलंबून होता. एवढ्यात कोणी तरी हजर असलेल्या एकीला म्हणाले की, "तू का बोलत नाहीस? गावात घराघरांत सर्व काही चर्चिलं जातं तरीसुद्धा तू मुखस्तंभ कशी?" इतक्यात दुसरी म्हणाली की. "वीस वर्षे लग्न होऊन झाली. ना मूल, ना बाळ. तिला मुलाचं काय कौतुक? न जिवंत असताना न मरताना." आणि क्षणात बिजली चमकून जावी, व जलाचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणे हुंदके येऊ लागले. बोलणाराने वर्मावर बोट ठेवले होते. पुरुषाला एक क्षण तरी अधिकार प्राप्त व्हावा असे वाटते. अधिकारप्राप्तीशिवाय त्याच्या जीवनाला पूर्णता येत नाही; त्याच्या महत्त्वाकांक्षेची सांगता होत नाही. अन्यथा पूर्ण असलेले जीवन अपूर्ण वाटते. त्याचप्रमाणे स्त्रीला मातृत्व न प्राप्त झाले तर सारे जीवन अपूर्ण वाटते. कोणाचे तरी देणे आपण चुकवीत आहोत अशी भावना सतावीत असते. आपली कूस अपूर्ण राहिली, आणि म्हणून एक न्यूनतेची भावना तिच्या जिवाला सतावीत असते; व त्यामुळे खिन्नता आल्यामुळे प्रसंगी मत्सर, जिभेला कडवटपणा, गुणग्राहकतेचा अभाव—असे सर्व मानसिक दोष मग तिच्यात दिसून येतात. दररोज दारावरून 'बाज, पाळणा, विणायचा आहे का?' असे ओरडत जाणारा मांग ज्या विचारलहरी वांझ स्त्रीच्या मनात उत्पन्न करतो तोही एक मानसशास्त्राचा म्हणून साहित्याचा विषय असतो. आणि हुंदक्यांवरून मला असे वाटले की, हुंदके देणाऱ्या त्या, मातृत्वाने अभूषित राहिलेल्या, अपूर्ण राहिलेल्या स्त्रीच्या मनात असेच काही तरी विचार आले असावेत. आणि मी अधिक कान टवकारून काय बोलणे चालले आहे हे ऐकण्यास उत्सुक झालो. "बेटी, तू दुःख का करतेस? परमेश्वरानं जे दिलं असेल तेच मानलं पाहिजे. त्यानं जितका काळ चुडे द्यायचे ठरविले असतील तितके काळच ते टिकतात. तो जिची कुस्व (कूस) भरतो तीच पुत्रवती होते. म्हणून बेटी, तू दुःख करू नको. ईश्वर सर्व काही भल्याकरता करतो." ह्या वृद्ध आवाजात हजारो वर्षांची भारतीय संस्कृतीची परंपराच समुदित झाली होती. आदी ते अंत टिकणारा दैववाद त्यात नव्हता; प्रयत्न करून विफलता आल्यानंतर दैवाला अगर देवाला शक्य मानावयाचे ही विवेकी

वृत्ती त्यात होती. आयुष्यामध्ये असे काही असते की, ते प्रयत्न करूनही प्राप्त होत नाही. आणि त्याचा दोष दैवावर टाकण्यात केवळ कापुरुषच प्रयत्न करतात असे नाही. आणि स्त्रीला मातृत्व न भेटण्यात तिचा काय अपराध ? तिचा काय दोष ? त्या म्हातारीच्या मनामध्ये हे सर्व विचार आले असले पाहिजेत. हिंदू संस्कृतीच्या परंपरेप्रमाणेच त्या म्हातारीच्या पुत्र-हीन स्त्रीने दैवतांचे पार झिजवले असतील, व्रत-वैकल्ये केली असतील ह्यात काहीच शंका नाही. म्हणून अपत्यहीनतेमुळे ती दुःखी झाली अशी त्या वृद्धेची समजूत झाली असल्यास नवल नाही. " माँ, मला पुत्र नाहीत म्हणून मी दुःखी आणि लग्नाच्या वेळी गुरुजनांनी व ब्राह्मणांनी दिलेल्या आशीर्वादानं जरी अष्टपुत्रा झाले असते, तरी आज मला ते जिवंत राहून देशासाठी न मरते तर आनंद झाला नसता. आणि जर ते मरते व ' वतना '-साठी ' शहीद ' झाले असते तर जे दुःख झालं असतं ते, ते मेले म्हणून नव्हे, तर मजजवळ देशासाठी देण्याकरिता नववा पुत्र नाही म्हणून झालं असतं. आता जे अश्रू पडत आहेत ते त्यासाठी आहेत. शंकरानं चांगुणेच्या भक्तीची परीक्षा करण्यासारखाच प्रसंग आज कैलासपतीनं भारतापुढं आणला आहे. आपल्या पुत्राचा वध करून त्याचं मांस शिजवून चांगुणेकडे परमेश्वरानं मागितलं, तसाच प्रसंग राष्ट्रापुढं आहे. सर्व मातांनी आपलं कर्तव्य समजलं पाहिजे. माँ, मी रडत आहे हे खर नाही. माझे अश्रू—या वेळी या बलिदानासाठी मला अगर मजजवळ पुत्र नाही म्हणून ते आहेत. आणि आज जर तो असता तर माझी कूस धन्य झाली असती... "

तिच्या भोवती जमलेल्या समवयस्क, लहान व मोठ्या अशा सर्वांच्या मनावर काय परिणाम झाला ह्याची कल्पनाच मला करवेना. माझ्या मनावर काय परिणाम झाला हे समृद्ध अशा मराठी भाषेतही सांगणे अशक्य आहे. ' माझी कूस धन्य झाली असती ' हे तिचे शब्द कानांत गुणगुणत असताच माझा यजमान चहा घेऊन आत आला, आणि डोळ्यांतील अश्रू पाहून जरा स्तिमित झाला. त्याने विचारले, पण मी सांगितले नाही. जे गुह्यात गुह्य असे ज्ञान पात्रता पाहूनच द्यावे असे भगवान म्हणतात. आणि त्या दृष्टीने मराठी माणसावरल विश्वास असल्याने अश्रुमिश्रित वरील शब्द वाचकांपुढे ठेवले आहेत.

❀ ❀ ❀

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम..... दिः .....
क्रमांक ..... नोंद दिः .....

मला भेट देत नाही : ६ :

मनुष्य हा एकाकी जन्मला असला तरी एकाकी राहात नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत कोणी ना कोणी तरी त्याला जवळ केले म्हणजे बरे वाटते. कोणाची तरी संगत असली म्हणजे त्याला समाधान वाटते. गुहेत राहणारा आद्य मानवसुद्धा एकाकी जीवनाला राजी नव्हता; नाइलाज म्हणून ते जीवन त्याने स्वीकारले होते. अंधाऱ्या कोठडीत असलेला कैदीसुद्धा आत येणाऱ्या चिमण्यांशी बोलत असतो, चुकून मांजर आले तर गोंजारीत असतो. तात्पर्य, १०० टक्के माणूसघाणी प्रवृत्ती माणसात नसते, असे म्हणता येईल. मनुष्य भेटीसाठी उत्सुक असतो, पुनर्भेट नकोही असते. नको असलेली भेटसुद्धा त्याच्या मनातील खोल खोल जागेत त्याला हवीशी वाटत असते. भेटी देणे आणि घेणे ही संस्था समाजातील एक मौलिक व सामाजिक जीवनाची आधारभूत संस्था आहे. त्याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक भेट परिचयपत्राच्या देण्याने सुरू होते. शंभरांतील ९९ भेटी अनौपचारिक असतात. त्या अनौपचारिक असल्यानेच त्यांचे महत्त्व असते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत घरी, द्वारी, रस्त्यात, संस्थांतून, वाहनांतून, प्रवासातून माणसे भेटतच असतात. पण पुष्कळ वेळा ती न भेटली तर बरे असेही वाटते. पण त्याचबरोबर भेटली नाही तर काही तरी चुकल्यासारखे वाटते. मंडईत जाताना कोपऱ्यावरील दुकानदार, पलीकडील पानपट्टीवाला जर एखाद्या दिवशी दिसले नाहीत तर नकळतच का होईना थोडे चुकल्यासारखे वाटते. दिवसभर घरी कोणीच भेटायला आले नाही तर मला करमत नाही, एरवी मुद्दाम थांबून कोणाशी न बोलता जाणारा मी, त्या दिवशी साधारण ओळखीच्या माणसाशीसुद्धा थांबून अगत्याने बोलतो. ज्या दिवशी घर बेलबाग होते, म्हणजे भेटणारांची गर्दी होते, त्या दिवशी जनसंबंध चुकविण्यासाठी जनसंमर्दात

जातो, म्हणजे रस्त्यातील गर्दीतून जातो, आणि जनाला विजन करतो. "मनमें चंगा तो खटीयाडमें गंगा"–मन चांगले असले तर कातडे धुण्याच्या पाण्यातदेखील गंगाजल दिसते, असेच थोडेसे आहे. अनेक वेळा कानावर शब्द आदळत असतात, लक्ष दुसरीकडे असते, पुराण ऐकणाऱ्या आजीबाई-प्रमाणे पुष्कळ वेळा जे ऐकू येत आहे त्याकडे इतके लक्ष असते की, शब्दाच्या एका काडीवर अर्थाचे माडी-महाल मी रचीत असतो. भेटीतील औत्सुक्य भेटीतच औदासीन्य आणते, व भेटीतील औदासीन्य भेटीतच औत्सुक्य व आपुलकी निर्माण करते. तसेच थोडेसे त्या दिवशी झाले.

त्या संबंधित दिवशी भेटणारे त्या वेळेला कोणी माडीत नव्हते, पण युगानुयुगांची मैत्री सांगणारे ग्रंथ सानेगुरुजींच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे "होते माझ्या निकट परि हे ग्रंथ कैवल्यधाम" आणि त्यामुळे त्यातील एकाच्या वाचनात मी गढून गेलो होतो. रस्त्यावर क्वचित क्वचित ओरड शरीराच्या कानांवर येत होती, पण माझे मन– आवाज बंद असल्याने तेथे त्याचा प्रवेश होत नव्हता. मला वाटते, तो ग्रंथ हिंदी होता, निरुक्ताचा होता, व अर्थात तो रुक्ष होता. काय असेल ते असो, जितका ग्रंथ रुक्ष तितका त्यात मी रमतो, आणि कदाचित अश्लीलतेविरुद्ध त्यामुळेच असण्याचा संभव आहे. तसा मी रसिक नाही असा कोणी आरोप करीत नाही. काही रंगलेल्या रात्री मी पाहिल्याच नाहीत असेही नाही. पण लौकिक व्यवहारात जसा उपद्व्यापी स्वभाव आहे, त्याचप्रमाणे ज्ञानाच्या क्षेत्रातही सरळ जाणे, व सहज असेल ते करणे हा स्वभावधर्म नाही. म्हणून जे अवघड असेल ते समजण्याचा प्रयत्न करावयाचा, जे समजत नसेल तेवढ्याला धक्का मारावयाचा, त्या ज्ञानवल्लीची पाने ओरबडावयाची, व उच्छिष्ट फळे फेकून द्यावयाची, अशा मर्कटलीला अनेक वेळा मनाने केल्या आहेत. सरळ अगर वाकडे, उथळ अगर खोल, जसा नदीचा प्रवाह पुढे पुढेच जात असतो, तद्वत गेल्या ४ तपांहून अधिक काळ माझी ज्ञानगंगा काल-सृष्टीतून वाट काढीत आहे, व त्या दिवशी असेच काही वाचीत असताना अचानक जिन्याच्या दारातून "साहेब, आत येऊ का?" असा आवाज आला. गेल्या कित्येक महिन्यांत "साहेब" पदवीने मला सोडले होते, आणि कोठे तिचा उपयोग होत असेल तर त्यामागे "काका" हे शब्द असत. ती उक्ती ऐकल्याबरोबर निरुक्ताचे

पुस्तक बाजूला ठेवून त्या उंच पण वृद्ध गृहस्थाकडे पाहू लागलो. पाहिलासा वाटे, पण नक्की कोण हे मन सांगू शकले नाही, व आता ह्या पाश्चिम वयात रस्त्यातून जाताना अनेक भेटतात, नमस्कार-चमत्कार होतो, आपुलकीने विचारपूस होते, त्यांच्या विचारण्यात आदर, प्रेम इत्यादी असतात, आणि मी त्यांना न ओळखल्याने हो हो म्हणत असतो. पुष्कळ वेळा मोठ्या धूर्तपणाने 'तुमची इनिशियल्स मी विसरलो हो!' असे म्हणतो, व बहुतेक आडनावासह ती ते सांगतात, व मग मला कोलंबसाला अमेरिका सापडल्याचा जसा, जेव्हा व जेवढा आनंद झाला, तेवढा आनंद होतो. पुष्कळ वेळा ही धूर्तता पुरी उपयोगी पडत नाही. आडनावाच्या सुताला धरून सत्याचा स्वर्ग गाठता येत नाही. कालान्तराने पाहात असल्यामुळे सर्व बदललेले दिसतात, ज्यांना अगदी लहानलहान पाहिल्या होत्या त्या आता प्रौढा अगर वृद्धा दिसतात. जी लहान मुले होती ती आता ताडाएवढी वाढलेली दिसतात, व स्वातंत्र्याच्या निशाणाबरोबर तारुण्याची निशाणी मात्र पूर्वीची जी असे ती दिसत नाही; त्यामुळे कोण किती वयाचा हे सांगणे मनाला कठीण होते, व 'अरे'ला 'अहो' म्हणून आदरविषयक संपत्तीचा निष्कारण खर्च होतो.

लहानपणीच्या बरोबरीच्या मुली आता अंमाजी झालेल्या दिसतात, आणि रस्त्यात भेटल्या म्हणजे आमच्या यमूचा मुलगा, अगर आमच्या वामनची मुलगी, अशी त्या बाल-भारतीयांची ओळख करून देतात. तात्पर्य, जे कालान्तराने पाहतो त्याची ओळख एकदम पटत नाही, आणि मग मनाचा गोंधळ होतो. दारात उभ्या असलेल्या व्यक्तीची पुसट आठवण होती, कोठे तरी त्याला पाहिले आहे एवढाच शोध माझ्या संशोधकी मनाला लागला. तथापि, अज्ञान प्रदर्शित करणे, व आपल्याला आठवण नाही ह्याची कबुली देणे, ह्या अपमानकारक अटी सामान्यपणे माझ्या मनाने जीवनात क्वचितच मान्य केल्या असतील. पुनः माझी धूर्तता माझ्या मदतीला आली व मी म्हणालो, "हल्ली कोठे असता?" त्यांनी तात्काळ सांगितले की, "येरवड्यातून पेन्शन घेतल्यानंतर मुंबईस मुलाकडे असतो." येरवडा शब्द उच्चारताच डोळ्यापुढे बंदिस्त जीवनाच्या आठवणी आल्या, व एका अर्थाने त्या शब्दाने गत जीवनाचे एक मोठे दालन उघडून दिले. क्षणात तो १९४२ मधील नोव्हेंबरच्या एका रात्रीचा प्रसंग आठवला. १९४२ च्या ९ ऑगस्ट

रोजी हजारोंनी आम्ही पकडले गेलो होतो. मुंबईला 'करेंगे या मरेंगे' अशी प्रतिज्ञा घेऊन पुण्यास येत असतानाच शिवाजीनगरजवळ पकडला गेलो, आणि येरवड्यामध्ये अनेकांबरोबर स्थानबद्ध झालो होतो. शिवाजी हे नाव अटकेबरोबर सुटकेशीही संबंधित आहे. दुसरे झाले नाही, पण ५० टक्के शिवाजीचे अनुकरण केले, असे कोणी विनोदाने म्हटले तरी अयोग्य ठरणार नाही. त्या नोव्हेंबरच्या रात्री तुरुंगातील काही राजकीय कैदी बहाद्दुरी करून पळून गेले होते, आणि जेलचे अधिकारी बेफाम होऊन मारहाण करू लागले होते. पुढारी या नात्याने समजूत करण्याचा प्रयत्न करीत होतो, एवढ्यात आमच्यांपैकी कोणी तरी एकाने पोलिसाच्या पटात शिरून त्याला खाली पाडले. त्याबरोबर मध्यस्थी करणाऱ्या मला लाठीचा प्रसाद मिळाला, डोके फुटले, धोका म्हणून झालेली पहिली शिट्टी कार्यान्वित असतानाच दुसरी शिट्टी झाली. त्याचा अर्थ म्हणजे येरवड्याबाहेरील सशस्त्र पोलिस आमच्या यार्डामधील फाटकाजवळ आले. आतील शिपायांचा प्रमुख एक पठाण होता. त्याने ताबडतोब सशस्त्र शिपायांच्या प्रमुखाला गोळीबार करण्यास सांगितले; व जेव्हा त्याला सांगण्यात आले की, माझेही डोके फुटले आहे तेव्हा त्याने सुपरिंटेंडेंट आल्याशिवाय गोळीबार करणार नाही, असे स्वच्छ उत्तर दिले,—तो चेहरा व दारात उभा असलेला चेहरा निमिषार्धात का म्हणा ना एक आहे, ह्याचा साक्षात्कार झाला. सत्ता असताना संयम राखणे, ही फार मोठी गोष्ट आहे. हत्यारी पोलिस अगर लष्करात असणाऱ्या मनुष्याने काही विचार करणे, हे त्याहून विरळा; आणि त्याचे त्या वेळचे शब्द पुनः मी ऐकत आहे असे वाटले. त्या वेळी माझ्या मनात असलेला त्या व्यक्तीबद्दलचा आदर आता २१ वर्षांनी पुनः जसाच्या तसा मनात अवतरला, आणि लागलीच त्या गृहस्थाला नावाने हाका मारून जवळ खुर्चीवर बसण्यास सांगितले, पण त्याने ते नाकारले. तो गादीवर बसला. मी त्याला पुनः पुनः शेजारच्या खुर्चीवर बसण्याचा आग्रह करीत होतो, त्यात त्याची कदर करणे याबरोबर माझी सोय करणे हाही हेतू होता. त्याचे बोलणे मला अधिक चांगले ऐकू आले असते.

पण "पायरीला पाय लावायचा नाही" हा त्याचा दृढनिश्चय जेव्हा पाहिला तेव्हा मी खुर्चीवर जरी असलो तरी मनाने व वाचेने खुर्चीवर नाही,

याची जाणीव ठेवून त्याच्याशी बोलू लागलो. सध्या काय करता ? वगैरे औपचारिक प्रश्न विचारून त्याच्या मनाच्या देवडीवरील औपचारिकतेच्या पाहारेकऱ्याला वाटेस लावले. कुटुंबियांची चौकशी करून जवळजवळ त्याच्या हृदयात प्रवेश केला. दारात उभा असताना त्याच्या चेहऱ्यावर असलेली किंचित रागाची छटा आता कमी झाली होती, किंबहुना आता नाहीशी झाली होती. पोहताना घाबरलेल्या माणसाला अंदाज घेताना पायाला जमीन लागली म्हणजे जसा आनंद होतो तसे थोडेसे त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागले होते. त्याला काही तरी तक्रार करावयाची होती. पण आता त्याच्या सांगण्यात तक्रारीचा स्वर दिसून येत नव्हता. वयाने तो वृद्ध होता. पहिल्या महायुद्धात नोकरी करून सैनिकी मानसन्मान त्याने मिळविले होते. त्या जीवनाची अस्मिता त्याच्या वागण्यात, बोलण्यात, रुबाबात दिसत होती. तो जे सांगत होता, ते कथन कथेचा विषय होण्यासारखे होते. पण त्याला कथा सांगावयाची नव्हती, त्याला जगाचा अनुभव सांगावयाचा होता. तो म्हणाला, " मी तुमच्या माडीत आलो, व तुम्ही माझे स्वागत केले, मला आनंद वाटला; पण ज्यांना मी उपयोगी पडलो त्यांनी मला भेटसुद्धा देण्याचे नाकारले. " आणि तो ती हकीगत सांगू लागला.

१९४२ च्या चळवळीत हजारो राजबंदी येरवडा जेलमध्ये होते, त्याचप्रमाणे मुंबई राज्यातील अनेक कारागृहांत होते, १९२० ते १९४४ पर्यंतच्या दोन तपांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत मुंबई राज्यातील बहुतेक कारागृहांत अभ्यागत म्हणून राहण्याचे भाग्य मला लाभले होते. त्याचप्रमाणे त्या वेळच्या मध्यप्रदेशातील दोन कारागृहांत दोन-दोन महिने मी काढले होते. आणि राजधानी दिल्लीत असलेल्या लाल किल्ल्याजवळील कारागृहात पण महिनाभर पाहुणचार स्वीकारला होता. सज्जन, सहानुभूती दाखविणारे जसे तुरुंगाचे अधिकारी असत, त्याचबरोबर सहानुभूतिशून्य, केवळ यंत्रवत वागणारे ह्यांचाही अनुभव होता. काही अधिक वागणारे पण भेटले होते.

जो इसम माझ्याशी बोलत होता, तो यंत्रवत वागत नसे; पण सावधगिरीने सहानुभूती दाखवीत असे. तुरुंगात प्रिय जनांचे पत्र येणे, म्हणजे केवढा आनंदाचा प्रसंग असतो ! पण ही पत्रे मूर्ख व बिनडोक साडेतीन इयत्ता पास झालेल्या कारकुनाच्या निग्रहणीतून येत असत, व प्रसंगी " मला

करमत नाही " हेही वाक्य आक्षेपार्ह मानले जाऊन त्या लेखणीबहाद्दराची तांबड्या शाईची लेखणी त्यावर फिरविली जाई. अशा वेळी तुरुंगातील एखादा-दुसरा शिपाई, एखादादुसरा अंमलदार गुपचुप पत्र आणून देई, त्या वेळी तो देवदूत वाटे. ते पत्र म्हणजे विवाहाची लग्नपत्रिकाच वाटे. परीक्षेच्या अभ्यासाचे पुस्तक जितके वेळा वाचले नसेल त्यापेक्षा अधिक वेळा अनेक राजबंदी असली पत्रे वाचीत, विसरत, पुनः वाचीत, इतकी महत्त्वाची, इतकी अमोल अशी त्यांना वाटत. १९४२ च्या चळवळीत सुरुवातीला तीन महिने पत्रव्यवहारच सरकारने मना केला होता. अशा वेळी असं एखादे पत्र म्हणजे कपिला-षष्ठीचा योगच होय. १९४२ च्या चळवळीत एक वर्षपर्यंत तर स्थानबद्धांना कोणाही नातेवाइकाची अगर मित्राची भेट होऊ दिली नाही. आणि अशा वेळी या तुरुंगातील अधिकाऱ्याने मोठ्या युक्तीने गुप्त भेटी अनेकांना मिळवून दिल्या. त्यात हा माझ्याशी बोलणारा अधिकारी होता. क्षणभर कृष्ण-रुक्मिणी यांच्यातील पत्रव्यवहार करणारा हा ब्राह्मण वाटला. इतकेच नव्हे तर, भेटी घडवून आणणाराही हा सज्जन अनकांच्या आदराला पात्र झाला होता. तो म्हणू लागला, " काकासाहेब, अहो, कित्येकांना मी भेटी घेऊन दिल्या, किती धोका मी पत्करला, पण आता हे गृहस्थ मोठे झाले आहत, मोठ्या पदावर आहेत, परवा मी भेटीस गेलो असता मला त्यांनी शिपाया-करवी सांगितले की, वेळ नाही. माझ्यासमोर अगदी सामान्य माणसे आत जात होती, भेट घेत होती. मी मात्र दाराशी उभा दोतो. " मी विचारले, " तुम्ही नावाची चिठ्ठी दिली का ? " त्याने उत्तर दिले की, " मी चिठ्ठी दिली. माझी कोठली ओळख आहे हेसुद्धा त्यात लिहिले होते. पण त्याचा उपयोग झाला नाही." मी म्हणालो, " × × × राव, तुम्ही ती ओळख दिली, त्यामुळेच तुम्हांला भेट मिळाली नाही. द्वारकेचा राजा झाल्यावर-सुद्धा कृष्णाने सुदाम्याला भेट दिली, त्याचे पोहे खाल्ले. पण असा एकच कृष्ण झाला. त्यानंतर कोणी झाला नाही. तुरुंगात केलेल्या ' तिकडम् ' गोष्टींची आठवण जाहीर रीतीने सांगावयाची नसते, अगर द्यावयाची नसते, ही मुत्सद्देगिरी त्या हडेलहप्पी सैनिकी अधिकाऱ्यात नव्हती. " यांना मी भेटी देवविल्या आणि आता मला हे भेट देत नाहीत." हे त्याचे शब्द माझ्या अंतःकरणात खोलवर गेले.

हिटलरला ज्यांनी श्रेष्ठ पदावर व सत्तेवर आणले, त्या सर्व नाझी, साथी व सवंगडी ह्यांना त्याने आठवणीच शिल्लक ठेवल्या. त्याच्या सत्तेच्या परिसरात पूर्वीचे धंदेवाईक हेच प्रमुख झाले. आणि हाच अनुभव जगाचा इतिहास सुरुवातीपासून देत आहे. एखाद्या सामान्य व्यक्तीला काही ना काही तरी निमित्ताने मोठेपण अन्यांनी द्यावे व ते एकदा प्राप्त झाले म्हणजे ज्यांनी त्यांची पालखी वाहिली, त्यालाच त्याने गचांड्या द्याव्या, हा अनुभव जागतिक आहे. हिंदुस्थान त्याला अपवाद नाही. किंबहुना साऱ्या सार्वजनिक जीवनाच्या क्षेत्रात विशेषतः राजकारणात कृतज्ञतेला वाव नाही व भाव नाही. पहिल्या महायुद्धानंतर फ्रान्समध्ये ज्याने संरक्षणासाठी अमोल कामगिरी केली, तो क्लेमन-को अध्यपदासाठी उभा राहिला आणि पडला. त्या वेळचे इंग्लंडचे प्रधान लॉईड जॉर्ज ह्यांनी त्यांना म्हटले की, "काय लोक कृतघ्न आहेत!" त्यावर त्याने उत्तर दिले की, "बाबा, राजकारणात कृतज्ञता नाही, स्वतःच्या स्वार्थासाठी व प्रगतीसाठी कोणालाही हाती घ्यावे, काम होताच सोडावे, तुडवावे, अगर घरी बसवावे; जमल्यास निःपात करावा!" आणि गांधींच्या भारतात असा अनुभव येईल असे वाटत नव्हते. पण गांधी-युगात राजकारणाचे अध्यात्म होण्याऐवजी अध्यात्माचे राजकारण झाले आहे. एका सामान्य माणसाला मंत्र्याने भेट नाकारणे, ह्यात विशेष काही आहे असे नाही. सर्वांनाच भेटी देऊ लागला तर कोणालाही भेटीसाठी तो शिल्लक उरणार नाही. तथापि आपत्काली, संकटकाली ज्याचे साहाय्य झाले, त्याला भेट न देणे, हे बरोबर नाही. माझ्यासमोर बसलेला गृहस्थ याचक नव्हता. वशिला लावण्यासाठी जाणारा तो नव्हता. एक मानवी भावना– आपल्यालाही मोठी माणसे ओळखतात, हीच प्रेरणा त्याच्या मनाची त्या वेळेला असली पाहिजे. निश्चितपणे त्याला बढती मागावयाची नव्हती; कारण तो वृद्ध होता. मुलांसाठी काही मागावयाचे नव्हते. कारण ती नोकरीत होती, मिळवती होती. "मीसुद्धा टिळकांबरोबर रत्नागिरीला शाळेत होतो," असे सांगण्यात अभिमान मानणारे व स्वतःला कृतार्थ समजणारे अनेक लोक होते. त्याचप्रमाणे मोठ्या गृहस्थाशी आपली ओळख आहे ते आपल्याला ओळखतात, ह्या भावनेत अनेकांना आपले सामान्य जीवन सांगतापूर्ण झाले असे वाटते. अशीच त्या गृहस्थाची भावना होती आणि त्याला आलेला

अनुभव मात्र त्याच्या वर्मी लागला होता, आणि त्याचे शब्द "मी त्यांना भेट देवविली, मला ते भेट देत नाहीत." माझ्या कानांवर विलक्षण प्रभाव गाजवीत होते.

एक सामाजिक प्रवृत्ती त्या शब्दांनी माझ्या विचारी मनापुढ आणली होती. सत्तेवर चढल्यानंतर धुंदी येते व विनम्रता जाते, ह्याचे एक उदाहरण तो देत होता. लोकशाही राज्यात जे त्याने सांगितले, ते विसंगत होते. थोडेसे विकृत होते. आज अशी स्थिती आहे की, नैवेद्य नेईल त्यालाच दर्शन घडते. रिक्त हस्ते जाईल तो रिक्त हस्ते परत येईल. किंबहुना दारावरील जय-विजय दर्शनही होऊ देणार नाहीत. आणि अशा तऱ्हेचे नाना विचार माझ्या मनात उत्पन्न होऊन मला अंतर्मुख बनवीत होते. ज्याने भेट नाकारली तो माहितीचा होता. थोडा संतापही आला, वाईटही वाटले; पण ह्या दोन्ही वृत्तींचे परिवर्तन मग विचारमंथनक्रियेत सुरू झाले. त्याचा परिणाम म्हणजेच इथपर्यंत लिहिले आहे, हा होय.

❀ ❀ ❀

खुल्क खुदाका, मुल्क बादशाहका, अमल ' कंपनी ' सरकारका : ७ :

१९५० साली साखर महाग झाली होती व वाटेल तितके पैसे देऊनही वाटेल तितकी मिळत नव्हती. जन्मभर साखर खाणारेसुद्धा सरकारची निंदा करीत होते. साखरेचे खाणाऱ्यालाही देव देत नव्हता. त्या वेळी जे लोकमत प्रक्षुब्ध झाले, भाववाढीविरुद्ध जे आन्दोलन झाले त्यातून राष्ट्राची प्रकृती व प्रवृत्ती दोन्ही दिसून आल्या. सरकारला सामान्य जगभर आलेले अनुभव-सुद्धा पटले नाहीत. अनुभव हा मार्गदर्शक असतो हेही सरकारने आपल्या कृतीने कधीच मान्य केले नाही. त्याचबरोबर प्रजाही खाजगी संसारात अनेक प्रसंगी आलेल्या अडचणी आपण सहनशीलतेने सहन करीत असतो, तेच सामाजिक जीवनातही करावे लागले हीही गोष्ट विसरली. माणसाने निश्चय केल्यानंतर तो अडचणीचे पर्वतसुद्धा उल्लंघितो. निश्चयाच्या प्रसादाने मूक वाचाळ होतात, पंगू मोठी यात्रा करू शकतात. पराक्रमी व प्रगतिपर राष्ट्रांचा इतिहास हेच सांगतो. स्वातंत्र्य हे क्षणाक्षणाला जागृत राहून अनुभवावे लागते. क्षणभर असे म्हटले तरी चालेल, की अधिकार व स्वातंत्र्य यांमधील लढा अनादिकालापासून चालत आला आहे. पाणी ज्याप्रमाणे पोकळी दिसताच प्रवेश करते, थोडा विरोध झाल्यास वळण घेऊन पुढे जाते, बारकेसारके खड्डे असल्यास ते भरून पुढे चालू लागते, मातीचा मृदू भाग निर्दयपणे बाजूला सारून पुढे सरकते, त्याप्रमाणे अधिकाराची प्रकृती असते. छातीठोक विरोध नसला म्हणजे अधिकाराचा रणगाडा बेगुमानपणे चेचीत जातो व जनता जर जागृत असेल, संघटित असेल व आपला विरोध स्पष्ट व निर्भीडपणे चावडीतून व चौकातून जाहीर करील तर अधिकार

नम्रतेने घेतो व काही तरी मार्ग काढून आपल्या अभिमानाला सुरक्षित ठेवीत असतो. अधिकार हा अनुभवाने शहाणा होत नाही व जनताही स्मृतीच्या दृष्टीने इतकी विसरभोळी असते की, ती झालेली दुःखे विसरून जाते. जखमा बऱ्या होताच भूतकालीन घटनांकडे ती पाहात नाही. लोकशाही राज्यव्यवस्थेत जनताच प्रभू राज्याचे स्वामित्व तिच्याकडे; पण प्रत्यक्ष अनुभव असा येतो की, "खुल्क खुदाका, मुल्क बादशाहका, अंमल कंपनी सरकारका." राज्य जनतेचे, सरकार बहुमत पक्षाचे, व प्रत्यक्ष अंमल बहुमत पक्षातील टगे व गुंड यांचा असतो. हा जगाचा अनुभव आहे. भारत त्याला अपवाद नाही. जनता सतत जागृत असेल तर जनतेचे स्वातंत्र्य राहील, तिचे दैनंदिन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

आज हे विचार सुचण्याचे कारण की, देशात पुन्हा आर्थिक परिस्थिती दोन पंचवार्षिक योजना पुऱ्या झाल्यानंतरही विशेष सुधारली आहे असा दावा सरकारसुद्धा करीत नाही. १९५० साली दिवाळीच्या सुमारास साखरेच्या टंचाईचा प्रश्न उपस्थित झाला असता प्रस्तुत लेखकाने 'तिखटा-मिठाच्या करंज्या खा' असा आदेश दिला होता. अर्थात त्यात अनेकांना विनोद दिसला. त्या घोषणेमागे जनतेने दृढ निश्चयाने वागल्यास ती आपले स्वातंत्र्य राखू शकेल व अधिकारावरही मात करील असा विचार होता. आज पुन्हा दिवाळीच्या सुमारास साखरेचे उत्पादन मुबलक असूनही कृत्रिम टंचाई व भलतीच भाववाढ झाली आहे, आणि असे म्हणावेसे वाटते, की १२ वर्षांत देशाच्या आर्थिक स्थितीबाबत जे काही झाले आहे ते शून्यवत ठरले आहे. केवळ साखरेचाच प्रश्न नाही. साखरेपासून साबणापर्यंत, कापडा-पासून कुंभारी खापरापर्यंत, प्रत्येक गोष्ट किमतीत महागली आहे, व गेल्या ४ महिन्यांत तर सर्वसाधारणपणे नित्योपयोगी वस्तूंच्या किमती १० ते १५ टक्के वाढल्या आहेत. उत्पादनाची किंमत वाढली नाही. कारण ती वाढण्यास वेळ लागतो, व विक्रीच्या किमती वाढत्या आहेत. सर्वसाधारण-पणे गेल्या ४ महिन्यांत देशातील प्रत्येक कुटुंबाला १० ते १५ टक्के जादा खर्च आला आहे, व साधारणपणे हिशेब करता जनतेची ३०० कोटी रुपयांची लूट झाली आहे, व हा सारा पैसा व्यापारी, दलाल व उत्पादक यांच्या हाती गेला. या रकमेतून कर मिळेल हेही खरे नाही. या गोष्टीचा

अधिक गंभीरपणे विचार व्हावयास पाहिजे. गेल्या १५ वर्षांचा इतिहास असा आहे की, किमतीमध्ये भरमसाट वाढ होत आहे, आणि उत्पादन जेवढ्या मोठ्या प्रमाणात व्हावयास पाहिजे तेवढ्या प्रमाणात होत नाही. निर्माण झालेल्या संपत्तीचा विनिमय न्यायाला धरून होत नाही. जे दृश्य दिसून येत आहे ते श्रीमंत अधिक श्रीमंत झाले आहेत. त्यातही अधिकाधिक श्रीमंत होणाऱ्यांची संख्या कमी कमी होत आहे. जे गरीब होते ते त्या स्थितीतच आहेत, अगर अधिक गरीब झाले आहेत. सरासरीचे वार्षिक उत्पन्न वाढले आहे. पण रुपयाची किंमत कमी झाली आहे. लोकसंख्येत भलतीच भर पडली आहे. तात्पर्य, कोणालाही जीवन सुखी व समाधानी वाटत नाही. आतापर्यंत असे म्हंटले जात होते की, हिंदुस्थान हा देश श्रीमंत व प्रजा दरिद्री अशा स्वरूपाचा आहे. आता देश समृद्ध झाला नाही. सापेक्षतेने लोक निरपेक्षपणे मोठ्या संख्येने दरिद्री झाले आहेत अगर राहिले आहेत. गावामध्ये १–२ घरे चांगली व नीट नेटकी असावीत, व बाकीची ९८ घरे कललेली, पडझड झालेली असावीत असे स्वरूप आजच्या भारतातील आर्थिक जीवनाचे आहे.

नियोजन अनिवार्य आहे, किंबहुना, भांडवलशाही समाजातही नियोजन असते. पण त्याचा हेतू उत्पादकांना जास्तीत जास्त नफा मिळावा हा असतो. लोकशाही व्यवस्थेतही खाजगी भांडवलदार हा उद्देश सफल करू शकले आहेत. राजकीय समतेमागे आर्थिक अन्याय व आर्थिक विषमता मोठ्या कौशल्याने राजकारण चालवीत आहे. भारतात समाजसत्तावाद साधण्यासाठी नियोजन स्वीकृत केले आहे, व ते लोकशाही पद्धतीने अमलात आणावयाची प्रतिज्ञा आहे. लोकशाही समाजसत्तावाद हा शब्दप्रयोग नाम व विशेषण असा न राहता लोकशाही हे स्वतंत्र नाम आहे असे मानले जात आहे, व लोकशाहीत समता व स्वातंत्र्य यांत समता झाल्यास स्वातंत्र्य कमी होते असा दावा सांगितला जात आहे. उत्पादनावर नियंत्रण, वितरणावर नियंत्रण, उपभोगावर नियंत्रण याचा अर्थ व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे अपहरण असा केला जात आहे. काही लोकांना वाटेल ते उत्पादन करण्याचे, वाटेल त्या भावात वाटेल तेथे विकण्याचे व वाटेल त्या प्रमाणात उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. समाजाचे संरक्षण हवे आहे. शासनाचे संरक्षण हवे आहे. पण सामाजिक

जबाबदारी त्यांना नको आहे. आर्थिक क्षेत्रात संपूर्ण स्वातंत्र्य याचा अर्थ सामाजिक जीवनात मूठभर श्रीमंत व सुखी आणि बाकीची बहुसंख्याक जनता दुःखी व कष्टी आहे. ही स्थिती योग्य असे स्वतंत्र पक्षाचे मत आहे. विद्यमान सत्ताधिकारी काँग्रेस पक्षाला समाजवाद हवा आहे. त्यासाठी नियोजन हवे आहे. पण ते अमलात आणण्यासाठी आवश्यक ती निश्चयबुद्धी नाही. किंवहुना, कित्येकांची दृष्टी काँग्रेस पक्षात राहून भांडवलवाल्यांचा फायदा करून द्यावयाची आहे. गेल्या १० वर्षांत अनेक बाबतींत उत्पादन वाढले. अधिक संपत्ती निर्माण झाली. पण ती कोणाच्या खजिन्यात गेली याची माहिती राज्यकर्त्यांना नाही. ही गोष्ट दक्षतेचा पुरावा खास नाही.

जर अन्याय होत आहे, व कार्यक्रम जाणूनबुजून असफल करण्यात येत आहेत असे म्हटल्यानंतर कोणीही कडक उपाययोजनेची अपेक्षा करील. तशी कडक उपाययोजना होत नाही आणि शेवटी भावनियंत्रणसुद्धा असे केले जाते की, जे अन्यायाने मिळविले आहे ते पचले जावे ! व पुन्हा भावनियंत्रण काढले जाते व पुनः पुन्हा तोच तोच प्रकार होत जातो. सर्वांचा अर्थ लोक हाच करतात की, कल्याणकारी राज्य ही एक प्रचंड थाप आहे, व समाजसत्तावाद हवा असे शासनात कोणालाही वाटत नाही ! ! या सर्वांचा परिणाम असा होत आहे की, लोकांच्या मनात अश्रद्धा उत्पन्न झाली आहे, व लोकांचा उद्धार व्हावयाचा तर काही तरी निराळे क्रान्तिकारक उपाय योजले पाहिजेत. समाजसत्तावाद म्हणजे आर्थिक नियोजन. कारण त्याच्याशिवाय सामाजिक न्याय मिळणार नाही, संपत्तीची विषम वाटणी टळणार नाही व नियोजन म्हटले, की वस्तूंवर त्याच्या उत्पादनावर, वितरणावर व अपभोगावर नियंत्रण आले. नियंत्रणाशिवाय नियोजन हे अशक्य आहे; व्याकरणाशिवाय भाषा, इतकी मूर्खता त्यात आहे. तथापि हे कळूनसुद्धा काही होत नाही, व त्याचे कारण एका दृष्टीने लोकशाहीची तथाकथित कदर ! जे आपल्याला हवे आहे ते करावयाचे असले म्हणजे बहुमतवाला पक्ष ते करून घेऊ शकतो, व नको त्याचा प्रतिबंधही बहुमताच्याच जोरावर करू शकतो. त्या बहुमताला हुकूमशाहीचा म्हणजे भांडवलशाहीचा दुर्गंध येतो. निवडणुकीत भांडवलवाल्यांकडून पैसे घेतल्यानंतर मतदानात भांडवलवाल्यांचे चित्र उमटले तर आश्चर्य नाही. म्हणून यावर एकच उपाय आहे की, सारे प्रमुख धंदे व सारे महत्त्वाचे

व्यापार यांची मालकी व नियंत्रण राष्ट्राचे असले पाहिजे. त्याचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे. हाच नेमका उपाय सध्याच्या राज्यकर्त्यांना नको आहे. अनेक विरोधी पक्षांनाही नको आहे; व त्यामुळे जनतेचा उद्धार होत नाही, व ही परिस्थिती कायम असेपर्यंत तो होणार नाही.

नियोजनाचे डंके सकाळ-संध्याकाळ वाजत आहेत. उत्पादनाची वाढ झाली म्हणून गीते गायिली जात आहेत. तथापि, संस्कृत सुभाषितात म्हटल्याप्रमाणे " मेघांनी दाही दिशा गर्जून सोडल्या आहेत, आवाजाने आकाश व्यापून उरले आहे, पण ! किमपि चातकचंचुकी साऽपि न भृता जलेन । " एवढा आवाज काढला पण चातकाच्या लहानशा चोचीत जलबिंदू काही पडला नाही. अब्ज अब्ज कोटी खर्च झाले, पण सामान्य माणसाचे जीवन नाममात्रसुद्धा अधिक सुखावह झाले नाही. जे दारिद्र्य होते ते कायमच आहे. केवळ सापेक्षतेने नव्हे तर काही क्षेत्रात, समाजाच्या काही भागात ते निरपेक्ष आहे, व म्हणून आजच्या समाजात दिसणारा आर्थिक विरोध व लुटारूपणाच्या कारवाया हे दृश्य फार दिवस टिकणार नाही. लोकशाहीवर असलेला विश्वास कानसून जात आहे; व वेळीच परिस्थितीवर योग्य उपाय न योजल्यास क्रान्ति अटळ आहे, व ती आज चाललेले सोनेरी काम एका हातोड्याने नष्ट करील !

पुढे काय येईल ते सांगता येणार नाही. दीर्घदृष्टीच्या लोकांनी त्याचा विचार केला पाहिजे. १५ वर्षांनंतर भारतात अशी परिस्थिती उत्पन्न झाली आहे की, भारताचे स्वातंत्र्य राहते की नाही याची अनेकांना भीती वाटू लागली आहे. काही अल्पसंख्याक उघड उघड पंचमस्तंभी आहेत, व गौरी-हराजवळ बसलेल्या वधूप्रमाणे आक्रमकांची वाट पाहात आहेत. सौजन्य व सहिष्णुता ही असलीच पाहिजेत. तथापि प्राण घेणाऱ्यालाच शस्त्रे द्यावयाची यांत हे दोन्ही सद्गुण अप्रस्तुत ठरतात. देशाच्या स्वातंत्र्याचे प्रथम संरक्षण झाले पाहिजे, व त्या संरक्षणाच्या कामी देशातील प्रत्येक व्यक्ती सहकारी झाली पाहिजे.

प्रत्येकाला हा माझा देश आहे असे वाटले पाहिजे. ज्या देशात मला रोजगार नाही, माझ्या मुलांना शिक्षण नाही, माझ्या दुःखाकडे कुणी बघत नाही, व ज्या देशाचे शासन विशिष्ट लोकांसाठी खपत आहे— त्या

देशासाठी मला प्राणदान करण्यास सांगणे ही थट्टा आहे ! ज्या देशात मला अभिमानाने जगता येईल त्या देशासाठी मी मरेन. 'सः देशः यत्र जीव्यते।' हे खरे आहे, व म्हणून स्वातंत्र्यावर आक्रमण झाले तर काय परिस्थिती होईल याची कल्पना नेतृत्वाने डोळ्यापुढे आली पाहिजे. देशप्रीती श्रेष्ठ, पण त्याचबरोबर आर्थिक हितसंबंधाची जोड दिली तर देशाचे संरक्षण होते व म्हणून भारताच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी नियोजन व समाजवाद आवश्यक आहे; त्या कामी थातुरमातुर प्रयत्न केल्याने लोकांचे समाधान होणार नाही. रोग्याला आता दुधातून मात्रा दिली तर चालणार नाही, लसणाच्या रसांतच द्यावयास पाहिजे. अन्य शब्दांत सांगावयाचे म्हणजे, नेतृत्वात तरी बदल झाला पाहिजे, किंवा नेत्यांत बदल झाला पाहिजे ही परिस्थिती अनिवार्य होत आहे. येवढेच राजकीय भविष्य माझ्या अल्प अनुभवाने सांगण्याचे मी धाडस करीत आहे ! !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ४२८८ वि: ललित
क्रमांक ४८१० नोंद दि: १५।१।८५

आंबराईतील नवल

: ८ :

डॉ. जॉन्सनसंबंधी असे सांगतात, की रस्त्यात जाताना कंदिलाचे खांब तो मोजत जाई, व मध्येच त्याला चुकल्यासारखे वाटे म्हणून पुन्हा तो परते व पुन्हा तोच क्रम सुरू करी. डॉ. जॉन्सन म्हणजे इंग्रज राष्ट्रांतील ज्या व्यक्तींची स्मृती कालाच्या प्रवाहांत वाहून न जाता कायम राहिली आहे अशा व्यक्तींपैकी एक व्यक्ती होती. असामान्य विद्वत्ता, अनन्य विद्याव्यासंग व प्रसन्न कोटिबाजपणा यांबद्दल त्याचा लौकिक त्याच्या हयातीत होता. त्याच लौकिकाबरोबर त्याच्या विक्षिप्तपणाच्या व विलक्षण वृत्तीच्या कथाही त्या वेळी प्रसिद्ध होत्या. आणि त्याचा चरित्रकार बॉसवेल याने तर त्यांना चिरस्थायी स्वरूप दिले आहे. जॉन्सनच्या गुणांपैकी एकही गुण मजजवळ आहे, असा माझा दावा नाही. तथापि रस्त्याने चालताना पुष्कळ वेळा रस्त्यावरील खांब मोजण्याचे वेड मनामध्ये उत्पन्न होते. जॉन्सनप्रमाणे चूक आढळल्यास पुन्हा परतणे मी कधी केले नाही. कारण, घेतलेले पाऊल हट्टाने अगर विश्वासाने जरी घेतले तरी ते परत घेण्याची व्यवहारी वृत्ती माझ्यात नाही असे माझे मित्र व टीकाकार म्हणतात. मला जरी तसे वाटत नसले तरी त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल मी कधीच शंका घेतली नाही.

रस्त्याने चालताना सामान्यपणे एकदा मान वर करून पाचपन्नास पावले पुढे पाहावयाचे व नंतर किंचित खाली मान करून चालावयाचे अशी माझी सवय अगर शिरस्ता आहे. तरुण वयातसुद्धा रस्त्याने जाताना इकडे तिकडे पाहण्याची सवय नव्हती, आणि मागे वळून पाहण्याची अगर उभे राहून पाहण्याची वृत्ती कॉलेज-जीवनात तर खास नव्हती. वार्धक्यात दृष्टी कमी होते म्हणून जवळून पाहण्याची बुद्धी वार्धक्याच्या खाती जमा होते. साठी उलटून चार वर्षे झाली तरी दृष्टीत काहीही मंदपणा आलेला नाही. आला

असल्यास कदाचित वरच्या भागात आलेला असेल. पुण्यातील निवृत्त वृद्धांची काही काही रस्त्यातून जाताना पुनः पुनः वळून पाहण्याची सवय अनेकांच्या टीका टिप्पण्यांचा विषय झाला आहे. जे अप्राप्य आहे अगर आटोक्याबाहेर गेले आहे ते हाताशी जरी आले नाही तरी डोळ्यांनी पाहावे ही इच्छा अस्वाभाविक नाही. आमच्या वेळी कॉलेजमध्ये विद्यार्थिनी फार थोड्या होत्या. तथापि त्यांच्याकडे टक लावून पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होती असे नाही. त्याही वेळी आणि आताही तसली रसिकता माझ्याजवळ नाही हे सांगण्यात इतर कोणावर दोष ठेवण्याचा हेतू नाही. जे समोर येईल ते पाहणे हा जन्मसिद्ध हक्क आहे. त्याच्या पलीकडे जाणे हे निदान ४० वर्षांपूर्वीच्या काळी लोक मान्यता पावले नव्हते. आता सर्व जमाना बदलला आहे. मोक्यामोक्याच्या जागांवर रस्त्यांतून उभे राहणे आणि दृष्टीच्या तोफा डागणे हे दृश्य सामान्य झाले आहे, आणि म्हणून समाजमान्य पण झाले आहे. पोशाखात ज्याप्रमाणे अद्ययावत्पणा नाही, त्याप्रमाणे फिरण्याच्या बाबतीतही अद्ययावत्पणा नाही. आणि जेव्हा जेव्हा सकाळी अगर संध्याकाळी मी फिरावयास जातो त्या वेळी नाकासमोर जात असतो. पण रस्त्यावरून चालत असताना आसपास असणाऱ्या गर्दीपेक्षा मनातील राजरस्त्यावर नाना तऱ्हेच्या विचारांची गर्दी चालू असते, व त्यातून सुसंगत बुद्धी मार्ग काढीत असते.

अशाच एका मनाने त्या मंगल प्रभाती मी राजभवनमागील जंगलातून रस्ता आक्रमत होतो. मनुष्य केव्हा कोठे जाईल हे कोणी निश्चितपणे सांगू शकत नाही. कुणाचे अन्नपाणी कोठे राहील हे दैव ठरवते असे आपण मानतो. कुणाचे मरण कोठे येईल हेही कोणी सांगू शकत नाही. कारण हे सर्व सृष्टीच्या निर्मात्याने आपल्या खास अधिकारातील बाब मानली आहे. पुण्यातील गल्लीतून, जनतेच्या प्रेमाने व आशीर्वादाने अनेक राज्यकर्त्यांच्या वैभवाची कबरस्थाने झालेल्या दिल्लीच्या भूमीत सुमारे दोन तपे मी राहिलो होतो. आणि सामान्यपणे दिल्लीच्या उत्तरेस जाण्याचा प्रसंग मजवर येईल याची कल्पनासुद्धा नव्हती. विनोबा म्हणतात की, म्हातारपणी उत्तर दिशेकडे जावे; तसे झाले. पण ते चिंतिले नव्हते. १९५६ च्या ऑगस्ट महिन्यात संसदेने राज्यपुनर्रचनेचा कायदा पास केला आणि त्यानंतर

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या त्याच ऑक्टोबरमधील सभेत बोलताना राजकारणापासून निवृत्त होण्याची इच्छा पण प्रदर्शित केली होती, व असेही म्हटले होते की, ज्या मित्रांच्या साहाय्याने व सल्ल्याने राजकारणात वावरलो त्यांना विचारूनच अखेरचा निर्णय घेईन.

ऐन तारुण्यातच सहधर्मचारिणीबरोबर साठ वर्षे भरताच निवृत्त होऊन केलेल्या प्रपंचाची सांगता परमार्थाने करावयाची असा संकल्प केला होता. तथापि मनुष्याच्या सर्वच इच्छा व सर्वच योजना सिद्ध झाल्या तर मग प्रत्येक जण प्रत्यक्ष परमेश्वर जरी नाही तरी राजाच झाला असता. सामान्यपणे लोकशाही राजकारणात आपण होऊन कोणी निवृत्त होत नाही. जनसेवेची महत्त्वाकांक्षा प्रत्येक उगवत्या दिवसाबरोबर वाढतच जाते. आपण नसलो तर देशाचा नाश होईल असे प्रत्येकाला प्रामाणिकपणे वाटत असते. तथापि हे त्यांचे मत अनेक वेळा जनतेला पसंत पडत नाही व जनता अल्पस्मृती असल्याने ती अनेकांना निवृत्त करते. निवृत्तीची इच्छा असताना, पक्षाच्या प्रतिष्ठेसाठी नेतृत्वाच्या आग्रहामुळे जरी मी निवडणुकीला उभा राहिलो असलो तरी अखेरचा निर्णय माझा होता, आणि एका दृष्टीने अनेक वर्षांपूर्वी केलेला संकल्प व मनामार्फत परमेश्वराला दिलेले वचन मी मोडले असे म्हणण्यास हरकत नाही. आणि निवडणुकीच्या निकालानंतर जे नको नको म्हणत असतानासुद्धा भवितव्यता मला तिच्या इच्छेप्रमाणे देत होती. आणि माझी कारणे, राज्यपालपद स्वीकारण्याची काही असली तरी लोक प्रलोभनाने हे घेतले असेच म्हणणार. तथापि वस्तुस्थिती वर परमेश्वर व खाली स्वतःचे मन यांनाच माहीत असते. आणि देवाची नजर मानवी व्यवहारावर असल्याने मी चंदीगढच्या राजभवनाचा निवासी झालो होतो. आणि त्या मंगल प्रभाती नित्याप्रमाणे सहल करण्यास निघालो होतो.

सर्वशक्तिमान व सहस्राक्षी सूर्यदेव पूर्वेकडून वर येत होता. माझ्या समोर दृष्टीच्या टप्प्यात शिवालिक पर्वतांची रांग होती. त्याच्या मागील बाजूस म्हणजे उत्तरेस केवळ दूरस्थ म्हणून रम्य नव्हे तर प्रत्यक्ष रम्य असा हिमालय पर्वतराजीतील एक भाग निळ्या रंगात आकर्षक दिसत होता. एखाद्या महान तपस्व्याने गळ्यात रुद्राक्षांची माळ घालावी त्याप्रमाणे खडबडीत ओबडधोबड शिवालिक पर्वतांची रांग वाटत होती.

ज्या मार्गाने मी चाललो होतो तो मार्ग राजभवनाच्या मागील प्रदेशातून जात होता. डावीकडे काही अंतरावर राजभवनाच्या सीमेवर मोर्चा घेऊन बसलेली झाडे रांकेत असलेली दिसत होती. त्याचप्रमाणे त्या सीमेपासून ह्या रस्त्याच्या सीमेपर्यंत उंच उंच गवत व काही बाभळीची झाडे अव्यवस्थित, सभेत गर्दी करणाऱ्या माणसांप्रमाणे गजबजून राहिली होती. तथापि, सीमा निश्चित असल्याकारणाने वादविवादाला अगर सत्याग्रहाला तेथे वाव नव्हता. उजव्या बाजूस उंच उंच वाढलेले गवत. त्यात काही तुरेंबाज झाडांची पखरण दिसत होती. त्याच्या पलीकडे साधारणपणे अर्ध्या फर्लांगाच्या अंतरावर मानवनिर्मित " तालाब " म्हणजे तलाव होता, त्याचा बांध दिसत होता. तथापि दृष्टीच्या टप्प्यात कोठेही निसर्गाची श्रेष्ठ कृती म्हणजे मानव दिसत नव्हता. मागे शंभर हातांवर मात्र साध्या वेषात ' महामहीम ' राज्यपालाचा संरक्षक होता. तथापि फाटकाबाहेर निघाल्यापासून ज्या क्षणाबद्दल आता मी सांगणार आहे तोपर्यंत मागे पाहिले नाही. राजकारणात मागे न पाहण्याची सुरुवातीची जिद्द–या काळपर्यंत स्वाभाविक सवय झाली होती. विनोबा म्हणतात, ' सिंह हा शूर खरा, पण तो निर्भय नाही. कारण तो पुनः पुन्हा मागे बघतो. " मानव भलेही त्या सिंहाला मृगेन्द्र म्हणोत तथापि खरे म्हणजे ते भीतीचे लक्षण आहे. कसे का असेना, मानवाने जीवनात मागे बघावयाचे म्हणजे आलेल्या अनुभवाला पुनः पुन्हा स्मृतीच्या पंख्याने वारा घालून जागे करावयाचे हाच त्याचा अर्थ आहे. मी शरीराने मागे बघत नसलो तरी त्या एकंदर मंगल वातावरणात मन आनंदून गेले होते. व मनाच्या आकाशात पण प्रकाश हळूहळू उदित होत आहे असाच अनुभव येत होता. आणि मग एकामागून एक सुंदर प्रभात आयुष्यात अनुभवलेल्या आठवू लागल्या. सजवून पहिले दिवशी शाळेत नेल्याची प्रभात आठवली. शाळेच्या क्रिकेट टीममध्ये आज आपल्याला मॅचमध्ये खेळावयास मिळणार ती प्रभात आठवली, आणखी काही तासांनी होणाऱ्या विवाहाच्या मंगल प्रसंगाच्या दिवसाची प्रभात आठवली. एकामागून एक आठवत असलेल्या काळापासून अनुभवलेल्या प्रभातांची रांगच रांग– सिनेमा थिएटरापाशी क्यू लागावा त्याप्रमाणे परिस्थिती उत्पन्न झाली. निश्चित क्रमाने ते घडत होते असे नव्हे; व त्यांचा क्रम जुळविताना व जमविताना काही तरी चुकलेसे वाटे,

मराठी ग्रंथ संग्रहालय ५५८

व पुनः काळाच्या रस्त्यावर मन मागे जाई न पुनः पुढे येई. आठवणीरूप कंदिलांची गणना करण्याचे कार्य डॉ. जॉन्सनप्रमाणे मनाच्या मार्गावर बुद्धीचा यात्रेकरू करीत होता.

१९५८ एप्रिलमध्ये खडकेवाडा येथे विनोबांनी महाराष्ट्रात प्रवेश केला, त्या दिवसाची मंगल प्रभात आठवली. त्यांना कडकडून भेटल्याचे सुखद स्मरण झाले. एक नाही असे अनेक प्रसंग मनाला आनंदवीत होते.

ज्या रस्त्यावरून मी चाललो होतो तो रस्ता म्हणण्यापेक्षा तीन चार फूट रुंदीची पायवाट होती. तिला अनेक आडवाटा फुटत होत्या. राजकारणातच वादविवादाला फाटे फुटतात असे नव्हे तर कुठेही चार माणसे काही जरी करू लागली तरी तेच होते. कारण पिंडे पिंडे मतिर्भिन्नः हे दिले जाते. थोड्या अंतरावर दोन वाटा फुटत होत्या. एक राजभवनाच्या बगीचाकडे जात होती. दुसरी आंबराईतून तलावाकडे जात होती. अमुकच वाटेने जावयाचे असा निश्चय करून मी निघालो नव्हतो. मानवी व्यवहार योजनापूर्ण असावा या सिद्धान्ताचा मी पक्षपाती असलो तरी काही अंशापर्यंत मनाच्या व मानवाच्या स्वैर बुद्धीला वाव देणे हिताचे असते. आणि या वाटेने जावयाचे का त्या यात काही तादृश्य अगर तत्कालीन महत्त्व नसल्याने मनाने दूरवर दिसणाऱ्या आंबराईकडे जाण्याचे ठरविले, व पायाने तो निर्णय अमलात येऊ लागला. तिथी आठवत नाही, पण 'मधुमासपुनीता' असा तो काळ होता. सृष्टीचा कायापालट होत होता. ऋतुराज वसंत अवतरला होता. किंचित दूर असलेल्या आंबराईतील झाडांची पाने आपल्या डौलाने जणू माझ्या रसिक मनाला आमंत्रण देत होती. प्रभातचा समय असल्याने काही पक्षी इकडून तिकडे किलबिल किलबिल करीत आपापल्या ताकतीप्रमाणे विहरत होते. काही लांब चोचीचे, डोक्यावर तुरा असलेले, ज्यांचे उजवे जाणे शकुनाचे मानतात असेही काही इकडून तिकडे जात होते. सर्व काही शान्त शान्त वाटत होते. क्षणभर असे वाटले, की जगातील मानवी संघर्षांना कंटाळून, हेवा, मत्सर इत्यादिकांच्या निदर्शनाला चिडून प्रत्यक्ष शान्तता विसाव्यासाठी राजभवनाजवळील या अर्धवट कृत्रिम व अर्धवट स्वाभाविक अरण्यात आली होती. वातावरण केवळ शान्ततापूर्ण होते. एवढेच नव्हे तर त्यात कारुण्याची व वात्सल्याचीही छटा इतस्ततः जाणाऱ्या लहान लहान पक्ष्यांच्या अस्तित्वाने

दिसत होती. पक्ष्यांची मधुर किलबिल शान्ततेचा भंग न करणारी, उलट सनईच्या सुंदर आलापाने वातावरणाशी ताल धरावा त्याप्रमाणे वाटत होती. मनामधील आठवणींची स्मरणी बुद्धीचा हात चाळवीतच होती. पाय गतिमान होते. डोळे अधिकाधिक आंबराईकडे आकर्षिले जात होते.

आणि आंबराईपासून साधारणपणे वीस-पंचवीस पावलांवर मी आलो आणि विचारात मग्न झाल्यामुळे व त्याच्या भाराने, विनयाने नम्रे, किंचित नम्र झालेले डोके वर उचलले. तो एका आंब्याच्या झाडाजवळ काही तरी वळवळत आहे, काही हालचाल होत आहे असे दृश्य दिसले. तोपर्यंत राजभवनाच्या आवारात अगर बाहेर सर्प अगर नाग आहेत असे समजले नव्हते. पुढे उन्हाळा आल्यानंतर पाच-सातांना सद्गती देण्यात आली. तथापि त्या वेळपर्यंत राजभवनाच्या सीमेत अगर त्या सीमेबाहेरील जंगलात त्यांची वस्ती आहे याची कल्पना नव्हती. कोल्ह्यांची कुही कुही राजकारणातील टीकाकारांप्रमाणे रात्री ऐकू येत असे, तसेच त्या दिवसापूर्वी ह्या निरनिराळ्या वाटा माझ्या प्रभातफेरीच्या कार्यक्रमात येऊन गेल्या होत्या. सुगंधी फुलांच्या आसमंतात लहानशा कृत्रिम कमलयुक्त सरोवरात कोठे सर्पाचे अस्तित्व भासले नाही.

मी दूरवर वळवळणारी घटना पाहिली व क्षणभर थांबलो. वर आंब्याच्या पानांतून अर्धवट लपलेल्या पण पाडावलेल्या कैऱ्या पाहिल्या. तेथील मुक्त मनाने मदोन्मत्त करणारा सुगंध, वाऱ्याची लहान झुळूक समारंभात पुष्पगुच्छ द्यावे त्याप्रमाणे वाटत होती. त्या सात-आठ आंब्यांची झाडे असलेल्या आंबराईत शान्तता जणू आसनस्थ झालेली दिसत होती. भोवताली उंच उंच गवत जरी होते तरी आंबराईतील भूभाग स्वच्छ व साफ होता. एकदोन जरा मोठाले दगड आंबराईच्या मध्यभागी हट्टाने बसलेले दिसत होते. मनुष्यापेक्षा आपण अधिक रसिक आहोत असेच कदाचित त्यांना दाखवावयाचे होते. दृष्टीने आंबराईच्या आवतीभोवती व आसमंतात असलेली परिस्थिती पाहिली, आणि मग अधिक संथपणे पण तीव्रतेने ज्या ठिकाणी काही वळवळ होत होती त्या ठिकाणावर ती स्थिर झाली. वळवळ करणारे जीव प्रत्यक्ष एक झालेले दिसत होते, तरी त्यांत द्विधा भाग असलेलाही काही भागांच्या वळवळीने

दृग्गोचर होत होता. निःसंशय ते नागयुग्म होते. आयुष्याच्या गेल्या साठ वर्षांत दहा बारा साप तरी मी मारले होते. लहानपणापासून मी कुत्र्याला भीत असे, व अजूनही टीकाकारांना जवळ करीत असलो तरी कुत्र्याला दूर ठेवीत असतो. आणि प्रसंगी ती जवळ आल्यास माझे मन अस्वस्थ होते. याच्या उलट साप पाहिल्याबरोबर मनातील पहिली प्रतिक्रिया त्याला मारावे ही होते, आणि त्याप्रमाणे माझ्या आयुष्यात घडून आले आहे. मारतानाचा उत्साह मारल्यानंतर निराळ्याच प्रतिक्रियेत बदलला जातो. मग सबंध दिवस मन अस्वस्थ असते. सामान्यपणे न थुंकणारा मी काही तरी तास दोन तास थुंकत असतो.

वळवळणारे प्राणी सर्प आहेत, ते एक युग्म आहे, याची जाणीव मनाला होताच सवयीने उचल खाल्ली. प्रभातसमयीच्या सहलीत काठी नसते, आणि त्यामुळेच मनातील प्रतिक्रिया ताबडतोब कृतीत उतरली नाही. क्षणभर थांबलो, आणि काही सेकंद म्हणा– मी त्या युग्माकडे पाहात राहिलो. तेवढ्यात त्या ठिकाणची चळवळ अजीबात शान्त झाली. ते नागयुग्म आता उत्सुकतेतून, आसक्तीतून पलीकडील अवस्थेत पोहोचले होते. तळमळीतून तृप्तीचा मुक्काम त्याने गाठला होता. प्रयत्नांचा मार्ग संपून प्राप्तीची विश्रान्ती तेथे दिसत होती. आरंभाचा शेवट झाला होता. आणि सलोकता, समीपता, सरूपता या तिन्ही अवस्थांतून सायुज्यतेच्या तुर्यावस्थेत ते युग्म गेलेले दिसत होते. उभे असलेल्या अंतरावरून त्यांचे डोळे उघडे होते की मिटलेले होते हे पाहू शकलो नाही. तथापि ते निश्चित मिटलेल असले पाहिजेत. कारण समाधानाचे सुख जीवमात्र अंतर्दृष्टीनेच पाहात असतो. भोवतालच्या सृष्टीची दखलही त्यांना असणे शक्य नसते. रतीतील तल्लीनता पार्थिव सृष्टीला निरपेक्ष करीत असते.

माझे हात हा रमणीय व अनिर्बंध कलाप्रसंग पाहून टाळी वाजवण्याला उत्सुक झाले. मनाच्या स्मृतिसंग्रहालयात शेषाला कान नसतात असे नोंदले गेले होते. गायनसम्राट तानसेनबद्दल एका हिंदी कवीने म्हटले आहे की, ब्रह्मदेवाने शेषाला कान न देण्यात मोठी दूरदृष्टी दाखविली. नाही तर तासनेनचे संगीत ऐकून त्याने मान डोलवली असती, व मग त्याच्या शिरावरील पृथ्वी

कोठे तरी कोलमडून पडली असती. आणि म्हणून टाळी वाजविली तरी त्या नागयुग्माला ती ऐकू यावयाची नाही म्हणून वाजवावी असे मनाने घेतले. पण– तेवढ्यात अंगभूत हिंदी संस्कृती धावून आली आणि कोठेही रतिक्रीडा होत असेल तर ती आपण पाहू नये, व विशेषतः नागयुग्माची पाहू नये म्हणून तिने आदेश दिला. पण तरीही क्षणभर माझे सगळे अवयव नयनभूत झाले. सगळ्या इंद्रियांनी नयनेन्द्रियात आपल्याला सामावून घेतले. जीवनाच्या कलेतील श्रेष्ठ चित्र तेथे निर्माण झाले होते. नवरसातील रसराज श्रृंगार आपल्या श्रेष्ठ पावित्र्याने वातावरण उन्नत करीत होता. पतिव्रता मनात काही न ठेवता जीवनसर्वस्वाचे समर्पण करते याचे उद्‌बोधक दृश्य तेथे दिसत होते. आणि मग मनामध्ये नाना तऱ्हेच्या आनुषंगिक स्मृतींनी नाच घालण्यास सुरुवात केली. स्वतःला अभ्यासाने व अहंकाराने स्थितप्रज्ञ मानणाऱ्या माझ्या मनाच्या खडकावर चोहो बाजूंनी लाटांचा कल्लोळ उठावा अशी परिस्थिती झाली. सृष्टीचा आद्य हेतू तन्मयतेने व निरपेक्षपणाने तेथे साध्य झालेला मला दिसत होता.

क्षणात आद्य काव्यनिर्मितीचा इतिहास डोळ्यापुढे आला. काममोहित क्रौंच मिथुनातील एकाचा वध निषादाने केला तेव्हा त्यातून आद्यकाव्य निर्माण झाले होते. वाल्मीकीची प्रतिभा स्फुरण पावली होती आणि या ठिकाणी नागयुग्म पाहून कारुण्यातून नव्हे, तर संपन्नतेतून, समाधानातून, काव्य निर्माण होण्यासारखा खास प्रसंग निर्माण झाला होता. आणखी काही क्षण ते दृश्य, ते नवल मी पाहात होतो. काही काळ मीही सभोवतालच्या सृष्टीला विसरलो होतो. सृष्टिनिरपेक्ष झालो होतो. त्या दृश्याशी अंतर असूनसुद्धा तादात्म्य पावलो होतो. सलोकता तेथे होती. तितकीशी समीपता नव्हती. तथापि अनुभवाच्या स्तरावरून सायुज्यतेचा भास होत होता. कुठल्या तरी दिव्य व उच्च वातावरणात मन बुडून गेले होते. ज्या जीवनधर्माला मानवाने बीभत्स स्वरूप दिले होते त्याचे तेथे उन्नयनीकरण झाले होते. जे हीन ते श्रेष्ठ केले गेले होते. खऱ्या कलेचा हात फिरताच मातीचे सोने होते, सामान्यात असामान्यपण येते. उच्छिष्टातून उत्कट निर्माण होते. त्या दृश्याकडे मी अनुभवाच्या अनेकानेक पटलांतून पाहात होतो. विचारांना अंत नव्हता. तृप्ती दिसत होती, पण प्राप्त होत नव्हती.

येवढ्यांत शरीररक्षकाने हळूच सूचना दिली की, बराच वेळ झाला. आणि मी वास्तव सृष्टीत आलो. एकदम मनाला वाटले की, अधिक वेळ येथे राहणे हे योग्य होणार नाही. आणि म्हणून मी पुढे मार्ग चालू लागलो. तथापि सुंदर संगीत संपल्यानंतर मनात आलाप आवाज देतच असतात, त्याप्रमाणे किती काळपर्यंत तरी पुढे ते दृश्य पुनः पुन्हा दिसत होते, व त्या वेळचा तो आनंद पुनः पुन्हा मी अनुभवीत होतो. आणि आजही मन उद्विग्न झाले, लौकिक व्यवहारातील उलाढालींना कंटाळले म्हणजे त्या घटनेच्या एकान्त-वासात पुनः जाऊ इच्छिते, आणि आजही तसेच थोडेसे झाले. पण ती स्मृती आता शब्दांत अजरामर झाल्याने अधिक समाधान वाटते.

❀ ❀ ❀

पालम विमानतळावर : ९ :

स्वातंत्र्य मिळून १८ वर्षे झाली आणि तसे म्हटले तर जवळ जवळ एक पिढी झाली. सामान्यपणे २० वर्षे म्हणजे एक पिढी असा दंडक शिक्षण-क्षेत्रात आहे. सामाजिक जीवनात ३० वर्षे म्हणजे एक पिढी असे आपण मानतो. तथापि कमीजास्त प्रमाणात एक पिढी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मध्ये होऊन गेली आहे. आणि या पिढीने काय प्रगती पाहिली, काय परागतीचा अनुभव घेतला, किती सुख भोगले व दुःख सहन केले याचा हिशोब यथा-समय इतिहासकार घेतील. कालाच्या अगदी जवळ असल्याने यथार्थतया चित्र काढता येणार नाही. परिस्थितीचे सम्यक् आकलन करता येणार नाही. तथापि सामान्यपणे या कालखंडात वैचारिक प्रवाह, नैतिक व सांस्कृतिक दृष्टीने किती बदलले आहेत, कसे वाहात आहेत याची कल्पना करणे अगदीच अशक्य नाही. इतक्या थोड्या काळात, इतक्या झपाट्याने सामाजिक व नैतिक मूल्ये बदलली आहेत की, त्याला दुसरे उदाहरण अतीत काळातील अगर अन्य देशांतील देता येणार नाही. आजकालचे असे काही राहिलेच नाही. आजचे म्हणून आपण सुरू करीत आहोत व आज संपावयाच्या आधीच ते सोडून देत आहोत. हा विचित्र सामाजिक अनुभव भारतात येत आहे. आणि त्याच प्रमाणात व तितक्याच तीव्रतेने महाराष्ट्रातही येत आहे. क्षणभर हे जे चालू आहे त्या समाजाच्या नित्य जीवनाशी, मौलिक श्रद्धेशी सुसंवादी आहे की नाही याचा विचार करणे अवश्य झाले आहे असे माझे प्रामाणिक मत आहे.

काही दिवसांपूर्वी नेहमीप्रमाणे दिल्लीला गेलो होतो. आणि परत येण्याच्या विमानाला वेळ होता, म्हणून दिल्लीच्या विमानतळावर तास-दोन तास बसून राहिलो होतो. १८ वर्षांपूर्वीचा विमानतळ आता तो राहिला नव्हता. किती

तरी पटीने त्याचा विस्तार झाला होता. प्रवाशांची बसण्याची जागा आता पूर्वीच्या इतकी मर्यादित राहिली नव्हती. आता प्रवाशांची संख्या १०–१२ पासून शेकडोपर्यंत आली होती. आता तासाला तीन-तीन, चार-चार विमाने तळावर उतरत व तळावरून निर्वाण करीत होती. आणि प्रवाशांची संख्या अफाट वाढल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी, निवाऱ्यासाठी अगदी आधुनिक सुखसाधनांनी सज्ज झालेली ऐषआरामी निवासस्थाने बांधण्यात आली होती. त्यांत ठेवलेले फर्निचर हे कोठल्याही राजवाड्यातील फर्निचरला कमी लेखणारे दिसत होते. उपाहारगृहे तर एवढी टापटिपीची, व तेथील सेवक स्त्री व पुरुष एवढे उत्साही, दिसत होते की, आपण जुन्या भारतीय दुनियेत राहात नसून दुसऱ्या कोठल्या तरी दुनियेमध्ये आहोत असेच ५–१० वर्षांपूर्वी आलेल्या प्रवाशाला वाटावे. आणि त्या उपाहारगृहात येणारे व जाणारे, त्याचप्रमाणे तळमजल्यावरील विश्रान्तिस्थान, येणाऱ्या व जाणाऱ्या किलबिल किलबिल करणाऱ्या स्त्री-पुरुषांकडे पाहात असताना सारा १८ वर्षांचा इतिहास माझ्या डोळ्यांपुढे उभा राहिला. हिंदी स्त्री आता स्वातंत्र्यापूर्वीची शालीन, विनयसंपन्न, मंद गतीची दिसत नव्हती. तिच्या पोषाखात आता साडीवर विजय मिळवून घट्ट विजार आलेली होती. व तिच्या वक्षस्थळाला झिरझिरीत कापडाचेसुद्धा वजन वाटावे असे दिसत होते. केशभूषा अजिंठा शैलीची मागे पडून आधुनिक 'टोनी' पद्धतीवर मुक्कामाला आली होती असे दिसत होते. आता वेणी व अंबाडा या गोष्टी इतिहासजमा झाल्या आहेत. पाठीवर शेपटा सोडलेल्या काही अज्ञान मुली अजूनही दिसतात. पण 'बॉबकट'चा प्रचार मोठ्या प्रमाणात दिल्लीत, दिल्लीच्या शिक्षण-केन्द्रातून सहज जाणाऱ्याला दिसून येतो. आणि पुरुषांच्याबाबत आता धोतराला धक्का मिळालेला दिसत आहे. नेहरूंच्या राज्यात राजकीय प्रतिष्ठेचा पोषाख म्हणून तंग व चुनीदार पायजमा व शेरवाणी यांचा बोलबाला होता. आता टेरेलिन व बुशशर्ट यांचे संवत्सर सुरू झाले आहे. त्या दिवशीच्या-संध्याकाळी धोतर नेसलेला एकमेव हिंदी सज्जन म्हणजे प्रस्तुत लेखकच होता. आणि आजही पुणे शहरातून जेव्हा मी जातो तेव्हा क्वचित २००–३०० लोकांमध्ये धोतर नेसलेला एखादा आढळून येतो. आणि जो आढळून येतो तो १०० टक्के साठी उलटलेला अगर ग्रामीण भागातील मध्यम वयातील

असतो. सारा पोषाखाचा दरबार आता बदलून गेला आहे. पुणे शहरातील जुनी शान्तता, वागण्याचे गांभीर्य, भाषणातील प्रौढता आता भारत इतिहास संशोधन मंडळातही दिसून येत नाही. दोन-तीन जुनी म्हातारी माणसे सोडली तर लग्नप्रसंगालासुद्धा डोक्यावर पागोटे घालणारी आढळून येत नाहीत. सारा जमाना बदलला आहे. पण याचे इतके वाईट वाटत नाही, जितके आधुनिक समाजातील मन बदलले आहे त्याचे.

स्वातंत्र्यापूर्वी असा काळ होता की, लोकसेवा म्हणजे सेवाभावानेच केली जात होती. एक तीव्र भावना परकीय अंमल नाहीशी करण्याबाबत होती. व ते प्रामाणिक रीतीने नाहीसे करण्यासाठी जी किंमत आपण देऊ शकतो ती देऊ, पण एक उच्च धर्म, श्रेष्ठ धर्म, मानला जात होता. लक्षावधी लोक आपण करीत असलेली जनसेवा म्हणजे गुंतवलेले भांडवल आहे असे मानीत नव्हते. किंबहुना तशा तऱ्हेचा विचारसुद्धा त्यांच्या मनामध्ये येत नव्हता. याचा अर्थ असा नव्हे की, येथून तेथून सारी जनता स्वातंत्र्याच्या कल्पनेने वेडावलेली होती; अगर धुंद झाली होती. तथापि समाजातील सामान्य स्त्री-पुरुष आपापले स्वकर्म करीत असले तरी त्यांच्या मनाच्या तळघरात स्वातंत्र्यभावनेचा नंदादीप तेवत होता. त्याबद्दलची तळमळ त्यांच्या विचार-शरीरामध्ये सळसळत होती. काही धोरणाने त्याग करीत असत त्यात धोरण असले तरी ध्येय होते, स्वतःचा स्वार्थ तेथे नव्हता. जळकी चिमणी हातात घेऊन ज्या अनंताने आपले धैर्य अनंत असल्याचे शाबीत केले त्या तरुणापुढे आपण कोठे तरी सरपंच होऊ, कोठे तरी केव्हा तरी आमदार, खासदार होऊ अशी कल्पनासुद्धा नव्हती, नव्हे येणेच शक्य नव्हते. कापुराने जळावयाचे आणि जळताना सुगंध पसरवावयाचा एवढेच त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान होते. वर्षानुवर्षे कारागृहात जीवनाची वीणा शृंखलांच्या आवाजाबरोबर लय साधून वाजवावयाची हेच ज्यांनी श्रेष्ठ भाग्य मानले त्यांच्यापुढे कोठलीही ऐहिक उन्नतीची कल्पनाही नव्हती. कल्पनाही येणे शक्य नव्हते. कारण एकोणिसाव्या शतकातील शेवटल्या पंचवीस वर्षांचे व विसाव्या शतकातील पहिल्या चाळीस वर्षांचे वातावरण हे श्रेष्ठ, उन्नत व एका दृष्टीने आध्यात्मिक स्वरूपाचे होते. त्या वातावरणात देवाच्या जागी देश स्थापन करून दैवाचे फासे कसेही पडले तरी प्रयत्नांचा देव सोडणार नाही अशी प्रतिज्ञा घेतलेले

अनेक लोक होते. समाजामध्ये नाना तऱ्हेचे वर्ग असतात. नाना विचारांचे वर्ग असतात. घरामध्ये दिवाणखाना, ग्रंथालय, ओसरी, पडवी, स्वैपाकघर पण त्याचबरोबर देवघरही असावे लागते. त्याचप्रमाणे समाजामध्ये चिंतन-मूल्याचा विचार करणारा, विवेकाची ज्योत अखंड प्रज्वलित ठेवणारा असाही एक वर्ग असावा लागतो. दिव्याची वात वातावरणात जळत असते पण वातावरणापासून अलिप्त असते. त्याचप्रमाणे साऱ्या भारतीय समाजात व महाराष्ट्रीय समाजात असा एक वर्ग होता, अल्प होता पण महान होता, ज्याने ध्येय व आदर्श संरक्षणाचे व्रत घेतले होते. त्या व्रतार्थ देहदंड व जीवनदान देण्याचे ठरविले होते. त्यांची प्रेरणा तशीच होती. वीर सावर-करांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ती प्रेरणा व ती प्रतिज्ञा अंधतेने घेतली गेली नव्हती. निसर्गाच्या शिकवणीने इतिहासाच्या प्रकाशात जे मार्ग मिळाले त्यांनी हे घडून आले होते. त्यांतील त्या सर्व व्रतधाऱ्यांनी घेतलेले व्रत हे दिव्य आहे, दाहक आहे याची जाणीव होती, आणि ही जाणीव असून ते व्रत स्वीकारलेले होते. सोडतीचे तिकीट घ्यावे याप्रमाणे त्यांनी जीवनाचा आदर्श घेतला नव्हता आणि म्हणून फलप्राप्ती झाली नाही किंवा होणार नाही याचा त्यांना खेद नव्हता. त्यागात स्पर्धा होती, जे दुर्बल होते त्यांबद्दल सहिष्णुता होती. करीत असलेल्या पराक्रमाची जाणीव असून अहंकाराची दुर्गंधी त्याला नव्हती. व्यक्ती आपले जीवन समाजाच्या जीवनात पाहात होती. होडीचा वल्हविणारा होडीतील सर्व यात्रेकरूंसाठी वल्हवीत होता हा श्रेष्ठ भाव त्यात होता.

...आणि आता माझ्या डोळ्यांसमोर चाललेली नर-नारींची चालती बोलती चित्रे मला काय सांगत होती? सारी माणसे झपाट्याने कोणी तरी ढकलत आहेत अशा तऱ्हेने पुढे जात होती. त्या द्रुत गतीचे चित्र भारतात आता सर्वत्र दिसत आहे. खेडेगावात मोटर आली, त्याआधी चहा आला, नंतर वर्तमानपत्र आले आणि तिघांनी युगायुगांतील शान्तता बरबाद करून टाकली आहे. जेथे तेथे आपले घोडे दामटावयाचे, इतरांना जुमानावयाचे नाही हे वातावरण सर्वत्र दिसून येत आहे. ही सर्व जनता कोठे चालली आहे? समुद्रात ज्याप्रमाणे नौका दिशाहीन झाली म्हणजे इतस्ततः वाहताना दिसते तसे आज भारतीय समाजाचे जीवन दिसत आहे. इतकी ध्येयशून्यता

कशी आली ? इतका स्वार्थाचा बाजार कसा भरला ? सारा चारित्र्याचा साठा भूमिगत कसा झाला ? आज जसे जीवनामध्ये शुद्ध घृत आढळून येत नाही त्याचप्रमाणे आज विशुद्ध चारित्र्य सार्वजनिक जीवनात व व्यक्तिगत जीवनातही दुर्मिळ झाले आहे. आज तरुणांना ध्येयाची अशी प्रेरणा नाही. सामाजिक बंधन अगर सांस्कृतिक अनुशासन उरलेले नाही. सर्वत्र नैतिक विस्कळितपणा आणि पायापुरते पाहण्याची दृष्टी तेजीत आहे. जग काही आहे, शेजारधर्म काही आहे, समाजाची चिरंतन मूल्ये अशी काही आहेत याचा पुरावा आता दिसून येत नाही. वैवाहिक जीवन आता हवे आहे, पण त्यातील जबाबदारी नको आहे. विद्येतील प्रतिष्ठा हवी आहे पण त्यासाठी करावा लागणारा प्रयास नको आहे. धन तर आयुष्याचे एकमेव ध्येय झाले आहे; आणि त्यासाठी कोठलाही मार्ग आज प्रतिष्ठित मानला जाऊ लागला आहे. परसंत्तेखाली चारित्र्य अधिक होते आणि त्याच्याच प्रेरणेने स्वातंत्र्याची भावना प्रज्वलित होत होती. आता स्वातंत्र्य आले आणि चारित्र्य दृष्टीआड झाले आहे. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् म्हणतात की, देशाची परिस्थिती चारित्र्यहीनतेमुळे संकटात आली आहे ही गोष्ट खरी आहे. हे का व्हावे ? असा विचार करू लागलो तेव्हा असे मनाला वाटू लागले की, स्वातंत्र्य स्वस्तात मिळाले, कृत्रिम क्रान्तीने मिळाले; आणि जी गोष्ट विनाकष्ट मिळते तिची किंमत माणसाला कमी वाटते. अन्य देशांतून रक्तरंजित क्रान्त्या झाल्या, आणि दिव्यातून ती राष्ट्रे बाहेर पडली, म्हणून स्वतंत्र झाली, म्हणून स्वातंत्र्याचे संरक्षण म्हणजे देहाचे संरक्षण असे प्रत्येक व्यक्तीला वाटते. आपण व राष्ट्र यांमधील आपुलकीची भावना (Sense of Belonging) आज भारतात क्वचितच आढळून येते. आपल्या स्वार्थापलीकडे काही आहे असे क्वचित वाटते. माझा स्वार्थ म्हणजे समाजाचे हित हा मंत्र मंत्र्यापासून सामान्य जनापर्यंत प्रभावी ठरत आहे. असे का व्हावे ? आणि भारत हे एक राष्ट्र आहे की ज्याच्यासाठी जगावे व ज्याकरिता मरावे असे वाटणारे या राष्ट्रात मोठ्या संख्येने का नसावेत याचाही विचार मन करीतच होते. भारत हा भौगोलिक विचार एवढाच अनेक शतके होता त्याची शक्ती एक होती. पण साऱ्या भारतावर एक राज्य अगर सारा भारत म्हणजे एक राष्ट्र आधुनिक दृष्टीने असा कधी नव्हता. इंग्रजांनी आपल्या अमलाखाली सारा

भारत प्रथम आणला, आणि या परराज्याविरुद्ध नानाविध भाषा बोलणाऱ्या नानाविध धर्मांचे आम्ही एक झालो, व त्या एकीतून जो भाव निर्माण झाला त्या भावाला आधुनिक दृष्टीने थोडे राष्ट्रभावाचे स्वरूप आले. पण ही भावना अभावात्मक होती (Negative). एका चौकटीत मग चित्र काढावयाचे होते, व ते भावात्मक राष्ट्रवादाचे (Positive Nationalism) ते स्वातंत्र्यप्राप्तीशिवाय शक्य नव्हते. आणि स्वातंत्र्यप्राप्ती जी झाली, ज्या परिस्थितीत झाली त्याने उराशी बाळगलेली जी भावना, तिला मोठी तड गेली. वाटणी करून आम्ही ऐक्य साधले व तेही ऐक्य अभावात्मकच ठरले. एकराज्याची चौकट निर्माण झाली व काही ऐतिहासिक कारणांमुळे त्या एकराज्यातसुद्धा घटक राज्ये निर्माण झाली. मध्यवर्ती निष्ठा म्हणजे भारताची निष्ठा प्रसंगी घटकराज्य-निष्ठेला विसंगत वाटू लागली. साऱ्या राष्ट्रांची एक भाषा करणे शक्य नव्हते. सारी घटकराज्ये विद्यमान होती ती मोडून एक करणे शक्य नव्हते. जे होते त्यातून काही कमी जास्त करून निर्माण करावयाचे होते. हा इतिहासाचा अनिवार्य संदेश होता. किंबहुना १८५८ सालापासून साऱ्या भारतात मध्यवर्ती राज्ये व अनेक घटक राज्ये निर्माण होणार हे वातावरण हळूहळू उदित होत होते. म्हणून आमची घटना ही संयुक्त (Federal) हे निश्चित. म्हणून आमच्या निष्ठेतही थोडा सांस्कृतिक भाव येणार हेही निश्चित होते. आणि त्या दृष्टीने भारतीय नेतृत्वाने संविधान तयार केले. शासकीय चौकट तयार केली. आदर्श संविधानात लेखनिष्ठ केले. तथापि लोकशाही राज्य म्हणजे अगर लोकशाही समाज म्हणजे निव्वळ संस्था नव्हेत. निव्वळ संविधान नव्हे. त्याच्यामागे असणारी वृत्ती ही संस्थांचे व संविधानाचे स्वरूप ठरवीत असते. आणि ती वृत्ती राष्ट्रवादाची असावी हे मान्य होते. तथापि जे घडले त्यात व ज्या परिस्थितीत घडले त्यात राष्ट्रवादाची रचना संघटित रीतीने झाली नाही. मुलकी कायदासुद्धा एक असा सर्वांसाठी नाही. राज्यकारभाराची भाषा सर्वांसाठी एक नाही. आणि संविधानातील मंत्रापेक्षा तंत्रावर जास्त लक्ष दिल्याने राज्यकारभार चालला. पण ते आदर्श दुर्लक्षित झाले, आणि परिणामतः साऱ्या देशामध्ये आचरण-व्यवस्था जी जुन्या मूल्यांवर होती ती कोसळली. नवीन मूल्यांवरील व्यवस्था अमलात येऊ शकली नाही. समाजाची रचना श्रेष्ठांच्या आचरणावर आधार-

लेली होती ती तशीच चालू आहे, पण ते श्रेष्ठ आता नष्ट व कनिष्ठ झाले आहेत. व्यापक बुद्धी दुर्मिळ झाली आहे. त्याग आता हद्दपार झाला आहे. ज्याला जे मिळेल, नाही मिळाले– जसे मिळेल ते त्याने ओरबाडावे. अन्यांचा विचार करू नये हा व्यवहारामधील प्रमुख दंडक झाला आहे; प्रमुख नीति-मूल्य झाले आहे. आणि लोकशाहीच्या निवडणूक तंत्रामुळे वैयक्तिक दोष सद्‌गुण ठरू पाहात आहेत. आणि असा जगाचा अनुभव आहे की, लोक-शाहीच्या पहिल्या प्रहरात जे प्रामुख्याने दिसून येते ते लोकशाहीचे दोषच. तथापि प्रस्तुत लेखकाच्या मते ही परिस्थिती संक्रमण अवस्थेतील आहे. आणि संपत्तीमुळे विषमता उत्पन्न होते, आणि संपत्तीची प्राप्ती करताना न्याय-नीती विसरली जाते. यावर खरा बंदोबस्त म्हणजे समाजातील संपत्ती व्यक्तीची राहता कामा नये. हे संपत्तीचे स्वामित्व समाजाकडे असले पाहिजे. आणि तिचा उपयोग समाजातील सर्वांना सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विवेकाने करण्याचा वाव सर्वांना मिळाला पाहिजे. आणि मी असा विचार करीत असतानाच पुन्हा विमानाची वेळ झाली अशी घोषणा झाली, आणि दरम्यानचे हे चित्र तसेच मनामध्ये रेंगाळत राहिले. भविष्याकडे लक्ष गेले, आणि आजही भविष्याकडेच लक्ष आहे. मात्र ते भविष्य निर्दयपणे, निष्ठुरपणे, निश्चितपणे जे आखले आहे ते अमलात आणले पाहिजे.

❀ ❀ ❀

मराठा ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थळप्रत
क्रमांक ..... दि. .....
अक्रम ..... नोंद दि. .....

संगमे नदीनाम्

: १० :

आर्य हे भारतात कोठून आले, याबद्दल अनेक मते आहेत. लोकमान्यांच्या मते उत्तरध्रुवाच्या जवळील प्रदेशातून युरोप, मध्य आशिया, काबूल कंदाहार मार्गे वायव्य दिशेने हिंदुस्थानात त्यांनी प्रवेश केला, आणि ज्या प्रदेशात प्रथम प्रवेश केला तो प्रदेश म्हणजे पंचनद देश होय. तेथील समृद्ध भूमी व संपन्न नद्या यांनी त्यांचे स्वागत केले, आणि भारतीय संस्कृतीचे रोपटे ह्या प्रदेशात प्रथम अंकुरले. ऋग्वेदकालीन पंजाब प्रदेशाला सात नद्यांनी समृद्ध केले होते ! वितस्ता– हल्लीची झेलम, असूक्नी– हल्लीची चिनाब, परुष्णी– हल्लीची रावी, बीपास– हल्लीची बिआस, शतद्रू– हल्लीची सतलज, सरस्वती– हल्लीची झज्जर, पण– जी पाहवा क्षेत्रानंतर संपते, आणि सिंधू या सप्तसिंधूंनी व्यापलेल्या प्रदेशाला ब्रह्मावर्त म्हणत, ह्या प्रदेशात पंचजन राहात.

ब्रह्मावर्त या नावानंतर या प्रदेशाला पंचनद देश हे नाव प्राप्त झाले. ग्रीक लोकांनी स्वारी केली त्या वेळी या प्रदेशाला त्यांनी पेंटा पोटामिया म्हणजे पाच नद्यांचा प्रदेश हे नाव दिले होते. नद्यांप्रमाणे या प्रदेशाच्या उत्तरेकडील पर्वत हेही साऱ्या शतकांचे साक्षीदार आहेत. हिमालयाची एक रांग वीस हजार फुटांपेक्षा उंच असून त्यावर सतत, साही ऋतूत बर्फ असतो. त्याच्यानंतरची दक्षिणेकडील रांग ही सहा-सात हजार फूट उंचीची असून त्या क्षेत्रात प्राचीन काळापासून वस्ती आहे. त्यानंतर आणखी दक्षिणेस सुमारे तीन हजार फूट उंचीची एक रांग असून तिला शिवाली पर्वतराजी म्हणतात. या सर्व पर्वतांवर पडणाऱ्या पावसापासून व वितळणाऱ्या बर्फापासून मैदानी पंजाबाची निर्मिती झाली आहे. आणि म्हणून पंजाबची भूमी ही समृद्ध आहे, शेकडो मैल मैदानी पंजाबात लहानसे टेकाडसुद्धा दिसणार नाही. जमीन एवढी सुपीक आहे की प्राचीन काळची, ' आंघोळीला जाताना

पेरावे व नदीवर ब्रह्मकर्म पुरे करून येताना पीक काढावे,' ही आख्यायिका खरी वाटते, निदान त्यातील मर्म सहज पटते.

पंजाबमधील साऱ्या नद्या या पंजाबच्या भाग्य-देवता आहेत. पंजाबच्या उत्तरेकडील भाग म्हणजे वर सांगितलेल्या नद्यांचे माहेरघर आहे. त्या प्रदेशातून त्या नाचत बागडत बाल्यावस्थेला सोडून प्रमदा बनत बनत प्रौढतेकडे सतत प्रवास करीत असतात. उत्तरेकडील सुंदर प्रदेशात जेथे निसर्गाने मुक्त हस्ताने संपत्तीची खैरात केली आहे, त्या स्थानातून प्राचीन ऋषींची वाणी सत्यं, शिवं, सुंदरं– यांची गीते प्रसवली. नाना तऱ्हेचे गगनचुंबी वृक्ष– देवदार व अन्य, त्याचप्रमाणे उत्कृष्ट फळांनी समृद्ध झालेला हा भाग प्रतिभेचे मूळस्थान ठरला, यातही नवल नाही. या पर्वतराजीत अनेक ठिकाणी तलाव व गुंफा आहेत. ज्या ठिकाणी ब्रह्मदेवाने आपली निर्माणशक्ती खर्च करून सौंदर्यस्थाने बनविली आहेत, त्या निर्जन स्थानातून सरस्वतीचे दिव्य झंकार ऐकू येतात. तेथेच अध्यात्माचे चिंतन ऋषिमुनींनी केले. शतद्रू, विपासा, सरस्वती या नद्यांच्या तीरांवर बसून त्यांनी वेदांची रचना केली, ऋचांचे उद्घोष केले. दिव्यत्वाचा साक्षात्कार करून घेऊन जनसाधारणांसाठी त्याला काव्याचे स्वरूप दिले. उपनिषदांची गूढता व गांभीर्य यांचे श्रेय या प्रदेशातही निसर्गाला दिले पाहिजे. वेदाभ्यासजड असा मनुष्य या प्रदेशात आल्यानंतर त्याचे जाड्य जाईल यात शंका नाही. तेथील वृक्षराजीतून वाल्मीकि-कोकिलाच्या रामायणाचे कुहूकुहू गायिले गेले.

'गव्हरे गिरीणां, संगमे च नदीनाम् धीमान् विप्रो प्रजायते'

शान्त व गंभीर गिरिगव्हरांतून, गुंफांतून राहिल्याने बुद्धी वाढते, प्रगत होते. त्याचप्रमाणे नदीच्या संगमस्थानावर बसले असताना प्रतिभा प्रसवते, आणि मूक मनाने सौंदर्याचे पान करीत करीत वैखरीवाटे सरस्वती सालंकार अवतरते. अशा स्थानी निवास केल्याने बुद्धीचे जडत्व जाते, मनाची रुक्षता रसिकतेत परिणत होते.

अशाच एका स्थानावर त्या १९५९ च्या डिसेंबर महिन्याच्या २०-२१ तारखेला मी आलो होतो. विपासा व शतद्रू म्हणजे हल्लीची बिआस व सतलज या दोहोंचा संगम ज्या ठिकाणी होतो त्या हरिके पाटणला मी मुक्काम केला होता. हल्ली त्याला 'हरिके' म्हणतात. बिआस नदी ही रोहटाक पर्वता-

पासून उगम पावते व व्यासकुंडात प्रथम प्रवेश करून नंतर कुलू घाटीच्या नितान्तरमणीय अशा प्रदेशातून वाहत वाहात डेरा गोपीपूर येथे वळून पंजाबच्या मैदानी भागात येईपर्यंत अनेक ठिकाणी तिच्या काठांशी उष्ण पाण्याचे झरे आहेत. तथापि जे मनाला अनुपमेय आनंद देते ते म्हणजे तिचा उड्या मारणारा,—उल्हसित वृत्तीने, उत्साहाने प्रगतीची वाटचाल करणारा प्रवाह हा होय. दोन्ही तीरींच्या पादपांना ती समृद्ध करीत जाते असे म्हणण्याऐवजी तिच्या तीरांच्या उंच व विशाल वृक्षांनी तिचा पाळणा हालविला आहे असे वाटते. थोडे कौतुकाने, थोडे चिंतेने तिच्या अल्लडपणाकडे ही वृक्षांची बनेच्या बने पाहात आहेत, असे वाटते. तिच्या डोळ्यापुढे मनाची, कुलू किंबहुना साऱ्या कुलू घाटीतील मुक्त व स्वच्छंद जीवन असल्याने तिचा आदर्श तसाच आकारित झालेला दिसतो. या घाटीतील लोकनृत्ये व लोकगीते भोवतालच्या प्रदेशाइतकीच प्रसन्न व प्रसादपूर्ण आहेत. अशा या प्रदेशातून वाहात वाहात, मोठ्या शहरांना टाळीत टाळीत, पंजाबच्या पराक्रमी भूमीत ती प्रवेश करते. किंचित समजू लागलेल्या बालिकेप्रमाणे मुसमुसलेल्या शहरांपासून ती दूर राहात असल्याचे दिसून येते. हरिकेपर्यंत ती प्रौढा होते, तिचे प्रमदास्वरूप कमी होत जाते. ज्या ठिकाणी नाना संत व भक्त आश्रम करून राहिले, जिच्या किनाऱ्यावर संत नामदेवांनी भजन केले, व ज्यामुळे तिच्यात भक्तिभाव उत्पन्न झाला—अशी ती लोकमाता मी त्या दिवशी पुन्हा एकदा पाहिली. रोहटाकच्या पायथ्याशी लीलेने उडी घेणाऱ्या बाल्य स्वरूपात तिला पाहिले. मंडी येथे तिचे तन्वी असे स्वरूप पाहिले. डेरा गोपीपूर येथे प्रमदास्वरूप पाहिले. पांग येथे तिला आता बांध स्वरूपाची मेखला बांधण्यात येणार आहे. तिथे तिचे नयनरमणीय स्वरूप पाहिले. त्यानंतर अनेक ठिकाणी हरिकेपर्यंत तिला अवलोकिले, आणि विवाहानंतर ज्याप्रमाणे स्त्रीचे व्यक्तित्व एका अर्थाने नाहीसे होते, एका अर्थाने संयोगाने संयुक्त होते व व्यापक होते. तसेच हरिकेचे दृश्य मला दिसत होते. आणि त्याच ठिकाणी शतद्रू ऊर्फ सतलज त्याच अनुभवातून आलेली तिला कडकडून भेटताना दिसत होती. सतलज ही मानससरोवरात जन्म घेते. सुमारे ४०० मैल पश्चिमवाहिनी असून हिमाचलाच्या मांडीवर बसत, नाचतबागडत विलासपूरसारख्या शहरास न मोहित होता, पुढे

शिवाली पर्वतराजीतून मार्ग काढीत आपल्या जन्मस्थानाला बाल्यकालच्या क्षेत्राला भाखराच्या जवळ सोडते, आणि पश्चिमवाहिनी न राहता किंचित नैर्ऋत्येला झुकलेली अशी ती होते; व पंजाबच्या प्रांगणात आल्यावर तिचे व्यक्तिमत्व खुलते, विशाल होते, सखोल होते. अधूनमधून उत्छृंखलता पण ती दाखविते. रूपरनजीक गुरू गोविंदसिंग यांनी स्थापन केलेल्या खालसा धर्माचे पवित्र स्थान आनंदपूर आहे, त्यावर दृष्टिक्षेप करीत करीत कीर्तिपूर येथे अनेक संतांच्या व श्रेष्ठ पुरुषांच्या जीवनातील शेवटच्या आठवणी म्हणजे रक्षा व अस्थी आपल्या प्रवाहात घेऊन अधिक पवित्र भावाने रोपडकडे जाते. १८३१ साली तिच्या तटावरील एका अश्वत्थ वृक्षाखाली महाराजा रणजितसिंग व लॉर्ड बेंटिंग यांच्यामध्ये जी गुफ्तगू व तहाची बोलणी झाली त्याचा कानोसा घेत घेत राजकारणाची शिक्षा प्राप्त करून ती पुढे निघते. आज पंजाबच्या राजकारणात जे काही दिसून येत आहे ते सतलजच्या पाण्याचा गुण, व तिच्या पाण्यापासून उत्पन्न झालेल्या विजेच्या प्रकाशाचे परिणाम आहेत. शीख गुरूंच्या भांडणात फेकून दिलेला आदिग्रंथ 'गुरू' आपल्या जलोदरात तिने सुरक्षितपणे ठेवला, व यथासमय ज्यांच्या हाती द्यावयाचा त्यांना दिला. तुकोबाचे अभंग इंद्रायणीने जसे ठेवले आणि भक्त-जनांना व भावी पिढ्यांना जसे परत केले तसेच सतलजने केले. यावरून असे दिसते की, लोकगंगेने साहित्याची, अध्यात्माची, भक्तीची व भावनेची कदर केली नाही तरी या लोकमाता निश्चितपणे करतात! त्या क्षणाच्या माता नसून युगाच्या,—अनंत काळच्या माता आहेत, व म्हणूनच चिरकालीन हिताच्या दृष्टीने वागण्याची त्यांची प्रवृत्ती असते. लोकांनी त्याग केला, जनतेने गैरसमजाने धिक्कारले तरी ज्ञानी व श्रेष्ठ पुरुषांना त्या पावन करीत असतात. जनतेला आर्त हाक जरी स्पंदित करू शकली नाही तरी पंडित जगन्नाथांच्या निर्मळ मनोहिमालयातून निघालेल्या आर्त हाकेच्या श्लोका-श्लोका-गणिक उचंबळून वर येऊन पुण्यसलिला गंगामातेने त्याला आपल्या पोटाशी धरले. त्याला,—त्याच्या काव्याला अमर केले! ही लोकमातांची परंपरा अखंड आहे, आणि आज कोठे पानशेतसारखा विकृत व विपरीत प्रकार झाला तरी त्याचे कारण मानवाने निर्माण केलेली कृत्रिम व विपरीत परिस्थितीच होय.

शतद्रू पंजाबच्या मैदानातून अनेक ठिकाणी पवित्र क्षेत्रे प्रस्थापित करीत करीत, राजकीय भांडणे तोडीत तोडीत हरिकेला येते. ती जोडते व भांडणे सुरू झाल्यास भांडणाऱ्यांना वेगळे करते. बिआस व सतलज या दोघींनी आगमनापासून आजपर्यंत इतिहासाची अनेक नाटके व प्रहसने पाहिली आहेत. पराक्रमी मराठ्यांना त्यांनी मार्ग करून दिला, आणि त्याच श्रद्धेच्या जोरावर भिमथडीच्या तट्टांनी अटकेला पार केले. जबरदस्त मुसलमानांना, म्लेंछांना व यवनांना त्यांनी वाट दिली. पण प्रसंग येतांच त्यांची वाट पण लावली ! हजारो अश्व व किती तरी दारूगोळा या दोन्ही नद्यांनी आत्मसात केलेला त्यांचा इतिहास लोकांच्या पुढे आहे. हजारो वर्षे या वाहातच आहेत व आता मानवाच्या दूरदृष्टीशी व त्यांच्या बुद्धीशी सहकार्य करीत करीत पंजाबच्या प्रदेशाला समृद्धीचे, सौंदर्याचे, समाधानाचे माहेरघर बनवीत आहेत.

मोगलांचा उत्कर्ष व ऱ्हास, त्यापूर्वीच्या लोधी, तगलघ, तसेच दुराणी इत्यादी राजवंशांचे उत्कर्ष व अपकर्ष त्यांनी पाहिले आहेत. महाराजा रणजितसिंग याने लहानशा जहागीरदारीपासून सतलज ते काबूलपर्यंत प्रस्थापित केलेले राज्य त्यांनी पाहिले आहे. वास्तविक सतलज ही शिखांची भाग्यदेवता आहे. तथापि रणजितसिंगाला मात्र ती पूर्वभारतात येण्याला अटक ठरली ! महाराजासाहेब एकाक्ष, पण कल्पनेबाहेर दूरदृष्टी. धूर्त इंग्रजांच्या कारवाईपुढे त्यांचे चालले नाही. पण समर्थ शत्रूशी साहसाने प्रेरित होऊन लढाई देताना प्रक्षोभित झाले तरी हाराकिरी केली नाही. आणि ज्या वेळी त्यांना इंग्रजांविरुद्ध चेतविले जाई त्या वेळी ते म्हणत, ' कोठे आहेत ते मराठ्यांचे लक्षावधी घोडेस्वार ? ते वाकले-मोडले नाहीत. ' तथापि इंग्रजांच्या राजनीतीला कृतज्ञतेचा डाग कधीच लागला नाही ! व त्याचा परिणाम म्हणजे दोन्ही किनाऱ्यांकडील प्रदेश लाल झालेला पाहण्याचे भाग्य सतलजच्या वाट्याला आले !

सत्ता ही स्वभावाने क्षणिक आहे. राजनीती वारांगनेप्रमाणे असते. तसेच सत्तेचे स्वरूप असते. सामर्थ्य आहे तोपर्यंत ती नांदते. जो समर्थ असेल त्याच्याकडे ती जाते ! तिचा राक्षसविवाह असतो ! तिला ' बळेंच लक्ष्मी धरोन न्यावी ' हाच अनुभव येत असतो. पेशवाईतील एका वाईकर सावकाराने लिहिले आहे, " मुली व मामलती यांचा भरवसा धरू नये.

एक परक्या घरी जाते, दुसरीला परके नेतात." इंग्रज सत्तेलाही ताम्रपट मिळाला नव्हता व तिलाही १५ ऑगस्ट १९४७ रोजी सिंहासनावरून उतरावे लागले. आणि ही गोष्ट ज्या अनेक देशभक्तांच्या त्यागाने घडून आली त्या देशभक्तांपैकी भगतसिंग, सुखदेव, व राजगुरू यांच्या प्रेतांचे दहन सतलजने १९३१ च्या मार्च महिन्यात पाहिले, त्यांच्या अस्थी व रक्षा आपल्या उदरात घेतल्या, व ह्या घटनेचा बदला घेतला गेलेला क्षणही तिने पाहिला. हरिके येथील संगमापासून खाली दहा बारा मैलांवर, ज्या ठिकाणी या तीन हुतात्म्यांच्या प्रेतांचे दहन झाले ती जागा आहे. सतलजच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. ती जागा १९५९ साली भारतात नव्हती ! म्हणून दूर अंतरावरूनच मी तिला पाहिले. आता सीमावादाचा निर्णय लागल्याने ती भारतात समाविष्ट झाली आहे, व त्या ठिकाणी पंजाब सरकारने स्मारक करावयाचे ठरविले आहे. हरिके येथे विपासा व शतिद्रू यांच्या संगमाचे महत्त्व आधुनिक इतिहासाच्या दृष्टीनेही मोठे आहे !

या संगमावर आता मोठा बराज बांधला आहे. त्याचा इतिहास असा आहे की, फाळणीच्या कायद्याप्रमाणे तात्पुरत्या सीमा ठरविल्या होत्या; पण फाळणी करण्याचा निश्चय झाल्यानंतर काही सीमाभाग निश्चित करण्याच्या दृष्टीने रॅडक्लिफ साहेबाची नेमणूक झाली होती, आणि त्याने सतलज नदीला सीमा न धरता हरिकेच्या खाली सात-आठ मैलांवर सतलजच्या पूर्व तीरावर सुमारे दोन मैल लांब व अर्धा-पाऊण मैल रुंद असा अर्धवर्तुळाकार भाग पाकला दिला. व फिरोजपूरजवळ असलेला सतलज नदीवरील फिरोजपूर बराज जवळील थोडासा प्रदेश भारताला दिला. वरवर पाहणाऱ्याला हे सयुक्तिक दिसते, तथापि त्यात मोठे कारस्थान होते. फिरोजपूरजवळील बराजमधून द्विपालपूर कॅनॉलद्वारे फाळणीपूर्वी पाणी भावलपूर पर्यंत पाकिस्तान विभागातून जात असे व त्या कामी भारत सरकार आपल्या हक्कांन्वये व करारांन्वये ते पाणी तोडील, म्हणून त्या बराजच्या वर काही मैल दोन्ही किनारे वर लिहिलेल्या अर्धवर्तुळाकार जागेचे पाकिस्तानला देऊन नवीन बराज घालण्याची संधी त्यांना उपलब्ध करून दिली व त्याप्रमाणे फाळणीनंतर अवघ्या चारपांच महिन्यांतच पाक सरकारने कामाला सुरुवात केली. तो बराज पुरा झाला असता तर सतलजचे सर्व

पाणी पूर्व किनाऱ्याजवळून पाकिस्तानने आपल्या मुलखात नेले असते व फिरोजपूर जवळील बराज निरुपयोगी ठरला असता व त्या ठिकाणाहून कालवा काढून पंचवीस वर्षांपूर्वी जो गंगा कालवा चालू केला होता तो बंद पडला असता. भारतीय इंजिनीअरांनी प्रस्तुत लेखकाला हा धोका सांगितला. त्यावर उपाय म्हणजे हरिकेजवळ संगमावर नवा बराज बांधणे हा एकच. प्रस्तुत लेखकाने ताबडतोब निर्णय घेऊन सगळ्या लाल फिती गुंडाळून बाजूला ठेवून तो प्रकल्प मंजूर केला, आणि त्या हरिके बराजचे कार्य दोन वर्षांत पूर्ण झाले. तेथून आता नवीन राजस्थान कालवा काढला असून तो राजस्थानच्या रेताड मुलखातील रुक्ष भूमीला समृद्ध व सुंदर करीत करीत सौराष्ट्रातून अरबी समुद्रापर्यंत नेला जाणार आहे.

मानस सरोवरात जन्मलेल्या सतलजचे पाणी थोड्याच वर्षांत सोमनाथाच्या पादक्षालनार्थ जाईल ! निसर्गावर हा मोठा विजय मानवी शक्तीने व साहसाने मिळवला, असा याचा अर्थ आहे. त्या दिवशी बराजजवळ असताना वरील सारे विचार मनात येत होते. तो सुंदर संगम पाहून काव्यमय मन झाले तर आश्चर्य नाही ! याच संगमक्षेत्री महाभारतकार व्यासमुनी यांनी महाभारताची रचना पूर्ण केली, असा इतिहास आहे, व लोकांची समजूतही त्याप्रमाणे आहे. या पवित्र संगमतीर्थी बसून महान ऋषी व महान तपस्वी मनू यांनी आपल्या स्मृतीची रचना केली, असे सांगतात. या लोककथांतून अगर दंतकथांतून सत्य किती हे सांगणे कठीण आहे. पण अशी महान रत्ने, तेजस्वी मने या संगमतीर्थावर आली असताना श्रेष्ठ रचना व कलात्मक सृजन केल्याशिवाय राहणे शक्य नाही एवढी गोष्ट निश्चित.

दृष्टीसमोर दोन्ही नद्यांचे एकच झालेले पाणी दूरदूरपर्यंत दिसत होते, आणि हजारो मैल उराशी बाळगलेला पृथकपणाचा भाव सीमावादाचा तंटा न घालता, सत्याग्रह न करता ते समात करीत होते. हे भावात्मक ऐक्य प्रत्यक्ष होते, दिव्य होते, काव्यमय होते. माझ्यासारख्या रुक्ष माणसालाही या प्रसंगी स्फूर्ती झाली तर त्याचे श्रेय या संगमाला आहे. 'संगमे नदीनाम् धीमान् विप्रो प्रजायते।' ही ऋषींची वाणी एक शाश्वत सत्य आहे याचा अनुभव आला.

❀ ❀ ❀

टोपीची कहाणी : ११ :

तसे म्हणाल तर ६७ वर्षांच्या जीवनात अनेक टोप्या माझ्या शिरोभागी मी मिरविल्या आहेत. अथवा मला टोपी घालण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. माझ्या समजुतीप्रमाणे ते सर्व असहाय्य झाले आहेत. त्यांची समजूत काय असेल हे सांगणे कठीण तथापि एक गोष्ट निश्चित की, टोपीचा परिणाम डोक्यावर बाह्यतःच होतो असे नव्हे; तर ती आपले तत्त्वज्ञान डोक्याच्या आत रुजविण्याचा प्रयत्न करते, व प्रसंगी यशस्वी होतें. आठवते तेव्हापासून मी माझ्या जनानखान्यात किती व कोणत्या टोप्या आल्या, व त्यांचा कोठे, केव्हा व कशासाठी उपयोग केला यांची आठवण करीत आहे. वास्तविक अंगावरील पोषाख म्हटला तर महत्त्वाचा आहे म्हटला तर नाही. 'आकृतिविशेषेषु आदरः पदम् करोति' हे एक सामाजिक सत्य आहे. आणि आकृतीमध्ये विशेषत्व येण्यासाठी महत्त्वाचा भाव पोषाख पुरवीत असतो. अगदी लहानपणी म्हणजे जेव्हा आठवण जन्मली तेव्हा तत्कालीन सभ्यतेप्रमाणे जी लंगोटी संन्यासश्रमात घ्यावयाची ती त्या वेळी लहान मुलांना नेसविली नाही. आजच्यासारख्या विजारी, अर्ध्या विजारी, असे त्या वेळी नव्हते. निदान पुण्यातील वातावरणात नव्हते, आणि माळव्यात वडिलांकडे जेव्हा जाई त्या वेळेला वरील पुणेरी संस्कृती घेऊन जात असे. आणि त्या पोषाखावरून त्या वेळची मित्रमंडळी लंगोटीयार म्हणत. थोड्याच काळात 'यस्मिन् देशे यदाचारः' या न्यायाने तुमान घालू लागलो. पुढे तुमानीचे पर्यवसान चुनीदार पायजम्यात झाले, व नवीन परिस्थितीत साहजिक मित्र-मंडळींनी नवे नाव ठेवले असल्यास नवल नाही. तात्पर्य, पोशाखाने माणसाची प्रतिष्ठा वाढते हे खरे. गांधीजींची प्रतिष्ठा त्यांच्या श्रेष्ठ चारित्र्याने वाढली. त्यांच्या तत्त्वज्ञानाने वाढली, पण त्या कीर्तिपद जीवनाचे प्रवेशद्वार त्यांचा

पोषाख होता. लहानसा पंचा व लहानसे उत्तरीय, या पोषाखातून त्यांना जागतिक प्रतिष्ठा मिळाली असे म्हणणे जरी सर्वस्वी खरे नसले, तरी या पोषाखाने त्यांचे व्यक्तित्व उठावदार झाले. त्याभोवती एक वलय निर्माण झाले. मोर मुगुट, पीताम्बरधारी असा श्रीकृष्ण असल्याने तो अवतारी पुरुष झाला हे सर्वस्वी खरे नाही हे मान्य. मोर-मुकुट, पीताम्बर आणि मुरली ही काढून घ्या म्हणजे श्रीकृष्ण एक मुलींच्या मागे लागणारा उनाड गवळ्याचा पोर ठरतो. आज कित्येक शतके श्रीकृष्ण म्हणजे साहित्याचा आत्मा, संगीताचा मधुर ध्वनी, हे जे दिसून येत आहे त्या सर्व मोठेपणाची वीण वर सांगितलेल्या त्याच्या पोषाखात आहे असे माझे विचारपूर्वक मत झाले आहे ! लोकमान्य टिळकांचे श्रेष्ठत्व हे निःसंशय आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. पण त्याला जी लकाकी प्राप्त झाली आहे, ती आमच्या पुणेरी मंडळींच्या मताने त्यांच्या पोषाखावरून, व त्यांच्या पगडीवरून. रावसाहेब रानडे यांची सर्वज्ञता त्यांच्या महान पागोट्यावरून झाली असे त्यांचे पागोटे बांधणारा एक पगडबंद ५० वर्षांपूर्वी सहज भेटला असताना आत्मविश्वासाने सांगत असे. कै. शंकर त्याच्या अंगावर ज्या वस्तू आहेत त्या नसत्या तर मला वाटत नाही त्याची स्तुतिस्तोत्रे आज जी गाण्यात येत आहेत ती गायली गेली असती. पोषाखात महत्त्व नसते तर ' अरसिक किति हा शेला ' या पदाने जी महाराष्ट्रीयांची मने मंत्रमुग्ध होतात ती झाली नसती.

विहिरीतले पाणी व पोहऱ्यातले पाणी यांत रुचीच्या दृष्टीने फरक नसतो; ' जें पिंडीं तें ब्रह्मांडीं ' तसेच याहिबाबत म्हणणे योग्य ठरणार आहे. व्यक्तीच्या जीवनावर समाज आपल्या आचारविचारांचे संस्कार करीत असतो. समाजातील प्रचलित मूल्ये हीच व्यक्तीचे सामान्यपणे मार्गदर्शन करीत असतात. समाजातील नाना प्रसंग या दृष्टीने मनुष्य अनुभवीत असतो. तथापि त्याला काहींच क्रियास्वातंत्र्य नाही असेही नही. ' आपुला काही रंग बाळगीत जावा ' ही समर्थांची उक्ती यथार्थ आहे. आणि प्रत्येक व्यक्तीचा आपुला काही रंग असा असतो, आणि तो दाखविण्यात व्यक्तीला सुख होत असते; त्याचे व्यक्तित्व खुलत असते, फुलत असते. समाजातील साऱ्या व्यक्ती नाण्यांप्रमाणे एकसारख्या नसतात. नाण्यानाण्यांतील फरक व नाण्यांतील फरक यांतील सूक्ष्म भाव व्यक्तिव्यक्तींत दिसून येत नसले तरी

नामरूपात दोन्हीही भेद स्पष्ट दिसून येतात. एक ईश्वरनिर्मित व एक समाज-आपल्या हुकमी अधिकारात करीत असतो. जन्मलेल्या व्यक्तीचे नाव त्याचे आईबाप ठेवीत असले तरी ते कार्य ते समाजाचे प्रतिनिधी म्हणून करतात. तात्पर्य, समाजात समानतेचा भाव स्पष्ट करण्यासाठी व्यक्तींचे विभिन्नत्व सामाजिक संकेत, सामाजिक मूल्ये या मार्गांनी समाज सतत दाखवीत असतो. व ह्या दृष्टीने विचार करता एखाद्या व्यक्तीने काही पोशाख केला, काही शिरस्त्राण घातले तरी ते सर्व त्याला समाजाच्या सांस्कृतिक व सभ्यतेच्या मर्यादेत राहून करावे लागते. व्यक्ती कितीही एकांगी असली, एककल्ली असली तरी तिचे मन अगर स्वभाव ही निरपेक्ष वस्तू नाही. (अॅबसोल्यूट कॅटेगरी). म्हणून जे समाजाला सोडून, समाजाला अनाकलनीय, अलग, अगर अकल्पित असे काही असू शकत नाही.

माझ्या डोळ्यांपुढे गेल्या ६३–६४ वर्षांच्या आठवणींचा काफिला चाललेला मला दिसत आहे. या चालींच्या प्रमुख ठिकाणी जे दिसत आहे ते असे की, डोक्यावर काही तरी कुंचले आहे. ते एकरंगी नाही, व त्याचा बहुरंगपणा ज्या डोक्यावर ते घातले आहे त्याच्या भावी इतिहासाची कुंडलीच तो आहे, संस्कृत साहित्यकार असे मानतात. की नाटकातील सूत्रधार जे बोलतो त्यात पुढे येणाऱ्या नाटकांतील घटनांचे सूक्ष्मपणे दिग्दर्शन केले जाते. तसेच हे बहुरंगी कुंचले घालून माझ्या जीवनातील सूत्रधार मातापितरांनी रंगीबेरंगी टोपडे घालून नकळत भविष्याचा संकेत दिला असावा. त्यानंतरच्या आठवणींत असे दिसून येते, की कुंचले जाऊन कानटोपी आली आहे. डोक्याच्या संरक्षणाबरोबर कोणी तरी काही तरी कानामध्ये सांगून मुलाला फसवू नये म्हणून कानटोपीद्वारा काळजी घेतलेली दिसून येत आहे. भावी आयुष्यात न बोललेले ऐकू येण्याची कला मला वाटते याच बंदोबस्तामुळेच प्राप्त झाली असावी. मानसिक शास्त्राचे तज्ज्ञ असे सांगतात, की जे असेल, दिले असेल, त्यापेक्षा नसेल, दिले नसेल याकडे मनाची प्रवृत्ती अधिक असते. जे ऐकू येत असेल त्यात कौतुक मानण्यापेक्षा जे ऐकू येत नसेल त्याकडे प्रवृत्ती वाढत जाते. पुस्तकात जे विवरले नसेल जे सांगितले नसेल, व्याख्यानात जे प्रतिपादिले नसेल ते ठासून सांगण्याची महाराष्ट्राची प्रवृत्ती मला वाटते महाराष्ट्राच्या मुलांना कानबंद करणाऱ्या टोप्यांमुळे निर्माण झाली असावी. मूल

चालू लागले म्हणजे शरीराबरोबर त्याच्या मनालाही गती प्राप्त होते. मनही इकडे तिकडे बागडू लागते. शरीराप्रमाणे तेही ठेचाळत असावे, व त्याला वाटणाऱ्या अडचणी व दुःखे आपापल्या परीने ते अभिव्यक्त करीत असते. अप्रबुद्ध मन अफाट विश्वाशी मुकाबला करीत असते. शक्तीपेक्षा जास्त ओझे त्याच्या मनावर असते, व म्हणून मला वाटते, की माळव्यात राहात असल्याने मुरमुरेवाले भय्ये अगर भडमुंजे हे जशी हलकी टोपी घालीत तशी मी घालीत असे. डाकेच्या मलमलचा तागा अंगठीच्या भोकातून काढला जात असे– असे म्हणतात. मी घालीत असलेली टोपी लहानपणीच्या मुठीत मावली जात असे. क्षणभर एका खास अर्थाने माझे डोके माझ्या मुठीत असे. माळव्यातील प्रदेश रजपुती बाण्याचा आणि त्या बाण्याचे प्रदर्शन तेथील सरदार मंडळी आपल्या लहान लहान मुलांना चुनीदार विजारी घालून व डोक्याला फेटे बांधून करीत; आणि त्यांच्या सहवासात नित्य येणाऱ्या माझ्या वडिलांनी अनेक वेळा मला सजवलेले आठवते. लटपटणारे पाय तंग विजारीने स्थिर होत नाहीत, अगर थंड डोक्यावर रजपुती फेटा बांधल्याने राणा प्रतापसिंगाचा आवेश येत नाही. तथापि स्मृतिग्रंथात असे आढळून येत आहे की, ते शिरस्त्राण परिधान केल्यानंतर मी ऐटीने वागत असे, व कौतुक केले जात असे असे आढळून येत आहे.

शिक्षणासाठी महाराष्ट्राच्या विद्यानगरीत म्हणजे पुण्यात वयाच्या ५ व्या अगर ६ व्या वर्षी दाखल झालो. फेटा वडिलांकडेच ठेवला गेला, व भय्याची टोपी घालून नूतन मराठीच्या प्राथमिक शाळेत जेव्हा दाखल झालो त्या वेळी निराळ्या सृष्टीत आल्याचे वाटू लागले. काही नवीन अगर काही अनपेक्षित दिसल्यास त्याची टिंगल करावयाची ही पुणेरी वृत्ती ताबडतोब अनुभवास आली, व वडिलांकडे असताना घरी व बाहेर हिंदी बोलत असल्याने भाषेचीही थोडी अडचण पडू लागली. आणि पुण्यातील मुलांशी दोन हात करावयाचे तर त्यांच्याच शस्त्रास्त्रांचा उपयोग करून हे निश्चित केले. हातात टोपी घेऊन मारामारी करणे अगर ती तोंडावर फेकणे या लढाईच्या योजनेत माझ्या भय्याटोपीला स्थान नव्हते, व एकदोन दिवसांच्या आत हट्ट घेऊन नाराणदास लबीलदास यांच्या दुकानात गेलो, व थोडीशी रेशमी कशीदा काढलेली टोपी येऊन आलो. टोपीमुळे डोक्यात काही नवीन

विचार आले असे जरी म्हणता आले नाही तरी डोक्याचा उपयोग शमीच्या वृक्षासारखा केला, व टोपीचे प्रहरी अस्त्र डोक्यावर ठेवत असे. २-४ दिवसांच्या आत टोपीचे विवरण इतके झाले की, वरची वेलबुट्टीतील फुले प्रभाहीन झाली; व विद्वानांची चर्चा अधिक झाली म्हणजे जसा विचारांचा चोथा वर येतो त्याप्रमाणे टोपीच्या फेकण्यामुळे आतील तरट उघड माथ्याने बाहेर आले, व दिसू लागले. क्षणभर असे वाटले की, मानवी जीवन हे असेच आहे. मुळातील विद्रूप व अप्रशस्त याला काही सामाजिक उपयुक्ततेचा व किंचित सौंदर्याचा मुलामा चढवून मनुष्य वागत असतो. यानंतर जे आठवत आहे ते असे, की घरामध्ये मुंजीचा समारंभ चालू आहे. मातृहीन-कौतुकाचा विषय झालो आहे. तुकाराम न्हाव्यापुढे बसून डोक्यावरील केस निर्मूल करण्याच्या क्रियेचा विषय झालो आहे. रात्री मांडी कापून त्यात काही करणार आहेत अशी दाखविलेली भीती मनात प्रवेश केल्याने तुकारामापुढे बसताना दोन्ही मांड्यांवर हात ठेवून बसलो होतो. प्रतिबंधक उपाय हे अधिक प्रभावी हे तत्त्व जणू काही मी अमलात आणीत होतो. संध्याकाळच्या भिक्षावळीच्या गडबडीत डोक्यावर येणारी टोपी सजलेली दिसून आली. त्या वेळच्या नाटकातील नट जशी भरजरी टोपी घालीत, सर्कशीतील मॅनेजर जशी भरजरी टोपी घालीत त्याप्रमाणे ती टोपी होती. तिचे नावीन्य मला आकर्षक वाटले, पण त्यातील जरीचे काम विशेष आवडले नाही.

१९०५ ते १० सालपर्यंत सालोसाल दिवाळी अगर दसऱ्याला नवी टोपी मिळत असे, आणि हळूहळू दुकानात नेऊन ही का ती हवी आहे एवढी विचारणा होई. जे पुढे असेल त्यातून निवड करावयाची, निवडीचे क्षेत्र एकाच दुकानापर्यंत मर्यादित असे. पुण्यातील बालाजीच्या जवळ ते दुकान होते, व आज जसे 'अशोक हॉटेल'मध्ये दिल्लीस उतरणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते; त्याप्रमाणे नारायणदास छबीलदासची टोपी म्हटली म्हणजे ती राजमुकुटाइतकी प्रतिष्ठापूर्ण मानली जात असे. पुढे अनेक दुकाने झाली. टोपी घालणारे वाढले, टोपीचे विक्रेते वाढले. माझ्या लहानपणी मॅट्रिकच्या वर्गातसुद्धा फेटा घालून येणारे विद्यार्थी दिसून येत नव्हते. घरी नूतन मराठी विद्यालयाच्या मॅट्रिकच्या पहिल्या बॅचमध्ये पास झालेल्या विद्यार्थ्यांचा फोटो होता, व त्यात सर्वांत थोरले चुलत भाऊ फेटा बांधलेले

दिसत होते. किंबहुना सर्व विद्यार्थी फेटेवाले होते. त्यानंतर १५ वर्षांच्या काळात ते सर्व बदलले होते; व आता तर फेटा गेला, पगडी गेली, आणि इंग्रजी टोपी आढळून येत असली तरी ती घालण्यापेक्षा हातात धरणे प्रतिष्ठेचे मानले जात आहे. १९१० सालची वेळ असावी, आणि आम्ही उभयतांनी आजीजवळ हट्ट घेतला, की आम्हांला इटालियन टोप्या हव्यात. ती गोल टोपी त्या वेळी प्रतिष्ठेचे चिन्ह मानले जाई; व असे सांगितले जाई, ती की एक पिढी टिकते. तिला नवे जुने करता येते, व यदाकदाचित डोक्याला वृद्धी आली तर तिलाही वाढविता येते. साधी छबिलदासी टोपी आठ आण्यांत मिळे व या इटालियन टोपीला साधारण दीड-दोन रुपये पडत. ही टोपी घेतली तर ४ वर्षे टिकवू व पैसेही वाचतील, हा आर्थिक दृष्टिकोण मुत्सद्देगिरीने मी तिच्यापुढे ठेवला. भावी आयुष्यात मोठमोठ्या खर्चाच्या योजना अंती स्वस्त ठरतात, ही सांगण्याच्या कलेची बाराखडी अगर धुळाक्षरे याच प्रसंगाने मी गिरविली. आमची आजी म्हणजे जनतेसारखी भोळी होती; तिने माझा दृष्टिकोण स्वीकारला, व असे म्हणाली, की चार वर्षे टोपी घेणार नाही; हरवली तर बोडखा शाळेत घालवीन. आणि मीही तिला हल्लीच्या बनेल मंत्र्यांप्रमाणे आश्वासन दिले, की मी चार वर्षे तरी टोपी मागणार नाही. मला संमती मिळाली, त्यात दोन्ही जेष्ठ बंधूंना मिळाली. निदान त्यांनी तसा अर्थ केला. आणि आम्ही त्या टोप्या घेऊन आलो, व १९१० पासून १९२१च्या सुरुवातीपर्यंत एकादश वर्षे त्या टोपीला मी शिरोभागी मूषवीत गेलो. तिचा गोल आकार मोहक होता. पुनः पुन्हा साफ केल्याने तिच्यामध्ये 'नवताम् उपयति' असे होत होते. ह्या ११ वर्षांत २ वेळा १-१ रुपया देऊन तिला उलटे सुलटे केले होते, व ती अंतर्बाह्य एकच आहे ही तिच्यातील सुसंगती अनुभवली होती. तशी टोपी घालणाऱ्या ज्या व्यक्ती आजही थोड्या दिसून येतात त्यांत पंडित कुंझरू हे आहेत. कै. नारायण मल्हार जोशी कायदेमंडळाबाहेर तीच टोपी वापरीत. प्रागतिक पक्षाची ती त्या वेळी निशाणी झाली होती. जहाल पक्ष अद्यापि पगडीच्या मर्यादेत वागत होता. कार्हींचा खापर्डे छाप फेटा असे, पण कटाक्षाने इटालियन कॅप "गायकवाडी सेना" टाळत असे, ती विदेशी आहे म्हणून. या टोपीतच डोक्याचे वास्तव्य असताना मॅट्रिक झालो. बडोदा

कॉलेजमध्ये राहिलो. फर्ग्युसनमध्ये ह्या टोपीच्या छत्रछायेखाली बी. ए. ची परीक्षा पास झालो. याच टोपीच्या कारकीर्दीत पुण्यातील होमरूलची आंदोलने पाहिली. त्यात मर्यादेत भाग घेतला. सभा कशा मोडाव्यात, कशा उधळून लावाव्यात, अगर कडवा जबरदस्त विरोध असताना यशस्वी कराव्यात याचे प्रत्यक्ष शिक्षण घेतले. राजकारणाचे ज्ञान याच टोपीच्या साहाय्याने तिच्याच देखरेखीखाली प्राप्त करून घेतले, व मुंबईत बी. ए. झाल्यावर २ वर्षे याच टोपीने कायद्याच्या ज्ञानाला डोक्यात प्रवेश करण्यासाठी मदत केली.

२० साली LL. B. झालो व ज्या दिवशी सनद घेतली त्याच दिवशी कलकत्ता येथे असहकारितेचा ठराव पास झाला. आणि गृहप्रवेशाच्या दिवशी वैधव्य यावे त्याप्रमाणे माझ्या वकिलीचे झाले; मेंदीचा रंग नाहीसा होण्यापूर्वीच ती व्यर्थ ठरली,– अशुभ ठरली. त्या वेळी गांधींच्या कार्यक्रमाबाबत सर्वच शाळा-कॉलेजांतून ते आचाऱ्या-वाढप्यांच्या अड्ड्यापर्यंत गांधींची चर्चा चालू होती. सर्वजण मनाच्या चवड्यावर उभे राहून भविष्याची आतुरतेने वाट पाहात होतो. वकिलीची सनद घेतली त्या दिवशी विद्यमान नीतीला धरून तात्पुरती डोक्यावर पगडी घातली होती. मनाला बरे वाटत नव्हते. पण व्यवसायाची नीती सांभाळावयाची होती. कोर्टात जात होतो, पण केवळ प्रेक्षकच होतो. कोर्टापुढे काही सांगण्याऐवजी बाररूममधील 'कोपरा क्लबचा' सभासद झालो होतो, व राजकारणाशिवाय काहीच बोलत नव्हतो. ऑगष्ट ते डिसेंबरपर्यंतचे महिने हॅम्लेटच्या मनाप्रमाणे माझ्या मनाला कष्ट देत होते. भावना एकीकडे ओढीत होती व बुद्धी एकीकडे ओढीत होती. या संघर्षात कोण विजयी होणार हे कळत नव्हते; आणि १९२० डिसेंबरमध्ये नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात उफाळलेल्या उत्साहाच्या दर्यात डोक्यावरची टोपी राहिली तरी मनावरील टोपी गायब झाली, व तेथून परत आलो तो तात्यासाहेब केळकरांच्या आग्रहाने जिल्हा काँग्रेस कमिटीचा चिटणीस झालो. त्या भूमिकेतील पथ्य सांभाळले पाहिजे याची जबाबदारी उत्पन्न झाली, व मातेने आपल्या मुलाला बळी द्यावे असे जे श्रियाळाचे चरित्र पुराणात आहे त्याप्रमाणे माझ्या दक्षिण बाहूने निष्ठुरपणे ११ वर्षांची सहचारिणी ती इटालियन टोपी मी फेकून दिली.– आणि तिची जागा जिला आता गांधी टोपी हे

नाव प्राप्त झाले आहे तिला दिले, व या नव्या घरोब्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. जी चालत नव्हती ती वकिली सोडली होती, पण आपण चित्रात नाही हे बरे वाटत नसल्याने राजकीय खटल्यानिमित्त कोर्टात जात असे व त्या वेळी डोक्यावर पगडी पण खादीची घालीत असे. जसे कित्येक दुआनवी राजकारण करतात, दुहेरी वागतात,– आणि असल्या राजकारणास पुण्यात त्याही वेळी प्रतिष्ठा होती.– मीही वागू लागलो. २१ साली १ कोटी रुपये, १ कोटी सभासद, १ कोटी चरखे येवढा कार्यक्रम पुरा करावयाचा होता, व तो ३१ मे १९२१ च्या आत. १९०५–६ साली पुण्यात झालेली लकडीपुलापलीकडील विलायती कपड्यांची होळी पाहिली होती त्या ठिकाणी तरुण सावरकरांचे झालेले भाषण ऐकले होते; आणि आता पुन्हा एकदा विलायती मालाची होळी करायचा कार्यक्रम गांधींना नापसंत असूनसुद्धा गावठी गांधींनी सुरू केला होता. अशा एक प्रसंगी जुने विलायती कपडे मागण्यास आलेल्या स्वयंसेवकांना आमच्या श्रीमतीने ते दिले व त्याबरोबर टोपीही दिली हे घरी आल्यावर कळले. शेवटले दर्शनसुद्धा मला मिळाले नाही, व ही ११ वर्षे डोक्यावर ठेवलेली टोपी अग्नीला बळी दिली गेली. नाटकात १ पात्र नाहीसे झाले म्हणून नाटक बंद करता येत नाही, रंगभूमी चालूच राहिली पाहिजे. टोपी गेली पण डोके आहे ना ! आणि गांधी टोपी आली होती, कानामागून येऊन तिखट वाटू लागली होती. तिने कोर्टापुढे मला उभे केले होते, व तुरुंगाचे दर्शनही घडवून आणले होते. बार्डोलीचा लढा परत घेतल्यानंतर पुन्हा कोर्टात जाऊ लागलो. आशिलेही येऊ लागली, व एके दिवशी खादीची पगडी न घालता गांधी टोपी घालून गेलो. आवतीभोवती सर्व वकील पगडी अगर फेटे घातलेले होते. न्यायाधिशाच्या लक्षात डोक्यातील बदल दिसून आला नसला तरी डोक्यावरील शिरस्त्राणाचा बदल ताबडतोब दिसून आला, व त्याने म्हटले, की हा बदल का ? मी उत्तर दिले,– 'असा अनुभव आला आहे की, माझे अशील माझ्या डोक्यावर काय आहे याकडे लक्ष न देता डोक्यात काय आहे याकडे लक्ष देतात.' (They look more to my head than to my headress) बसलेल्या वकीलांना माझा विनोद अगर अधिकपणा बरा वाटला नाही. न्यायाधीश इंग्रज होता, व तो म्हणाला, की I shall do

the same (मीही तसेच करतो.) त्यात किती विनोद व मार्मिकता होती, अगर किती सूक्ष्म व्यंजना होती हे सांगणे कठीण. तिन्हीही त्यात होती.

१९२१ सालच्या सुरुवातीपासून अगदी आजतागायत गांधी टोपी माझे शिरोभूषण बनली आहे. जवळजवळ ४१ वर्षे एकपत्नीव्रताने वागावे तसे तिच्याबाबत वागत आहे. जेलमधील प्रसंगातूनसुद्धा तिची साथ मी सोडली नाही. तिच्या सान्निध्यात या ४० वर्षांच्या राजकारणात फूल व फत्तर यांच्याशी मुकाबला केला. किती तरी तिच्या नेटावर समाजात वक्तृत्वाची ' नौका ' जनसागरातून पार केली. ती जशी, ज्या आकाराची, ज्या छटेची, ज्या कोनात १९२१ साली होती ती सर्व लक्षणे आजही आहेत. कडक इस्तरी तिला वावगी आहे. निदान माझ्या सान्निध्यात तरी- प्रसंग असा आठवतो, की काही कामानिमित्त मुख्यमंत्री खेर यांना भेटावयास गेलो असता त्यांच्या खोलीत कोणी तरी होते, व थोडा वेळ मला बाहेर उभे राहावे लागले. त्याचा राग नव्हता, पण त्यांचा चपराशी याला खेद वाटत होता. मी त्याला विचारले, ' कोण आत आहे ? ' त्याने उत्तर दिले, कोणीही खादीची टोपी घालावी, खळ लावून इस्तरी करावी, येथे यावे व सरळ प्रवेश मिळवावा असे आहे.' कोणीही खळ लावावी व जेथे प्रवेश लायकीने अगर चातुर्याने मिळत नसेल तेथे मिळवावा हे आजच्या सार्वजनिक जीवनाचे लक्षण झाले आहे. ' वारा येईल तशी पाठ ' ही म्हण आता मागे पडली. आता ' जशी सत्ता तशी टोपी ' ही म्हण यथार्थपणे प्रभावी दिसून येत आहे. गांधी टोपी सरळ व न झुकता ओळंब्यात घालणारे क्वचित; कारण जरा तिरकस घातली म्हणजे पुढारीपण येते असा विश्वास अनेकांचा झाला आहे. ज्यांचे विचार सरळ नाहीत त्यांचे प्रतिबिंब कदाचित या तिरकस कोनात टोपी ठेवल्याने होत असावे. खादीचे नैतिक अधिष्ठान आता राहिले नाही. तिचा निष्काम अभिमान पण राहिला नाही, नम्रता व निश्चय यांची ती निशाणी राहिली नाही. सामाजिक समता हा तिच्यातील भाव लुप्त झाला आहे. तिच्या आच्छादनाखाली धूर्तपणे जितके जनतेला लुबाडता येईल तितके लुबाडावे. तिच्या साहाय्याने खटले भरणे थांबवावे, भरलेले काढून घेववावेत, व यदाकदाचित ते चालण्यास तिच्याच साहाय्याने कसा जरी पुरावा असला तरी निर्दोषपणे मुक्त व्हावे अशी तिची क्रिया आता

समाजाने जाणली आहे. गेल्या १।। वर्षात अनेक वेळा असे वाटले, की आपण तिचा त्याग करावा. तथापि त्याच टोपीने आदर्शाला निष्ठावंत राहावे हे शिकवले असल्याने ते जमले नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तारीख १६ जानेवारीच्या १९५६ च्या शिवाजीवरील सभेत साहित्याशी सायुज्यता पावलेले रसायनमग्न स्थितीत आचार्य अत्रे त्या सभेला आपल्या निवडक पुजाऱ्यांसह हजर होते; व त्या मंडळींनी टोपी काढा– व मुर्दाबाद अशा ललकाऱ्या दिल्या. सभोवती हजारो माणसे होती, आणि एवढा प्रचंड श्रोतृवृंद पाहिल्याने अनेक वक्त्यांची मने मदोन्मत्त झाली होती; व काही वृद्ध नेत्यांनी उघड उघड हिंसेला प्रोत्साहन पण दिले. आणि त्या चक्रव्यूहात अभिमन्यूप्रमाणे मी सापडलो होतो. मी म्हणालो की, इंग्रज सरकारचे राज्य असताना या टोपी घालण्याबद्दल अनेकांना जबरदस्त शिक्षा मिळाल्या. तेव्हा ही डोक्यावरून काढली नाही, व आजही काढणार नाही !—

जे काही आज जीवनात बाह्यदृष्ट्या झालेले दिसत आहे त्याची रंगीत तालीम मनाच्या रंगमंचावर झालेली आहे, व त्या कामी टोपी साक्षीभूत झालेली आहे !

❀ ❀ ❀

आयुष्यामध्ये जर एकसारखेपणा, तोच तोपणा असेल, तर ते जीवन व पशुजीवन ह्यांत काही फरक राहणार नाही. अगदी प्रत्येक गोष्ट सकाळपासून रात्रीपर्यंत अगदी नियमितपणे चालेल, तर जीवन रुक्ष व अर्थहीन होते. त्यात अनुशासन येईल, आनंद उत्पन्न होणार नाही. कदाचित कार्यक्षमता वाढेल, पण प्रतिभा लुप्त होईल; निदान कानसली जाईल. काही चांगले, काही वाईट; कधी अंधार, कधी उजेड– अशा विविधतेत अनुभव येत असला म्हणजे तो रंगतो, आणि त्यात अधिक मार्मिकता, सार्थपणा येतो. अनेकांना असे वाटते की, आयुष्यात कोठेही अपरिचित भेटू नये, अनपेक्षित आढळू नये. बारा महिने वसंतऋतू राहिला तर,– सर्वांना तो पसंत पडणार नाही. म्हणून, वसंताची लज्जत शिशिरऋतूत येते. एका उर्दू शायराने म्हटले आहे की, ' कदम जब लडखडाये तो सहारे याद आते हैं । तिमिरमय रातमें अक्सर सितारे याद आते हैं । ' पाय लटपटू लागले की निश्चल स्थान आठवते, अंधारामध्ये ताऱ्यांची आठवण होते. शिशिरऋतूमध्ये वसंताची आठवण होते. त्याच शायरने पुढे म्हटले आहे की, ' कही पर नासुरी टुटी कही पर रो रहा सरगम । अरे अिस प्यारके पथपर सलामत कौन रह गया । ' तात्पर्य, जीवन हे विरोधाभास आहे. किंबहुना जीवन म्हणजे विरोध हेच खरे. त्या व्यतिरिक्त जे असेल त्यात जीवनच नाही असे म्हटले तरी चालेल. ज्याच्या आयुष्यात चढउतार, आशा-निराशा, सांगता व वैफल्य यांची गर्दी असते, तो माझ्या दृष्टीने सुखी. म्हणूनच त्या ऑक्टोबरच्या एका तारखेस मुंबईहून गर्दीने परिपूर्ण झालेल्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात कूर्मवत आखडून बसलेल्या मला आनंद होत होता.

सभोवताली इतकी माणसे बसली होती की, मागणीपेक्षा पुरवठा जास्त हा हिंदुस्थानात क्वचितच येणारा अनुभव तेथे येत होता. डब्यामध्ये चोवीस माणसे बसण्याची सोय होती, पण माझ्या मनाने जवळजवळ अठ्ठेचाळिसांच्यावर ती होती, अशी गिनती केली होती. बाकावर जागा न मिळालेले दोन बाकामध्ये सामान टाकून त्यावर बसले होते, आणि बाकावरील लोकांनी वाकडे पाऊल करण्याची संधी न देता, जवळजवळ योगासन न घालताच स्थिरता प्राप्त करून दिली होती. वरच्या वर्गाच्या डब्यांत सहप्रवाशांच्या परवानगीने धूम्रपान करावे, अशा सूचना असतात. येथे तसले काही पथ्य सांगितले नव्हते.

गेल्या आठवण असलेल्या ६० वर्षांच्या जीवनात सर्व तऱ्हेच्या वाहनांतून व वर्गांतून प्रवास केल्याचे भाग्य अगर दुर्भाग्य मला प्राप्त झाले आहे. प्रत्येक वाहनाची अशी एक प्रतिष्ठा असते. व प्रत्येक वर्गाची अशी प्रतिष्ठा असते. पायी जाणारांना स्वाभाविकपणे कमीपणा वाटण्याचे कारण असू नये, पण अनेकांना तसा कमीपणा वाटतो. सुभाषितामध्ये सप्तशल्ये सांगितली आहेत,–' शशिदिवसभूसरः गलितयौवना कामिनी ' त्याप्रमाणे अधिकारविमुक्त व्यक्ती हेही एक शल्य आहे. पण ते लोकांना तसे वाटले पाहिजे. संबंधित व्यक्तींना तसे वाटण्याचे कारण नाही. वार्धक्याने, प्रकृतीच्या बिघाडामुळे चालावे लागले तरच काही माणसे चालतात. अन्यथा वाहनाशिवाय त्यांची वाहतूक असूच शकत नाही. तथापि अधिकाराच्या व प्रतिष्ठेच्याही कल्पना बदललेल्या आहेत, आणि अलीकडे-अलीकडे मोटार मालकसुद्धा पायी चालण्यात अभिमान बाळगतात, पण तो कृत्रिम असतो. त्यात श्रीमंती दाखविण्याचा हेतू नसतो, पण आपले वैशिष्ट्य दाखविण्याचा अभिमान निश्चित असतो. किंबहुना जे साहजिक नसते ते सरळ नसते, व कृत्रिम कागदाच्या अगर कापडाच्या फुलाला शोभा येत असली तरी सुवास येत नाही, असेच थोडेसे असते.

ह्या उलट अशा काही व्यक्ती असतात की, त्यांच्या वागणुकीतील स्वाभाविकता अकृत्रिमपणे सरळ असते. आणि कोठलेही कृत्रिम महत्त्व अगर अलंकार त्यांच्या कीर्तीचा अपमान करू शकत नाहीत. सर्वसामान्यपणे पायी चालणारा मनुष्यसुद्धा अनेक प्रसंगी रुबाबाने चालतो. त्याच्या चालण्यात

त्याचे चारित्र्य जणू काही गतिमान झालेले असते. फौजी शिपाई निवृत्त झाला तरी त्याची पावले व्यवस्थित, त्याची हालचाल लयबद्ध, आणि एक शिस्तीचे वातावरण घेऊनच तो चालत असतो. शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी शाळा सुटल्यानंतर रस्त्यावर जेव्हा आक्रमण करतात, त्या वेळेला त्यांच्यांत कृत्रिमता नसते, त्या बागडत असतात, आणि त्यांच्या मनाचा स्वच्छंदपणा त्यांच्या किलबिलीतून मुखरित होत असतो. तथापि, पायी चालणारा इसम, सायकल चालवणाऱ्या इसमाबाबत अगर मोटरीतून जाणाऱ्या इसमाबाबत पूर्णपणे उदासीन असतो असे नाही. थोडेसे सोडून दिले तर सामान्यपणे ह्या वाहनांतून प्रवास करणारांचा त्यांना हेवा वाटतो. तीच परिस्थिती अन्य वाहनांतून जाणाऱ्या लोकांच्या बाबतीत असते.

नवीन मॉडेलमधून जाणारा मोटरवाला हा मागल्या वर्षीच्या मॉडेलला डबडे ही पदवी बहाल करीत असतो. सायकलवाल्याची प्रवृत्ती काही खास अशी असते. आपण अधिक गतिमान आहोत, ह्याची जाणीव त्याला नकळत पछाडीत असते. जेव्हा तो सायकल हाणत असतो, त्या वेळेला आपण काही तरी पराक्रम करीत आहोत, असेच त्याला वाटत असते. सायकलला वाट काढण्यात अनेकांच्या वाटांमध्ये अडचणी उत्पन्न करीत असतो. अपघात वाचवला, ह्यात कोणाला दुखापत झाली नाही, ह्या जाणिवेपेक्षा आपल्या कौशल्याचीच तो तारीफ करीत असतो. ह्या घटनेत कोणी स्पर्धा करणारा नसल्याने त्याचे मन त्यालाच श्रेय देत असते.

मोटरीतून जाणारांची वृत्ती काही निराळी व खास अशी असते. जेथे एखाद्या पदार्थाचा उपयोग मुबलक, मोठ्या प्रमाणावर होतो, तेथे त्याचा उपयोग सामाजिक प्रतिष्ठा देण्याच्या कामी सुरुवातीइतका राहात नाही. आता सायकली अगणित झाल्याने सायकलीचे कौतुक शून्य झाले आहे. शहरात तर निश्चित. खेड्यात ते तसे होऊ लागले आहे. जेथे २० वर्षांपूर्वी साधी सायकलसुद्धा परदेशाहून आणावी लागे, तेथे आज १० लाखांवर सायकली दरवर्षी तयार होत आहेत. आज मोटरचा उपयोग तेवढ्या प्रमाणात भारतात नाही. अमेरिकेमध्ये मोटर ड्रायव्हरची मोटर असते, खानसाम्याचीसुद्धा. दर ३ माणसांमागे १ गाडी, असे अमेरिकेचे प्रमाण असल्याने मोटरीत बसण्यात काही सामाजिक प्रतिष्ठा आहे हा भाव तेथे नाही. त्याची जागा

आता नव्या नव्या मॉडेलच्या मोटरीत बसण्याने होणाऱ्या भावनेत घेतली आहे. भारतात अजून १०० माणसांमागेदेखील १ गाडी नाही. त्यामुळे मोटारीत बसणे त्यात मनाला थोडा अभिमान वाटतो, आणि ती मालकीची असली तर सामाजिक प्रतिष्ठा मिरविली जाते.

गजान्तलक्ष्मी म्हणून आपण श्रीमंतीचे माप ठरविले आहे. केरळात, आसामात, बिहारच्या काही भागात ह्या गजश्रेष्ठांना नांगराला जुंपतात, ओंडे वाहण्यासाठी त्यांचा उपयोग करतात. बिचारा गजराज हरकाम्या असतो. त्याच्या मालकाला हत्ती असण्याने काही प्रतिष्ठा वाटत नाही. पंजाबमध्ये व राजस्थानात उंटाचा उपयोग सायकलीइतका व्यापक आहे, त्याचमुळे त्यावर बसणारांना उंटावरचे शहाणे कोणी म्हणत नाही. वाहन व्यक्तीला सापेक्षतेने प्रतिष्ठा देते एवढेच खरे, आणि ही सापेक्षता सामाजिक संस्कृती व परिस्थितीवर अवलंबून असते; आणि दुर्मिळता ही प्रतिष्ठेची जननी आहे. जेथे झाडच नाही तेथेच ' एरंडोऽपिद्रुमायते '. वस्तूचा वापर जितका कमी तितकी तिची योग्यता अधिक. घरोघरी विद्या नाही, अगर लक्ष्मी नाही, म्हणून त्यांची पूजा होते. प्राचीन काळी अग्नी मिळणे कठीण होते, म्हणून तो देवतास्वरूप झाला. यज्ञात त्याला मोठे स्थान मिळाले. आता कोपऱ्यावरील पानवाल्याच्या दुकानी लहानशा आगपेटीत सडपातळ काडीत युग जाळणारी ही शक्ती व व्यक्ती मुकाट्याने बसली आहे, म्हणून आता त्याची पूजा नाही. मोटरीचा उपयोग गेल्या ३० वर्षांत आता भारतातही वाढला आहे, त्यामुळे त्यांचीही प्रतिष्ठा कमी होऊ लागली आहे. महाराणीबरोबर महारणी पण मोटरीत बसू लागल्या आहेत, विद्वानांबरोबर निरक्षरसुद्धा बसू लागले आहेत. तथापि, अजूनही मोटरीतून जाणाऱ्यांची संख्या सायकल व पायी चालणारांच्या संख्येपेक्षा कमी असल्याने मोटरीत बसणारांच्या मनातील भावना थोडी अहंपणाची असते. कारण नसताना तो बाहेर डोकावून पाहतो, व घटकाभर त्याला असे वाटते, की रस्त्यातून जाणारी सारी जनता आपल्याकडेच पाहात आहे. विशेषतः, जेव्हा खेडेगावातून मोटरीचा प्रवास मनुष्य करीत असतो, त्या वेळेला भावना सामाजिक प्रतिष्ठेत अधिकाधिक रस घेत असते. रेल्वेने प्रवास करणे आता पायांनी प्रवास करण्याइतके सामान्य व स्वाभाविक झाले आहे. १००

वर्षांपूर्वीची सामाजिक परिस्थिती बदलली, बिचाऱ्या रेल्वेला त्या वेळी यात्रेकरू प्रवेश करण्यापूर्वी ओवाळत, ते कौतुक आता राहिले नाही. दुर्मिळता गेली पण समाजामध्ये सर्वांना समान प्रतिष्ठा असावी, ही भावना अद्यापिही रुजू झाली नाही. तिची आविष्कार मग त्यातले त्यात तफावत दाखवून मनुष्य करीत असतो. दुसऱ्या वर्गाने जाणारा उतारू तिसऱ्या वर्गातील उतारूकडे किंचित तुच्छतेने पाहतो. तोच अहेर त्याला मग पहिल्या वर्गाचा उतारू परत करीत असतो. पण त्यालाही तसाच अहेर अएर कंडिशण्ड-मधील बसलेल्याकडून मिळतो.

प्रतिष्ठेची ही उतरंड अशी दिसून येते, आणि त्या दिवशी मी तर तिसऱ्या वर्गात जागा राखून न घेता प्रवास करीत होतो. त्यात सामाजिक परिस्थितीचा मला विसर पडला होता, असे नव्हे. ती मूल्ये मनाच्या समोर येत नव्हती असेही नव्हे. पण माझ्या आध्यात्मिक अर्थशास्त्राने त्या सर्वांचे अवमूलन केले होते. आर्थिक परिस्थितीसाठी त्या स्थितीत प्रवास करीत होतो असे म्हणता येणार नाही. खास विमानापासून, खास गाडीपासून, एअर कंडिशण्ड सलूनपासून , पहिला वर्ग, दुसरा वर्ग—या सर्वांतून प्रवासा-तील सुखदुःखे मी अनुभवली आहेत. वाहनांचा व्यक्तीवर काय परिणाम होतो, याचे मोजमाप माझ्या संशोधक मनाने घेतलेले आहे. मनाच्या अनुभवाच्या जमाखर्चात त्याची नोंद आहे. विमानातून प्रवास करताना उच्च वातावरणीय गोष्टीप्रमाणेच अल्प व हीन वृत्तीचाही परिचय मला आलेला आहे. पहिल्या वर्गातून प्रवास करणारे सर्वच संपन्न अगर सभ्य असतात असाही अनुभव नाही. देवळात ज्याप्रमाणे वाईट दृष्टीने लोक येतात तसेच याही बाबतीत घडून येते; आणि दोन-तीन वेळा पहिल्या वर्गातून प्रवास करीत असतानाच चोरांशी मुकाबला झाल्याने त्या स्थितीतील प्रवास अभय देतो, असे मानण्यास माझे मन तयार नाही. ७० च्या घरात आलेला असा मी आपणहून खुशीने ह्या जनता वर्गाने प्रवास करीत होतो. विद्यमान राज्यव्यवस्थेखाली ज्यांच्यापासून सत्तेला अधिक मिळते त्यांची अधिक गैरसोय असा सिद्धान्त लोकांच्या अनुभवाला येत आहे. ८० टक्के उत्पन्न तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांकडून पण ९० टक्के सोय व सुविधा राहिलेल्या २० टक्के लोकांसाठी. तिसऱ्या वर्गात माणसे बसतात, असे म्हणण्याचे धाडस मी करतो,

त्याचे कारण चतुष्पाद तेथे कोणी दिसत नाहीत. मुकी नाहीत पण कुणीही मुकाट्याने हाकावीत, अशी ही जनता आहे.

त्या लहानशा डब्यात साऱ्या विश्वाचे दर्शन मला होत होते. विमानातून प्रवास करताना भेटणारे सहयात्री, त्यांच्या चर्चेचे विषय व येथील चर्चेचे विषय ह्यांत अक्षरशः जमीन-अस्मानचे अंतर होते. तेथील चर्चेचे विषय 'गोष्टी वधूधनांच्या' हेच सामान्यतः असत. सहप्रवाशात सरकारी अधिकारी व्यापारी व त्याचप्रमाणे उगाच सरकारदरबारी दुसऱ्यांच्या पैशाने हेलपाटे घालणारे हे भेटत. ह्या ठिकाणी दुसऱ्यांच्या पैशाने जाणारा क्वचितच असेल. फुकटात जाणाऱ्यांचे प्रतिनीधी असू शकतील. धूम्रपान बऱ्याच प्रमाणावर चालू होते, आणि मी माझी संयमशक्ती वाढवीत होतो. राग येत होता;- पण क्षणभर असे वाटले की, दिवस व रात्र, व जन्मापासून मृत्यूपर्यंत दररोज रतिबाप्रमाणे मिळणाऱ्या दुःखांचे विस्मरण करण्याचे एकच साधन धूम्रपान हे आहे. आणि त्याच्यावरही सरकारने कर बसवून दुःखातच भर टाकली होती. पीकपाण्याचे प्रश्न विचारले जात, उत्तरे मिळत होती. तलाठ्याची ठगेगिरी, मामलेदाराचा कावेबाजपणा, आमदाराची थापेबाजी, ह्यांचीही चर्चा अधूनमधून ऐकत होतो. अक्षरशः मी जनसंमर्दात आलो होतो. "पाण्यावाचूनि मीन तळमळतो कैसा, जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे." राज्यपालाच्या आयुष्यात माझा हा मीन काठावर टाकला गेल्याने तडफडत होता. तेथे माणसे भेटत होती, माणूस भेटत नव्हता. जे भेटत होते ते स्तुतिपाठक कामापुरते आलेले व बहुतेक मनातील विचार दाराबाहेर काढून ठेवूनच येत असत. कोणी अंतःकरणे उघडी करीत, अन्यायाचे चित्र काढीत, पण ते पुष्कळ वेळा अतिव्याप्ती अगर अव्याप्ती ह्या दोषांतून सुटणारे नसे. मोठ्या माणसाशी बोलत आहोत ह्या जाणिवेने सलगीचे वातावरण नसे. अनेक मित्रभाव व्यक्त करीत, पण मैत्री अध्याहृत असे.

येथे परिचय-पत्रिका न देताघेता परिचय होत होता. आपली बिरुदावली न सांगताना चर्चेत बहार येत होती. कृत्रिमता ह्या वातावरणात नव्हती, आणि कदाचित कोणी आणली असेल तर, ज्याने ती न खपणारी उलट खुपणारी वस्तू म्हणून, टाकून दिली असली पाहिजे. मुंडासेवाल्याने आणि हा प्राणी गेल्या १५ वर्षांपासून कमी कमी दिसू लागला आहे, 'विडी घेता का?'

म्हणून विचारले. मी साभार नाकारले. त्यांच्या चर्चेत युक्तियुक्तीने आपण कोण आहोत हे लक्षात न घेता भाग घेत होतो. तथापि, मनामधील त्याची जाणीव होती, हे सांगितले पाहिजे. या जनतावर्गातून प्रवास करण्याचा हेतू लोकांची हृद्गते कळावीत हाच होता, व तो साध्य होत होता. मनातील दुःखे सामान्य मनुष्य पूर्णपणे व्यक्त करू शकत नाही; आणि जेव्हा तो लिहितो तेव्हा त्यात कृत्रिमता येते. थोडी का होईना, पण येतेच. तसेच थोडे माझेही होत होते. त्या सामान्य विश्वातील भाषा बोलण्याचा माझा प्रयत्न होता, पण शेतकऱ्याच्या वस्त्रावर मातीचे कण आले तर तो ताबडतोब काढून टाकीत नाही. शहरी मनुष्य लागलीच ते काढून टाकण्याचा प्रयत्न करतो, व आपण नागर आहोत ह्याची जाणीव देतो. त्याची जाणीव त्याला असते, तसेच माझे होत होते. चर्चेत उच्चारलेले वेडेवाकडे शब्द सुधारून घेऊन मी चर्चेची तार सुराच्या दृष्टीने लयबद्ध करीत होतो. मनाच्या कोठल्या तरी भागात गतवैभवाची नसली, गतप्रतिष्ठेची नसली तर, स्वभावधर्म बनलेल्या संस्कृतीची आठवण होत होती. कृष्ण गोकुळात वागताना गाई वळी, गोपाळांच्या बरोबर नाचे, बागडे; पण आपुलकीची भावना व्यक्त करीत करीत आपले असे काही, आपले असे रंग त्या जीवनाच्या चित्रातून तो भरत असे; तसेच येथे होत होते. मला कोणी ओळखू नये, ही फार इच्छा. अतित आयुष्यात सर्वांनी व सर्वत्र ओळखावे, ही महत्त्वकांक्षा, न मागता मुलाखती घ्याव्यात, दुसऱ्यांनी लिहिलेले आपल्या नावावर छापावे, दुसऱ्यांच्या भाषणांतील चार मुद्दे घेऊन आपले भाषण चौरस करावे, हा सर्व अनुभव घेतला होता. प्रवासाला जाताना पाण्याचा तांब्या जितका आवश्यक, त्याहीपेक्षा फोटोग्राफर अधिक आवश्यक, असा तो जीवनाचा अध्याय समाप्त झाला होता. सूर्यापुढे अरुण धावतो, त्याप्रमाणे पुढेपुढे धावणारे व पुढेपुढे करणारे वृत्तपत्रकारही येथे नव्हते, आणि मनामध्ये विश्वास वाटत होता की, ही जनता-भेट सांगतापूर्ण होईल, व १०० मैलांचा प्रवास मोठ्या मजेत जाईल. आणि एखादे पुस्तक हातात घेऊन वाचण्याऐवजी लोक-जीवनाचा अनुभव-ग्रंथ वाचण्याची संधी मिळेल. तथापि, कोठे तरी मनात अशी भिती वाटत होती, की कोणी तरी मला ओळखील व रसभंग होईल. एक जुना पक्षकार—म्हणजे २५ वर्षांपूर्वी करीत असलेल्या वकिलीच्या धंद्यात

काही कामानिमित्त आलेला गृहस्थ टक लावून पाहात होता, आणि त्याने पुढे येऊन लवून नमस्कार केला. आता तो वृद्ध झाला होता, पण त्याची मान सरळ व ताठ होती. 'ह्या ठिकाणी तुम्ही कसे? आम्ही तर ऐकत होतो की तुम्ही दूर तिकडे पंजाबात आहात... !' आणि 'काकासाहेब' ह्या नावाने हाक मारली. आता खोटे सांगण्याची सवय नसल्याने खरे सांगणे भाग पडले.

खरे सांगण्याचा परिणाम असा झाला की, शुद्ध, निर्मळ, निरभिमानी वातावरण कृत्रिम झाले, संकुचित झाले; जरूर नसलेल्या आदराने ते संमिश्रित झाले. तथापि विषय निराळा काढून मालोजीबुवांना त्याच्या तंट्याच्या जमिनीबद्दल विचारले, व थोडी तीच चर्चा चालवत चालवत पुणे स्टेशन आले, व मी उतरलो. वंचित झालेल्या जनतेच्या सहवासात तीन तास काढले, ह्याच घटनेचा विचार करीत करीत घर गाठले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थलांत
अनुक्रम ...६.१.८.८५... विभाग ...ललितेतर...
अक्षांक ...१६२०... नोंद दि. ...

मी कर्नल कसा झालो : १३ :

'मनोरथ जर घोडे असतील तर प्रत्येक मनुष्य त्यावर स्वार होऊन सफलतेचे शिखर गाठील' अशी इंग्रजी म्हण आहे. आणि जन्माला आलेला प्रत्येक प्राणी काही ना काही तरी मनोरथ मनामध्ये आणीतच असतो. कुणी जग जिंकण्याचे, कुणी साहित्यक्षेत्रात श्रेष्ठ पद मिळविण्याचे, कुणी उद्योगधंद्यांत तर कुणी बँकेच्या क्षेत्रात साम्राज्य स्थापण्याचे, कुणी नेपोलियन होऊ इच्छितो कुणी कृषि-पंडित होऊ इच्छितो, कुणी महामहोपाध्याय होऊ इच्छितो, कुणी श्रेष्ठ नट होऊ इच्छितो, कुणी श्रेष्ठ नटी होऊ इच्छिते, कुणी आमदार-खासदार होऊन चमकदार ठरू इच्छितात, कुणी मंत्री होऊन सत्काराची बाशिंगे मनोरथांच्या गुडघ्याला बांधतात. तात्पर्य, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वागणारा, वावरणारा इसम-स्त्री अगर पुरुष काही ना काही मनोरथ आयुष्याच्या काही अवस्थेत बाळगत असतो. ते सफल होतात असे नाही. सामान्यपणे मॅट्रिकच्या परीक्षेत ज्याप्रमाणे अयशस्वी विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त, त्याचप्रमाणे आयुष्याच्या विश्वविद्यालयाचे निकाल अशाच स्वरूपाचे असतात. काही अर्धवट सफल होतात, पूर्णतया होणारा दशलक्षेषु एक असाच निघतो. काही महाभाग मनोरथांनीसुद्धा जे कल्पिले नाही त्या स्थानी जातात. गावठी म्हणीत सांगावयाचे म्हणजे गाढवाचे गोपाळदास होतात. जगामध्ये काही लोक मोठेपण घेऊनच जन्मतात. काही मोठेपणाच्या शिखरावर कष्टांच्या पायऱ्या चढून ते गाठतात. काही स्वतःला मोठेपणाच्या जागी नेऊन आदळतात. तसेच थोडे मनोरथांच्या बाबतीत पण आहे. इच्छा व प्राप्ती यांचे गणित सरळ त्रैराशिक नाही. प्राप्ती व पात्रता असा सुयोग व संगम न भांडणाऱ्या पति-पत्नींइतकाच कठीण असतो. तात्पर्य, असे सर्व काही जगामध्ये विविध घडत आहे, म्हणून त्यात

वैचित्र्य आहे, वैफल्य आहे, गुणांचे विडंबन आहे; आणि त्याचबरोबर प्रयत्न केल्याने प्राप्ती होते. 'केल्याने होत आहे,' हा अमर संदेश पण याच घटनांतून मिळत असतो. त्याचप्रमाणे निराश होऊन सोडून द्यावे व अशा अपेक्षा नसताना अकल्पित व अद्भुतपणे राजापुरी गंगेप्रमाणे साफल्य अगर अंशतः साफल्य डोळ्यापुढे उभे राहावे असेही घडते. आणि असे काही विचार त्या दिवशी आरशासमोर उभे असतांना माझ्या मनामध्ये आले.

आणि मी स्वतःकडेच पाहात होतो, आणि जवळजवळ अर्धशतकापूर्वी घडलेली घटना डोळ्यांपुढे उभी राहिली होती. १९१४ साली मी बडोदा कॉलेजमध्ये होतो, आणि माझ्या वर्गबंधूंत व भगिनींत विनोबाजी, शंकरराव देव, हंसा व जयश्री मेहता या होत्या. १९१५ साली ऑगस्टमध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. त्या वेळी अर्थात मी बडोदा कॉलेजमध्ये होतो, आणि ऑक्टोबर दहाला पहिली टर्म संपली, व मी निमच येथे वडिलांकडे गेलो. युद्धाच्या रम्य वार्ता कानांवर येत होत्या, आणि मनामध्ये पलटणीत जावे हे विचार गर्दी करीत होते. शालेय जीवनात पुण्यात असताना शनवारवाड्या-समोरील बाजारात घोड्यावर बसून पलटणीतले लोक येत, व त्यांना पाहून आपण घोड्यावर बसून पलटणीत जावे, अधिकारी व्हावे अशी महत्त्वाकांक्षा त्या वयात होती. या महत्त्वाकांक्षेत एक जोडीदार होता, व त्याचे-आमचे ठरलेही होते. पण तो नाटकात गेला. मी शाळेमध्ये 'लुट टु वॅलो' आणि 'वॅलो टु लुट' यांच्यातच गडबडत होतो. कैक वर्षे गेली. तारुण्याची निशाणी ओठावर विराजमान झाली, आणि आता तर मी "कॉलेजियन्" युवक झालो होतो. सुटीत विश्रांतीसाठी आलो होतो. न्यायमूर्ती रानडे यांनी विश्रांतीचा अर्थ दुसरे काम, दुसरे वाचन असा केला होता. माझ्या जीवन-शब्दकोशात विश्रांतीचा अर्थ नवा उपद्व्याप. आणि मग निमचला पोहोचताच वडिलांना न विचारता तेथील रिक्रूटभरती कचेरीत गेलो.

त्या वेळी तेथे एक लष्करी डॉक्टर पवार म्हणून होते. आणि त्यांनी मला उत्तेजन दिले, मी भरती करणाऱ्या अधिकाऱ्याच्या कचेरीत गेलो. अर्धवट मुलकी, अर्धवट लष्करी असा सलाम ठोकला. नेकटाय कॉलरच्या पोषाखात होतो हे सांगण्याचे कारणच नाही. ऑफिसरने उंची मोजली

मापात भरलो. छाती मोजली– अर्थात बाहेरून. ती जरुरीपेक्षा थोडी अधिकच भरली. आतल्या द्रव्याचे त्याने मोजमाप केले असते तर त्याला ती छाती सेनानीची आढळून आली असती. डोक्याकडे पाहिले, बाहेरून– आणि ते बरे केले. चित्तपावनी डोळे, रंग गोरा, या सर्व गुणांनी मी त्याला पसंत पडलो असा माझा ग्रह झाला. आणि मग त्याने विचारले, 'तुमची जात कोण?' आणि मी तत्कालीन मूल्याप्रमाणे ब्राह्मण म्हणून सांगितले. आगरकर त्या वेळपर्यंत अंगी मुरला नव्हता. आणि मग त्याने विचारले, 'कोणती उपजात?' आणि मीही तत्कालीन मूल्याप्रमाणे 'चित्तपावन' म्हणून सांगितले. त्याने मग तार देताना जसा पोस्ट मास्तर जंत्री काढून कोणते पोस्ट ऑफिस आहे ते पाहतो, त्याप्रमाणे त्याने पाहिले, आणि मला सांगितले की तुम्ही NMA आहात म्हणजे नॉन मार्शल आहात. मी सांगितले की, त्या जातीत अनेक पराक्रमी, रणशूर व सेनानी होऊन गेले!' त्याने सांगितले, 'खरेही असेल; पण मला नियमाबाहेर काहीही करता येत नाही!' आणि मी साहजिकच हिरमुसला होऊन परतणार तो ते म्हणाले, 'बाबू होतोस का? म्हणजे कारकून होतोस का?' मी त्याला 'नाही' सांगितले!

जीवनामध्ये तकलुपी व तात्पुरते काही घ्यावयाचे नाही ही वृत्ती तेव्हापासून होती. 'बनेंगे तो अमीर नही तो फकीर। मरेंगे तो पीर लेकिन सबूदूर मिल।' हा बाणा तेव्हापासूनचा आहे. आणि घरी आलो. वडिलांना अर्थात काही सांगितले नाही, पण पुढल्या रविवारी घरी भरणाऱ्या गप्पा क्लबला डॉ. पवार आले, आणि त्यांच्या व वडिलांच्या बोलण्यात ही हकीकत वडिलांना कळली व त्यांच्या वर्तनावरून एक मोठे संकट टळले असेच त्यांना वाटले. मला ते काही बोलले नाहीत. पण बाबू व्हायचे नाही याबद्दल त्याना बरे वाटले. १९१४ अखेर पहिल्या वर्षाची परीक्षा पास होऊन मी पुण्याला आलो. फर्ग्युसन कॉलेजमध्ये नाव दाखल केले. १९१५ ते १८ ही वर्षे भारतात इतिहास घडविणारी गेली. कुंभार जसे मडकी घडवीत असतो आणि मोडीत असतो त्याप्रमाणे इतिहासाचे काम चालूच होते. देशात दडपशाही जोरात होती. होमरूलची चळवळ तुफान होती. १९१७ च्या मार्चमध्ये इंग्लंड व दोस्त राष्ट्रे यांची स्थिती

केविलवाणी झाली; आणि मग एक राजकीय घोषणा झाली, की सुधारणा देण्याच्या दृष्टीने एक कमिशन नेमले गेले.

सहकारासाठी आवाहन केले गेले, आणि मग तरुणांनी सैनिक व्हावे, लष्करात जावे, असे निवेदन लो. टिळकांनी काढले. आणि मग १९१७ मार्चअखेर किर्लोस्कर थिएटरात मोठी सभा झाली. टिळकांनी 'बिनशर्त जावे' असे भाषण केले. त्याच दिवशी त्यांना पंजाबात प्रवेशबंदी झाली होती, तरीसुद्धा त्यांच्या दीर्घ दृष्टीने निश्चित केलेल्या धोरणाला व त्या अन्वये करावयाच्या वक्तृत्वाला काही बाध आला नव्हता. त्यात काही बदल त्यांनी केला नाही. शिवरामपंत यांनी त्याच सभेत वक्रोक्तीने टिळकांना पंजाबात त्याच दिवशी बंदी घातली आहे वे वृत्त श्रोत्यांना सुनावले. माझ्याबरोबरील बहुतेकांचा उत्साह थंड झाला, व इंग्रज सरकार हे दुतोंडी आहे वगैरे आरोप व आक्षेप ते करीत होते. मी मात्र पूर्वीचा उत्साह व पूर्वीची खटपट लक्षात घेऊन वानवडीला जाहिरात येताच रिक्रूटिंग ऑफिसमध्ये हजर झालो. सर्व प्राथमिक चौकशी झाली. प्रवेशाला जात आता आडवी येत नाही याची खात्री झाली. कदाचित चष्मा लागला होता तो आड येणार नाही अशी खात्री होती. सुमारे दहा दिवसांनी आम्हांला वैद्यकीय तपासणीसाठी बालावले. अष्टांग तपासणी झाली, आणि पास झालो; असे तोंडी सांगण्यात आले. आणि जूनअखेर बोलावण्यात आले. हजर झालो. तथापि जवळ जवळ सप्टेंबर उगवला व मराठा पलटणीत दाखल झालो.

तीन-चार आठवडे प्राथमिक कवायतीचे शिक्षण झाले, आणि मग I. D. F. (भारतसंरक्षण दल) ही संघटना सरकारने निर्माण केली. त्या वेळी मराठी पलटणीची एक ब्राह्मण कंपनी होती. त्यात सोहोनी व बंबावाले जे पुढे मोठे पोलिस अधिकारी झाले ते होते. त्यांनी त्या कंपनीत या असे सुचविले. पण मी गेलो नाही, आणि नोव्हेंबर १९१७ मध्ये I. D. F. ची मुंबई विद्यापीठाची एक पलटण तयार करण्याचे ठरले, व तिकडे जाण्याचे मी मान्य केले. निम्मा नोव्हेंबर, पुरा डिसेंबर, आणि १९१८ च्या जानेवारीचे तीन आठवडे तेथे शिक्षण झाले. आम्ही तंबूत होतो. गोळीबाराचेही शिक्षण पुण्यातील गुलटेकडीजवळील गोळीबार मैदानात झाले. त्या तीन महिन्यांच्या

शिक्षणात एक बढती मिळाली; पण त्या प्रत्येक बढतीच्या मागे विद्यार्थी म्हणजे स्टूडंट–सिपॉय, स्टूडंट–नाईक, स्टूडंट–जमादार अशी संज्ञा असे. जानेवारीअखेर कॅम्प संपला. कॉलेजमध्ये हजर न राहता पण फी भरल्यानंतर टर्मस् मिळाल्या होत्या. आणि मार्चमध्ये परीक्षा होती. बी. ए. च्या परीक्षेला बसलो. दुसऱ्या वर्गात पास झालो, आणि पुन्हा पलटणीच्या अधिकाऱ्यांकडे लिहिले.

तो १९१८ जुलैचा महिना होता. दोस्तांचे पारडे जड होऊ लागले होते. आणि साहजिकच ब्रिटिश राजनीतीत फरक झाला. मला कळविले की, बन्नूला जावे लागेल. मी ताबडतोब मान्य केले; तथापि निमंत्रण आले नाही. मध्यंतरी काही लष्करी कमिशने हिंदी तरुणांना द्यावयाची, व त्यात जे I. D F. मध्ये असतील त्यांना अग्रहक्क राहील असेही जाहीर झाले होते. आणि त्याप्रमाणे मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर कुप्रसिद्ध लॉर्ड विलिंग्डन यांनी १०-१२ जणांना मुलाखतीसाठी बोलाविले आणि त्यांत मीही एक होतो. मला वाटते, I. D. F. पैकी मीच एक होतो. बाकी अन्य होते. थोडी चकमक त्या मुलाखतीत झाली. परिणामतः तिघांची नावे वर गेली. त्यात मी होतो. पण अखेर निवड एका महाराजांच्या चिरंजीवांची झाली. पुढे ते ६ महिन्यांच्या आतच निवृत्त झाले. आणि त्या अन्यायाचा राग दीर्घकालपर्यंत मनाच्या चावडीत धुमसत होता.

पुढे काही दिवसांनी म्हणजे १९१८ च्या नोव्हेंबरमध्ये युद्धतहकुबी झाली, आणि पुन्हा पत्र आले की, 'लष्करात राहू इच्छिता का?' मोडलेले लग्न पुन्हा जमणार असे वाटू लागले. पण नंतर काही दिवसांनी विचारणा झाली की, 'मुंबईच्या प्रान्तिक पोलिसात भरती होण्याची इच्छा आहे का?' अर्थात 'नाही' म्हणून उत्तर दिले. त्या वेळी LL. B. च्या दुसऱ्या परीक्षेचा अभ्यास करीत होतो. आणि उत्तरात लिहिले की, I am prepared to exchange my brief for an afficer's bonnet and for nothing else.' त्याचा अर्थ असा की, लष्करातच अधिकाऱ्याची जागा मिळत असेल तर मी वकिलीचा अभ्यास सोडण्यास तयार आहे, अन्यथा नाही. आणि हा जीवननाटकातील प्रहसनवजा प्रसंग तेथेच संपला. माझ्याबरोबर

असलेल्या मुरारजीभाईंना प्रान्ताच्या मुलकी नोकरीत घेण्यात आले. मजवर देशबांधवांविरुद्ध कारवाई करण्याचा प्रसंग याप्रमाणे टळला.

लष्करीपदाची हाव मात्र स्त्रीच्या दागिन्याइतकी सुरुवातीपासून तीव्र होती; ती मग २० साली गांधींच्या चळवळीत पडल्यावर परिवर्तित झाली. सारे नाटक बदलावे, प्रेक्षक बदलावेत, नाट्यगृह बदलावे असे झाले. आणि सैन्यात जाऊन पराक्रम इच्छिणारा असहकारितेच्या सैन्यात एक मामुली शिपाई झाला, आणि कालान्तराने कोरसपर्यंत चढत गेला. याचा इतिहास 'पथिक'मध्ये आहे. १९२० नंतर लष्करी महत्त्वाकांक्षा नामशेष झाली. तथापि कधी काळी तारुण्यात प्रेम केलेली पण न प्राप्त झालेली प्रेयसी पुढील आयुष्यात प्रसंगी आठवावी, तशी ही महत्त्वाकांक्षा जीवनाच्या अदृश्यतेच्या आड्न प्रसंगी डोकावत असे, इतकेच. तिने मनावर मग परिणाम केला नाही. विचारांना वेठीस धरले नाही. प्रयत्नांच्या वारूवर तिने आसन ठोकले नाही. मध्यवर्ती कायदेमंडळात असताना लष्करी प्रश्नांवर काँग्रेस पक्षातर्फे जे १-२ बोलत त्यांत माझी गणना असे, आणि त्याचमुळे की काय, मुलाखत-मंडळावर (Interview Board) कायदेमंडळाच्या तर्फे प्रतिनिधी नेमला गेलो होतो. तेथला अनुभव चांगला होता.

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. आणि काँग्रेसच्या नेतृत्वाने जर तडजोड करून अधिकार स्वीकारला असता तर त्या चौपटात माझ्या भाग्याची सेंगटी कुठल्या तरी अधिकाराच्या कटीवर बसली असती. क्षणभर त्या वेळी असेही आले की, आपण निवेदन काढून सैन्यभरतीसाठी तयार व्हावे पण विवेकाने मनाचा हात मागे ओढला. साऱ्या देशाची विचारसरणी ज्या दिशेने मार्गक्रमण करीत होती, काँग्रेसचे नेतृत्व ज्या दिशेने परिस्थिती उभे करीत असलेले दान देत होते, त्याला विसंगत करणे हे अयोग्य होते. आणि ते केले नाही. कदाचित मी अधिकारी नेमला गेलो असतो. त्या वेळी माझे वय चाळिशी उलटून गेले होते. मान आणि अभिमान दोन्ही ताठ होते. आणि आत्मविश्वास तर भलताच दांडगा होता. कारण त्याचा पिंड पुणेरी वातावरणात व शनिवार पेठेत पोसला गेला होता. एक प्रकारे न गेलो हे बरे झाले. नाही तर माझ्या लष्करी ज्ञानाने जगाचा इतिहास बदलला गेला असता ! काय झाले असते हे सांगणे कठीण. तथापि काही

तरी झाले असते हे तितकेच निश्चित. पण इतिहासाला ते पसंत नव्हते. माझ्या पराक्रमाचे रामायण-वर्णन करण्याला कुणी वाल्मीकी नव्हता हीच खरी अडचण इतिहासाला वाटली असेल. काही का होईना, रणांगणा-ऐवजी येरवड्याच्या कारागृहवासात मी स्वतःला पाहिले. सैन्याच्या हालचाली नियंत्रित करण्याऐवजी तेथील राजकीय कैद्यांच्या सुखसोईंच्या हालचाली नियंत्रित करीत होतो, आणि तेथेही नोव्हेंबर १९४२ मध्ये रणसंग्रामाचा प्रसंग आला.

राजकीय कैदी व पोलिस यांच्यात मारामारी झाली,—ती शान्त करीत असताना लाठीमाराने डोके फुटले. गोळीबारच व्हावयाचा, पण गोळ्यांचे दुर्भाग्य की त्यांना संधी मिळाली नाही. आणि त्याचे कारण त्या झगड्यात मी माझे डोके धोरणी सेनानीला शोभेल असे शान्त ठेवले व सैन्याऐवजी सहकाऱ्यांना, सहबंद्यांना, हुकमाऐवजी विनंती करून आपापल्या तंबूत जाण्यास सांगितले. एका अर्थाने चातुर्ययुक्त रणनीती दाखविली ! चढाईऐवजी माघार घेण्यात अंतिम जय असतो,—मात्र योग्य वेळी माघार घेण्यात तो असतो. हा इतिहासाचा सिद्धान्त खरा करून दाखविला. तुरुंगात असताना चाललेल्या महायुद्धाचा वृत्तान्त सूक्ष्मदृष्टीने वाचीत होतो, जवळच्या नकाशातून सैन्याच्या हालचालींचा अर्थ समजावून घेत होतो. भाई चितळ्यांचा 'रशिया विजयी होणार' या ठाम सिद्धान्ताला थोडे अविश्वासाचे मीठ लावून स्वीकारीत होतो. हेर तेंडुलकर जे जर्मनीत अनेक वर्षे होते, व ज्यांनी गांधींच्या सान्निध्यात व शिष्यगिरीत काही काळ काढला होता त्यांचे जर्मन माघारीचे विश्लेषण शान्त चित्ताने ऐकत होतो. जेथे आपल्याला कळत नाही तेथे हटकून जावयाचे ही पुणेरी वृत्ती कायमची साथी असल्याने होणाऱ्या चर्चेत भाग घेत असे. पण सावधानता भाषणात व आचरणात स्वाभाविक असल्याने मी म्हणतच होतो त्याप्रमाणे झाले, असा परिस्थितीचा अर्थ मी जेव्हा करी त्या वेळी लोकांच्या म्हणजे सहबंद्यांच्या कौतुकाचा विषय ठरे ! थोडक्यात सांगावयाचे म्हणजे रणांगणावर न जाता, बंदुकीचा ट्रिगर न ओढता हा सेनानी येरवड्याच्या नंतर साबरमतीच्या, नंतर नाशिकच्या, नंतर पुन्हा साबरमतीच्या १२-८ फुटांच्या क्षेत्राच्या रणांगणावर सेनापतिपद गाजवीत होता. तथापि जगापेक्षा अधिक अवाढव्य असलेल्या १८ अक्षौहिणीपेक्षाही

अधिक सेना सहज राहू शकेल अशा मनाच्या कुरुक्षेत्रात समरभूमीत जगाच्या तुंबळ युद्धाबाबत विचाररूपी सैनिकांची हालचाल करीत होतो.

अनेक अंदाज फसले हे प्रामाणिक मन येथे सांगू इच्छिते; आणि जगात कोणत्या यशस्वी सेनानीचे अंदाज थोडे तरी फसले नाहीत? कोणत्या मुत्सद्द्याच्या अंगावर थोडी तरी बाजू आली नाही? लोकशाहीमध्ये प्रमुख स्थानी असलेला कोणता पुढारी निवडणुकीत पडला नाही? लग्न ठरण्यापूर्वी कोणत्या मुलीला एकाने तरी नाकारले नाही? तात्पर्य, शरीरावर सेनापतीचा पोषाख नसतानासुद्धा, जवळपास जनरल स्टाफ नसताना, सेनानीचे काम त्या इवल्याशा जागेत मी करीत होतो. पत ही प्रमाणावर अवलंबून नसते. साखरेच्या कणात गोडी असते, तितकी गोणीमध्ये, कस्तुरीच्या रजात जसा सुगंध असतो तसाच कस्तुरीच्या गोळ्यात. आणि मी त्या खोलीत रात्री ९ वाजल्यानंतर नेपोलियनप्रमाणे कमरेवर हात ठेवून फेऱ्या घाली. आणि सैबेरियातील रणक्षेत्रापासून बोर्निओच्या जंगल-झाडीतील चकमकीपर्यंत, जमिनीवरील हाणामारीपासून आकाशातील विमानांच्या लढाईपर्यंत, सिंगापूर-पासून पर्लहार्बरपर्यंत झालेल्या नाविक चकमकींबाबत विचार करीत असे. आणि त्या वेळी असे वाटत असे, जर चर्चिलने मी म्हणतो त्याप्रमाणे केले असते, जर मॉंटगॉमेरीने मी म्हणतो त्याप्रमाणे युरोपची योजना आखली असती, जर आयसेनहॉवरने माझ्या योजनेप्रमाणे अमेरिकन सैन्याची आखणी केली असती तर,– तर एक ईश्वरच जाणे,– काय झाले असते! कधी कधी मन बाजू बदलून हिटलरने काय करावे याचाही विचार करी. पण हिटलरला माझे विचार कळले नाहीत; किंबहुना माझ्या मनाशिवाय कुणालाच कळले नाहीत. या विचारकुसुमांची अवस्था 'मूर्धनि सर्वलोकस्य विशीर्येत वनेऽथवा।' फूल एक तर देवाच्या डोक्यावर बसते किंवा वनात सुकून जाते. मनस्वी म्हणजे जे श्रेष्ठ लोक आहेत ते लोकाग्रणी तरी होतात नाही तर वनामध्ये पडून राहतात. त्याचप्रमाणे माझ्या विचारांची दुसरी गत झाली. म्हणजे मनाच्या वनात पडून राहिले. माझे नुकसान झाले नाही, नुकसान जगाचे झाले, आणि आजच्या या प्रसंगाने या गोष्टीची दखल जगाला देत आहे. पण कुणी येणार नाही हेही तितकेच खरे आहे. बहुसंख्याक अज्ञान आहेत, व जे ज्ञानवान आहेत ते मत्सरी आहेत. आणि या जगात तर राहिलेच

पाहिजे. तात्पर्य दुसऱ्या महायुद्धात काँग्रेस–नेतृत्वाने स्वातंत्र्याबाबत तडजोड केली नाही. आणि गांधींच्या अहिंसावादाला काँग्रेसचे नेते सोडणार नाहीत ही चर्चिलची खात्री होती; म्हणून त्याने ती केली नाही हे सत्य आहे.

सत्ता सोडावयाची हे निश्चित, व युद्धात सहकार्य हे संशयित, हा सौदा मुरलेला मुत्सद्दी चर्चिल करण्यास तयार नव्हता. आणि आता असे वाटते की, जर तसे काही झाले असते तर आज जी स्थिती अतिपूर्व आशियात दिसत आहे तसेच भारतात झाले असते; आणि जे स्वातंत्र्य आज दिसत आहे जी लोकशाही आज दिसत आहे त्याऐवजी अराजक व गुंडशाही नजरेस आली असती असेही म्हणणारे लोक आहेत. आणि त्याही त्यांच्या म्हणण्यात काही अर्थ आहे असे म्हणावे लागेल. महायुद्ध संपले. १९४७च्या १५ ऑगस्टला सत्तान्तर झाले. केंद्रीय मंत्री मी झाले. आता पोलिस पकडायला न येता दिमतीला येत होते. मानवंदना देत होते. सेनानी न होताच लष्करची सलामी घेत होतो. तथापि स्वतःच्या मुलाचा विवाह करताना जो आनंद असतो तो दत्तक मुलाच्या वेळी वाटत नाही, तसेच थोडे वाटत होते.

सेनेतील अधिकारी व्हावे ही महत्त्वाकांक्षा बुजली होती. किंबहुना कुठे तरी तिची ठिणगी राहावी एवढीच राहिली होती. मंत्रिपदाची साडेसाती संपली. संसदीय कारकीर्दीचे सत्र संपले. राज्यपालपदाची हद्दपारी संपली, आणि न चालणारा रुपया परत मालकाकडे यावा त्याप्रमाणे बी. ए. झाल्यावर १९१८ साली जसा शिक्षक झालो त्याप्रमाणे सत्तरीची छाया पडताच शिक्षण-क्षेत्रात आलो, आणि विद्यापीठाचा कुलगुरू झालो! या क्षेत्रात पुन्हा युवकांशी संबंध आला, आणि राष्ट्रीय छात्रसेनेच्या योजनेमुळे पुन्हा जुनी, जीर्ण पण जीव धरून असलेली अमृत इच्छा किंचित अंकुरित होऊ लागली. तसे म्हटले तर मंत्रिमंडळात असताना अनेक अन्य मंत्र्यांची मधून मधून कामे पाहात असे, प्रश्नांची उत्तरे देत असे. विधेयके चालवीत असे. संरक्षण खात्याचे मंत्री सरदार बलदेवसिंग हे विशेष दोस्त होते, आणि त्यांचे शरीर जेव्हा दिल्लीस असे तेव्हा त्यांचे मन पंजाबच्या राजकारणात सिमल्याच्या घाटीत गुंतलेले असे. आणि पुष्कळ वेळा शरीर मनाकडे धावे, आणि मग त्यांच्या अनुपस्थितीत पाच वर्षांच्या कारकीर्दीत त्यांच्या खात्याची चार-पाच तरी विधेयके मी संसदेपुढे चालविली आहेत. पण ग्रंथांचा संग्रह करणे,

अगर त्यांची देखरेख अगर नियंत्रण करणे हे निराळे, व स्वतः ग्रंथ लिहिणे हे निराळे. इतरांची डोहाळजेवणे केली म्हणून स्वतःच्या डोहाळजेवणाचा अनुभव त्यातून उत्पन्न होत नाही. सेनापतीच्या पोषाखातील अभिमान, अस्मिता व गौरव संरक्षणमंत्र्यांच्या प्रतिष्ठेत नाही, आणि म्हणून मनाला क्षणभर ती विधेयके चालविताना त्याबाबत सेनाधिकाऱ्यांशी चर्चा करताना बरे वाटले, पण ते मनालाच मनापासून बरे वाटले नाही. आणि त्यामुळे जी अमृत इच्छा होती तिची समजूत दुधाची तहान ताकाने भागत नाही, त्याप्रमाणेच घडून येत होते.

आता विद्यापीठाचा कुलगुरू झाल्याने एन्. सी. सी. च्या चित्रपटात एक भूमिका प्राप्त झाली होती. कुलगुरू या नावाने गेल्या वर्षात एक-दोन कँपांना भेट दिली होती, आणि मग केव्हा तरी जानेवारी महिन्यात मला हिंदी सैन्यात मानद (ऑनररी) कर्नल नेमल्याचे सरकारी गॅझेटमध्ये जाहीर झाले, व मला तसे कळविण्यात आले. आणि त्यानंतर लागलीच छात्रसेनेचे अधिकारी येऊन युनिफॉर्मबाबत व्यवस्था केली आहे, असे सांगितले. लष्करी शिस्त व कार्यक्षमतेप्रमाणे शिंपी आला. त्याने मोजमाप घेतले, आणि सात-आठ दिवसांच्या आत गणवेषाला शिरस्त्राण आले; आणि मग किल्ले पुरंदर येथे सैनिकी शिक्षणकेन्द्राला भेट देण्याचे आमंत्रण आले. मी तेथे आणि त्या गणवेषात जाऊन आलो. तथापि तेथे कर्नलीपेक्षा कुलगुरुबाजीच केली. म्हणजे व्याख्यान ठोकले. पण आज मी आरशासमोर उभा होतो तो छात्रसैनिकांची सलामी घ्यावयाची होती, त्यांचे " निरीक्षण " करावयाचे होते, व त्यासाठी सज्ज होत होतो.

पुरंदरला गेलो त्या वेळेला नीटनेटका पोषाखसुद्धा नीट घातला नाही तर तरतरीत मनुष्य बावळट कसा दिसतो याचे ते प्रात्यक्षिक ठरले. गुंड्या चुकलेल्या होत्या. कमरपट्टा कमरेलाच होता. पण सैल होता. टोपी डोक्यालाच घातली होती, पण तिचा कोन भलताच आकाशगामी झाला होता. हातातील काठी उलटी धरली होती. कदाचित गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने ते झाले असावे. आज मात्र मी बिनचूक पोषाख करावयाचे ठरवले होते. आपलेच लेखन पुन्हा पुन्हा तपासून पाहावे त्याप्रमाणे पाहात होतो, आणि धांदलीत असे आढळून आले की, एका पायात एक रंगाचा मोजा, दुसऱ्या पायात

दुसराच, आणि मग पुन्हा बूट काढले, पुन्हा रंगसंगती साधली, आणि बरोबर आहे किंवा नाही, म्हातारीला विचारले. तिने लेकीला विचारा म्हणून टिंगल केली, आणि मग क्षणभर तेथेच समरभूमी निर्माण झाली; आणि मग मीच रसिकतेने तो प्रसंग निभावून नेला. सर्व गणवेष आता नीटपणे चढवला होता, आणि सवयीप्रमाणे टेबलावरील गांधी टोपी डोक्यावर चढविली. तिचा रंगच धोका देणारा होता. एरवी मी आरशात पाहिले तो निदान मार्शल टिटोसारखा दिसत होतो. आणि आता निघणार तोच मुलीने सांगितले की, 'काका, भलतीच टोपी घातली!' आणि मग भलताच प्रश्न सोडवल्यानंतर विद्यार्थ्यांची जी स्थिती होते तशी झाली. आता जायची वेळ ५ मिनिटे होऊन गेली होती. १०-४५ ला पोचावयाचे होते. मग पुन्हा वर आलो. मग गणवेषाची टोपी काढली, आणि पाच मिनिटे ती डोक्यावर 'फिट्ट' बसली की नाही हे आरशात निरीक्षण करीत राहिलो. क्षणभर शालूचा पदर नीट करण्यात मुहूर्त टळण्याची भीती उत्पन्न व्हावी तसे झाले. मग अधिक विचार न करता डोक्यावर टोपी ठेवली, सहज ठेवली आणि त्यातूनच साहजिकता व सौंदर्य निर्माण झाले, आणि घरातून कर्नलच्या गणवेषात बाहेर पडलो. विद्यापीठाच्या आवारात ८००० छात्रसैनिकांच्याकडून वंदना घेतली, 'पाहणी' केली. मूळ स्वभावाप्रमाणे 'उपदेश' ठोकला, आणि मग घरी आलो, व साठ वर्षांपासून मनात बाळगलेली एक महत्त्वाकांक्षा पुरी झाली. निदान पुरी झाल्याचे मी समजलो! वाघाची शिकार नसली तरी वाघूची शिकार झाली, असा हा मी कर्नल झाल्याचा इतिहास आहे!!

हेचि ज्ञान देगा देवा : १४ :

लहानपणी गणपति-उत्सवात अगर जेव्हा केव्हा आरती गाण्याचा प्रसंग येई त्या वेळी, तसेच कीर्तनाच्या अंती हरिदास आरती म्हणत त्या त्या वेळी 'हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा!' हे शब्द नित्य परिचित होते. आणि लहानपणी जे पाठ केले असेल, जे ऐकले असेल, जे पाहिले असेल, थोडक्यात म्हणजे जे अनुभवाच्या बाराखडीत मनाने टिपले असेल ते सामान्यपणे शेष जीवनापर्यंत माणसाच्या स्मृति-संग्रहात राहते. इतकेच नव्हे, तर ही स्मृती-संपत्ती हे आठवणींचे भांडवल यांच्या जोरावर मनुष्य आपल्या जीवनातील आचार-विचारांचा व्यापार करीत असतो. पुढील आयुष्यातील गोष्टींचे जनकत्व या बालवयातील घटनांकडे असते, आणि हाच थोडासा अनुभव 'हेचि दान देगा' या काव्यपंक्तीने मला आणून दिलेला आहे. या काव्यपंक्तीत कोणते भाव आहेत, त्यात किती विवेक आहे, त्यात किती श्रेष्ठ साहित्य आहे, आणि किती अनुभवाची मौक्तिके भरली आहेत याची गणना करणे सोपे नाही. कीर्तनातून, पुराणातून आपण ऐकतो,– आणि त्या सर्वांचा शेवट आपण या काव्यपंक्तीच्या द्वारा सूचित करीत असतो. परमेश्वराला आळवताना आपण तल्लीन असतो. क्षणभर आत्मविस्मृती होते, आणि असे काही क्षण मनुष्य अनुभवतो, की ते अधिकाधिक मिळावे असे त्याला ते क्षण संपताच वाटू लागते. क्षणाचे युग व्हावे, काळाच्या व्याकरणात तो रीतिवर्तमान प्रयोग ठरावा, व अनुभवाच्या वाक्यात शुद्ध लेखनात तेथे स्वल्पविरामसुद्धा असू नये असे त्याला वाटते. आणि म्हणून त्या उल्हासाचे प्रतिबिंब त्या उत्सुकतेचा उत्कर्ष क्षम्य अधाशीपणाने याच काव्यपंक्तीने मनुष्य अभिव्यक्त करीत असतो. जे पाहिले, जे अनुभविले, जे मनाल चिकटले, हृदयात जडले त्याचा विसर न व्हावा हीच इच्छा, हेच मागणे

आपण परमेश्वराकडे मागत असतो. संत परमेश्वराकडे अशीच मागणी करीत असतात.

'खलांची व्यंकटी सांडो' असे ज्ञानेश्वर म्हणतात. तथापि त्या सर्व परतापदानाच्या मुळात तेच तेच अनुभवावे; तेच तेच पाहात राहावे हाच भाव असतो. संजय वास्तविक धृतराष्ट्राला गीता सांगत असतो, पण ते सांगत असताना भगवान कृष्ण व पार्थ या दोहोंच्या मनात उद्‌भवलेले भाव आपल्या मनात अनुभवीत असतो. वस्त्रे रंगविताना रंगाऱ्याचे मन रंगत असते. त्याचे हात रंगत असतात, व त्याने ती रंगविलेली चुनरिया कोणा सुंदरीचे शरीर स्पर्शसुख अनुभवणार आहे– या विचाराने त्या रंगाऱ्याचे मनही रंगते, व मग त्या रंगात दिलका रंग पडून एक निर्मळ, एक श्रेष्ठ अनुभव त्याला येत असतो; व मग रंग देऊन पुरा झाला तरी पुनः पुन्हा आपला रंगाने भरलेला हात त्या वस्त्रावर हळुवारपणे तो फिरवीत असतो. हेंचि दान देगा देवा असे मनात म्हणत म्हणत तो काम करीत असतो. अनंत अनुभव जीवनात माणसाला येत असतात, व अगदी वाईट अनुभवसुद्धा, संकटस्वरूपी अनुभव-माणसाला आले असतानासुद्धा त्या वेळेला त्याला वाईट वाटत असले तरी त्यातून पुढे गेल्यानंतर पुनः पुन्हा तो सारा अनुभव मनुष्य आपल्या मनो-मंदिरात आठवून आठवून, घोळून घोळून त्याचा प्रपंच करीत असतो. सांगण्याचे तात्पर्य असे की, जे क्षण लौकिक दृष्ट्या कसेही असले तरी त्याचे आध्यात्मिक महत्त्व जेव्हा जेव्हा मानवी मनाला पटत असते तेव्हा तेव्हा त्याचा विसर न व्हावा असेच म्हणण्याकडे मनुष्याची प्रवृत्ती असते.

आयुष्यात आलेले अनुभव पृथक पृथक असले तरी त्यांतून काही तरी एक सामान्य आहे असे प्रत्येक मनुष्याला वाटत असते. मन हे ताक घुसळण्याच्या रवीसारखे आहे. भोवतालच्या परिस्थितीतून येणाऱ्या अनुभवाला ते टिपत असते, गोळा करीत असते. मधुमक्षिकेप्रमाणे त्यांचा संचय करीत असते. या श्रेष्ठ वृत्तीबरोबर जे काही मनाच्या पदरात पडले असेल, जे काही मनाच्या भांड्यात पडले असेल ते घुसळून घुसळून त्याचे मंथन करण्याकडे मनाची दुसरी प्रवृत्ती असते. संग्रह, संघर्ष व समाधान या अवस्थेतून मन वावरत असते. संग्रहाइतकेच महत्त्व संघर्षाला आहे व समाधानाचे महत्त्व तर कोणीच अमान्य करणार नाही. सामान्य माणसालासुद्धा जे मिळेल ते घेतले या

अवस्थेपेक्षा निरीक्षून घेतले, न्याहाळून घेतले, वाजवून घेतले असे म्हणण्यात त्याला अभिमान वाटतो, व ती एक त्याच्या चातुर्याची विवक्षीपणाची अभिव्यक्ती तो समजतो. येईल ते संग्रह करणे व त्यातच समाधान मानणे म्हणजे आईबापांनी ठरविलेली मुलगी स्वीकारणे असे आहे. त्यात नेहमीच व्यक्तीची दुर्बलता दिसून येते असे नाही. अनिवार्य झाले म्हणून ते केले असेही नाही. पदरी पडले म्हणून पवित्र झाले असेही नाही. पण इतके ते समाधानकारक व संवेदक मानले गेले, की संघर्षातील अहंभाव विचार-मंथनातील आत्मप्रौढी ही त्यापुढे फिक्की ठरतात. तथापि मन हे स्वस्थ बसत नाही. मनुष्याच्या बंध व मोक्षाचे ते कारण असते. येवढेच नव्हे तर आपल्या प्रभावाने ते व्यक्तीला व्यक्तित्व देत असते. जेथे प्रवेश नाही असा मुक्काम मनापुढे असत नाही असे शिखर नाही, की जे ते गरुड भरारीने पोहोचू शकत नाही. पाताळातून आकाशाच्या अंतापर्यंत त्याची यात्रा लीलेने ते करते. पण खरा आनंद त्याला पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टीवर मनाला स्पर्श करून गेलेल्या घटनेवर विचार करण्यात वाटतो. या मंथनात त्याला प्रसंगी राग येतो. प्रसंगी चिडतो. पण त्यातूनच काही मार्ग तो काढीत असतो, आणि ते त्याचे कर्तृत्व त्याला अद्वितीय वाटते; आणि म्हणूनच या संघर्षाची संमिश्रित झालेल्या आठवणींना विस्मृतीच्या दालनात ढाकण्यास ते तयास नसते. शाळेच्या पहिल्या दिवसापासून निवृत्ती जीवनातील पहिल्या दिवसापर्यंत प्रथम मीलनापासून अंतापर्यंत आलेला अनुभव तो मोठ्या काळजीने संभाळून ठेवीत असतो, आणि कधी काळी आपल्या स्मृतीच्या वहीखात्यात काय शिल्लक आह हे जेव्हा तो पाहतो त्यावेळी त्याला होणारा आनंद अनुपमेय असतो. नाकारलेल्या प्रेयसीच्या आठवणी एखादे रत्न संभाळून ठेवावे त्याप्रमाणे ठेवीत असतो. वर सांगितल्याप्रमाणे आलेल्या अनुभवातून काही सामान्य असे काढण्याचा प्रयत्न करीत असतो. विचार-मंथनातून काही त्याच्याच मनाला सुखविणारी सुभाषिते तो काढीत असतो. त्या सुभाषितांना त्याच्या अनुभवाचा सुवास येत असतो, आणि त्याच्याच योगाने प्रभावित होऊन जीवनात पुढील प्रवास करीत असतो. अनुभव-मौक्तिकांना एका सूत्रात आणणारी मनाची क्रिया म्हणजे ज्ञान होय आणि ज्ञानाची सारी मदार, सारी इमारत स्मृतीवर असते. आठवणींशी तिचा संबंध

असतो. मनुष्यप्राणी हा अन्य जीवमान सृष्टीपासून निराळा आहे; कारण मनुष्याजवळ प्रज्ञा आणि मेधा आहे. मेधा म्हणजे स्मृती हे ज्ञानाचा कच्चा माल असे म्हटले तरी चालेल. एक वेळ ग्रंथ हरवला तर जितके वाईट त्यापेक्षा त्यात काय सांगितले आहे हे विसरले तर अधिक वाईट वाटेल. चांगल्या अनुभवाची विस्मृती होणे म्हणजे प्रेयसीने सोडून जाण्या-इतके दुःखदायक मनुष्याला वाटते; व म्हणून आधुनिक काळात ज्ञानोपासना करताना मेधा देवतेचे साहाय्य अनिवार्य ठरते. आणि असे म्हणावेसे वाटते की– ' हेचि ज्ञान देगा देवा तुझा विसर न व्हावा '.

ज्ञान म्हणजे कार्यकारणभाव जाणण्याची क्रिया. मनुष्या-मनुष्यांत, व वस्तू-वस्तूंत जे संबंध असतात ते ज्या क्रिया, वाचे, मन समजून घेते ती क्रिया म्हणजे ज्ञान आणि म्हणून मनुष्य ज्ञानाला श्रेष्ठ समजतो. इतके की त्याच्यापुढे ज्ञान एका बाजूला व जगातील प्रलोभने– पेयविषयक अगर प्रेमविषयक कशीही असली तरी तो ज्ञानाची पसंती करतो. अन्य प्रलोभने क्षणिक व त्यांतील उपयुक्तता जसा त्याचा उपभोग वाढत जातो तशी ती कमी होत जातात. ती सुखारंभी असतात व दुःखान्तच ठरतात. ज्ञान हीच एक अशी गोष्ट आहे की उपक्रम उपसंहारापर्यंत सुखच देत असतात. इतकेच काय, दुःखविषयक ज्ञानातूनही सुखाचीच उत्पत्ती होत असते. वेदान्ती ज्ञान, कर्म का भक्ती याबाबत वादविवाद घालतात; आणि मनाला कर्मविन्मुख करतात, व बुद्धीला त्यामुळे संशयाचा क्षयरोग जडतो. ज्ञान श्रेष्ठ, कर्म श्रेष्ठ का भक्ती श्रेष्ठ,– हे वाद एक प्रकारची मनाला विचार करण्याची चैनबाजीची खोड लागली म्हणजे उद्भवतात. ही तिन्ही ऐन स्वरूपात एकच आहेत. कमळ एक व त्यात अनेक पाकळ्या असतात, त्या-माणे या तिन्हींचा संबंध वर्णन करता येण्यासारखा आहे. भक्तीच्या योगे जे अंतिम ज्ञेय आहे त्याचाच साक्षात्कार करून घेण्याचा हा सोपा मार्ग आहे. कर्ममार्ग म्हणजे पावले टाकीत टाकीत मुक्काम गाठावयाचा, जो मुक्काम भक्तिमार्गी खटाटोपाशिवाय गाठतात तोच. ज्ञानमार्ग म्हणजे प्रत्येक पावलागणिक का व कसे हे समजून घेऊन संशय घेत घेत पण संशयातीत होत होत तेच पद प्राप्त करावयाचे, की जे वरील दोन्ही मार्गाने प्राप्त केले जाते. गीतारहस्यकार यांनी या तिन्ही मार्गांचा समन्वय करून ज्ञानयुक्त भक्तिप्रधान कर्मयोग हे

नवीन मानसिक समाधानासाठी वैचारिक रसायन बनवले. तथापि ज्ञानाशिवाय गति नाही. भक्तीवरील मधुरता भक्तिविषयक झालेल्या वस्तूबद्दलचे ज्ञान असेल तरच उत्पन्न होते. कोणते कर्म कोणते अकर्म हे ठरविण्यापूर्वी विचार करावा लागतो म्हणजेच ज्ञानाला शरण जावे लागते. निराळ्या शब्दांत सांगावयाचे तर विचार करण्याची क्रिया म्हणजे ज्ञान. ज्ञानविषयक वस्तू बदलतील, व्यक्ती बदलतील, ज्ञेय बदलेल पण ज्ञान हे बदलत नाही व त्याची आवश्यकता कधीच कमी होत नाही. अधिक अनुभव अधिक ज्ञान, अनुभवाला अंत नाही. ज्ञानाला समाप्ती नाही. भक्तिमार्गाने यात्रेपेक्षा मुक्कामी पोचल्यावर अधिक आनंद होतो. कर्माच्या बाबतीत त्या मार्गाचा प्रवास करताना आनंद निश्चित होतो. मुक्कामी काय घडेल याची शंका असते. ज्ञानमार्ग म्हणजे आदी व अंती आनंदच असतो. किंबहुना ज्ञान म्हणजे आनंद म्हणजे ब्रह्म हा नचिकेताला झालेला साक्षात्कार हे खरे सत्य आहे, व म्हणून जीवनाचे जीवनाकडे मागणे हेच असावे, की ज्ञानाचा विसर न व्हावा. ही एक परिसासारखी शक्ती आहे. अवघड, संकीर्ण, व्यस्त व विस्तृत, अल्प व अर्धवट या सर्वांतून सुखाचे अमृत, आनंदाचा रस काढण्याची किमया या ज्ञानाला आहे. ज्ञानाला सीमा नाही आकाशाप्रमाणे, त्याला विश्रान्ती नाही सूर्याप्रमाणे, ज्ञान गती व स्थिती या दोन्हींवर ते आधारलेले आहे. एका दृष्टीने ध्रुवासारखे गतिहीन पण वायूसारखे गतिमान ते असते. संकटी धीर देणारे, संपतकाळी सुखाला व समाधानाला वाढविणारे, सूर्यासारखे पण तापहीन. चंद्रासारखं पण लांञ्छनहीन असे ते आहे; म्हणून जीवनाचे मागणे असे असले पाहिजे की ' हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा. '


मराठा ग्रंथ संग्रहालय, वाशी, नवी मुंबई
अनुक्रम ४२८८५ दि. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ४५८८५

REFBK-0015946